स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८०५५

सन १९३७

व. सावरकर

# सावरकर-साहित्य

भाग १ ला

REFBK-00055

किंमत १२ आ

लेखक

बॅ. सावरकर

# सावरकर-साहित्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५८२

भाग १ ला

REFBK-0005582
REFBK-0005582

किंमत १२ आणे

–मुद्रक व प्रकाशक–
किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी.

✲

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

भाविकतेचें युग संपलें असून बुद्धिनिष्ठेच्या नव्या युगास प्रारंभ झाला आहे. काल्पनिक देव आणि त्यांच्या प्रसादानें प्राप्त होणारा आभासमय मोक्ष बुद्धीला मान्य होत नाहीं. जें प्रत्यक्ष पाहातां व अनुभवितां येतें तेवढेंच काय तें खरें व त्याचीच उपासना करणें हितप्रद. अचुक व निश्चित फलदायी विज्ञान म्हणजेच आमचा परमेश्वर हें या नव्या युगाचें धर्मसूत्र आहे, असलें पाहिजे.

हें सत्य फारसें कोणास दिसत नाहीं व दिसलें तरी तें बोलून दाखवण्याचें मनोधैर्य थोडयांनाच असतें. कारण बहुतेकांची विचार व उच्चारशक्ति जुन्या संस्कारांच्या दडपणानें चेपलेली असते. हें दडपण झाडून टाकून बुद्धीला दिसेल आणि पटेल तें सत्य जगापुढें ठेवण्याचें कार्य दे. भ. बॅ. वि. दा. सावरकर यांनीं चालविलें आहे. आर्यावर्त आचारविचारानें बलिष्ठ व्हावा या तळमळीनें त्यांनीं वेळोवेळीं विखुरलेले ज्ञानकण एकत्र करण्यासाठीं ‘सावरकर-साहित्य’ नांवाची पुस्तकमाला प्रकाशित करण्याचें आम्हीं योजिलें असून त्यांतील हें पहिलें पुष्प आम्ही वाचकांस सादर करीत आहों.

बुद्धिनिष्ठ महाराष्ट्र याचें आवडीनें स्वागत करील असा विश्वास वाटतो.

शं. वा. किर्लोस्कर

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ईश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ? | ... | ... | १ |
| मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव ! | ... | ... | १६ |
| खरा सनातन धर्म कोणता ? | ... | ... | २८ |
| यज्ञ ( पूर्वार्ध ) | ... | ... | ४४ |
| यज्ञ ( उत्तरार्ध ) | ... | ... | ६३ |
| गोपालन–गोपूजन नव्हे ! | ... | ... | ८३ |
| हा बौद्धिक भाबडेपणाच नव्हे काय ? | ... | ... | १०४ |
| हें केडगांव कीं वेडगांव ? | ... | ... | ११७ |


**दुरुस्ती–**

१७ व्या पानावरील शेवटची ओळ त्याच पानावरील पहिली समजावी.

# ईश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ?

॥ सामर्थ्य आहे चळवळीचें ॥
॥ जो जो करील तयाचें ॥
॥ परंतु तेथें भगवंताचें ॥
अधिष्ठान पाहिजे ॥

—श्रीरामदासस्वामी.

शिवकालीन महाराष्ट्रांतील क्रांतिकारक अशा असामान्य पुढाऱ्यांत आपल्यापरीं असामान्य स्थान पावलेल्या समर्थ रामदासस्वामींची ही ओंवी विजेची अेक ज्योत आहे ! अितकी तेजस्वी ! शिवकालीन महाराष्ट्राच्या प्रचंड कर्तृत्वशक्तीची नी हिंदु स्वातंत्र्यसमराची केवळ रणघोषणा!

तिच्यांतील शेवटच्या दोन चरणांत जें सांगितलें आहे कीं, ‘परंतु तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे’ त्या शद्बांनीं समर्थ

रामदासांच्या मनांत कोणचा अर्थ व्यक्तविण्याचें अुद्दिष्ट होतें तें आतां नक्की सांगणें यद्यपि दुर्घट आहे, तथापि त्यांचा अर्थ कांहींहि असला तरी त्या ओंवीचें तेजस्वी कार्य ती करून गेली. त्या परिस्थितींत मुसलमानी धर्मवेडाच्या अुन्मादाची नांगी ठेंचण्यास समर्थ होअील असें चैतन्य महाराष्ट्रांत संचरविण्यास त्या काळीं ती कारण झाली, हें तिचें समर्थन पर्याप्त आहे. यास्तव तिचा आज जो अेक अर्थ सर्वसाधारणपणें समजला जातो नी ज्या अर्थाच्यायोगें राष्ट्रांत आज अनर्थकारक अशी अेक वृत्ति अुत्पन्न होत आहे त्या अर्थास निषेधिण्यामध्यें त्या ओंवीचा वा तिच्या त्या तेजस्वी नी कर्मयोगी निर्मात्याचा लवलेशहि अनादर घडण्याचा दोष संभवत नाहीं. त्या ओंवीचा मूळचा अर्थ काय होता हा प्रश्न या लेखांत आमच्यापुढें नसून त्या ओंवीचा आज केला जाणारा अर्थ आजच्या परिस्थितींत किती अनर्थकारक आहे नी तिच्यांत जें तत्त्व अनुस्यूत केलेलें आहे म्हणून साधारणतः समजलें जातें, तें अैतिहासिक नी तात्त्विक दृष्ट्या किती अतथ्य आहे हें काय तें या लेखांत आम्ही दाखवूं इच्छितों.

चळवळीचें, म्हणजे मानवी प्रयत्नांचें सामर्थ्य किती जरी वाढविलें तरी ज्या चळवळीला भगवंताचा पाठिंबा नाहीं ती चळवळ अयशस्वी झालीच पाहिजे ह्या तत्त्वाचा अर्थ नक्की करतांना भगवंताचा पाठिंबा म्हणजे काय, तें अीश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ह्याचा प्रथम स्पष्ट अुलगडा झाला पाहिजे. जर भगवंताच्या अधिष्ठानाचा अितकाच अर्थ असेल कीं, अैहिक आणि मानवी अुपायांच्या हातींच यशाची किल्ली नसून मनुष्याच्या ज्ञानाच्या नी शक्तीच्या पलीकडे ज्या अनेक अज्ञात, अज्ञेय, प्रचंड अशा अमानुष विश्वशक्ति आहेत, त्यांच्या अघाता-प्रत्याघातांच्या टकरींतहि त्या यशाचा वा अपयशाचा संभव असतो, तर तो अर्थ बरोबरच आहे! अत्यंत क्षुद्र अशा गवताच्या काडीच्या हालण्यापासून तों भूकंपाच्या,

सूर्यमालांच्या प्रलयंकर अुत्पातापर्यंत ज्या विश्वशक्तींच्या उलाढाली नी टकराटकरी चाललेल्या आहेत, त्या साऱ्या बलाबलांचें त्यापुरतें फलित (Resultant) म्हणजेच कोणतीहि घटना होय. ह्या तात्त्विक अर्थी कोणच्याहि चळवळीचें यशापयश हेंहि अेक फलितच असल्यामुळें मानवी अुपायांच्या पलीकडील त्या अमानुष शक्तींचा व्यापार हेंच त्यांचें महाकारण होय. त्यास जर अीश्वराचें अधिष्ठान म्हणावयाचें असेल, तर मानवी अुपाय नी साधनें हीं प्रत्यक्ष कारणेंच कोणत्याहि यशाचीं अशेष कारणें नसून ती अमानुष विश्वशक्तींची गुंतागुंत, तें 'दैवं चैवात्र पंचमम्,' तो योगायोग, हें त्यांचें महत्कारणहि अनुकूल असलें पाहिजे हें म्हणणें यथार्थ आहे. मानवी चळवळ कितीहि सामर्थ्यसंपन्न असली आणि ती कितीहि यशस्वी झाली तरी त्या यशाचें सर्व यश मनुष्यकृत प्रयत्नांसच नसून अतिमानुष शक्तींचा व्यापारहि त्यास अनुकूल असाच घडत गेला; दैवाचा फांसाहि तेंच दान देणारा पडत गेला; आणि त्या दैवास देवाची अिच्छा म्हटलें तर देवाचें, अीश्वराचें, अधिष्ठान त्यास लाभलें म्हणून तें यश आलें, ही जाणीव व्यक्तविण्याचाच जर ह्या ओंवीचा अुपदेश असेल तर तिच्यांतील तें तत्त्व अगदीं यथातथ्य आहे यांत शंका नाहीं. किंबहुना ज्याला आपण आपल्या मानवी समजुतीसाठीं मानवी यत्न वा मानवी अुपाय म्हणतों, तेंहि वास्तविक पहातां त्या अतिमानवी शक्तीचाच अेक प्रादुर्भाव आहे.

परंतु ह्या ओंवीचा अर्थ अशा तात्त्विक अर्थी क्वचित्च कोणी घेत असेल ! सामान्यतः तिचा अर्थ असाच घेण्यांत येतो कीं मनुष्य ज्याला ज्याच्या त्याच्यापरीं नीति वा अनीति म्हणतो, न्याय व अन्याय म्हणतो, दैवी संपत् वा आसुरी संपत् म्हणतो, धर्म वा अधर्म म्हणतो, त्यांपैकीं पहिलें तें सत्य नी दुसरें तें असत्य असून जी चळवळ त्या मानवी सत्याच्या पायावर अुभारलेली असते, त्या मानवी न्यायाची पोषक असते, त्या मानवी धर्माचें ब्रीद मिरविते; तीच

काय ती यशस्वी होते ! अीश्वर तिच्यावरच कृपा करतो अशा अर्थी अीश्वराचें अधिष्ठान जिला लाभत नाहीं, ती चळवळ कितीहि प्रबळ असली तरी ती यशस्वी होत नाहीं. यास्तव चळवळ करणारांनीं प्रथम तें भगवंताचें अधिष्ठान संपादिलें पाहिजे, अीश्वराची कृपा अर्जिली पाहिजे. आणि ही अीश्वराची कृपा संपादिण्याचा मार्ग कोणता ? तर अर्थातच पंचाग्निसाधन, पाण्यांत अुभें राहून द्वादशवार्षिक नामजप, योगसाधन, अुपासतापास, अेकशेंआठ सत्यनारायण, अेक कोटी रामनाम जप, संतत धारेचीं अनुष्ठानें, रेडे वा बोकड मारणारे नवस, हजार वाती लावणें, लक्ष दुर्वा वाहणें, स्नानसंध्या, जपजाप्य, नामसप्ताह, पुरश्चरणें–पारायणें, गोग्रास, ब्राह्मणभोजनें, यज्ञयाग, दक्षिणादानें प्रभृति जे शतावधि अुपाय श्रुतीपासून शनिमहात्म्यापर्यंत देवास संतोषविण्यास्तव वर्णिलेले आहेत त्यांस आचरणें हा होय. या अर्थी जिला तपस्या म्हणतात ती आधीं, मग मानवी चळवळ.

वरील मत खरें कीं खोटें हें पहाण्यापूर्वी अितकें स्पष्ट सांगून टाकतों कीं, वर अुल्लेखिलेल्या जपतपादि साधनांचीं आत्मशुद्धि वा पारलौकिक मोक्ष प्रभृति जीं फळें आहेत त्यांचा अूह या लेखांत आम्ही करीत नसून जीं त्यांचीं फळें प्रत्यक्ष अनुभवांत केव्हांहि निश्चितपणें मिळालेलीं नाहींत तीं त्यांचीं फळें नव्हत अितकेंच येथें विशदावयाचें आहे. त्या साधनांविषयीं किंवा त्यांच्या आध्यात्मिक वा पारलौकिक परिणामांविषयीं ज्यांस जसा आदर नी निष्ठा असेल तसें त्यांनीं त्यांस सुखेनैव आचरावें. त्यांपासून लाभणारा आत्मप्रसाद हा भौतिक अशा कोणच्याहि आनंदाहून निरुपम आंतरिक सुखाची जोड ज्यांस देअू शकतो त्यांनीं त्यास सुखेनैव आस्वादावें. परंतु तशा अर्थाच्या अीश्वरी अधिष्ठानावर, वरील ओळींत ज्या राष्ट्रीय अुत्थानादिक भौतिक चळवळींच्या अैहिक यशाचा अुल्लेख केलेला आहे, तें यश वा अपयश बहुधा

ता. नि. नं. ५८८९
ता. ३।८।७०
७५५५९


मुळींच अवलंबून नसतें; तर तें मुख्यतः तिच्या भौतिक सामर्थ्यावर अधिष्ठित असतें, अितकेंच येथें दाखवावयाचें आहे.

## महाराष्ट्रोतिहासाच्या अेका पानाच्या दोन बाजू

मुसलमानांच्या हातून हा हिंदुस्थान देश सोडविण्यासाठीं हिंदुपतपादशाहीचें जें प्रचंड स्वातंत्र्ययुद्ध आम्हां हिंदूंनीं ठाणलें नी जिंकिलें त्याच्याच पुराव्यानें त्या काळीं रचल्या गेलेल्या वरील ओवींतील अर्थावर हें भाष्य नेहमीं करण्यांत येतें कीं, ती प्रचंड राष्ट्रव्यापी अुठावणी, ती चळवळ, यशस्वी होण्याचें मुख्य कारण तिच्या मुळाशीं असलेलें अीश्वरी अधिष्ठान हेंच होय. नाना साधुसंत हरिनामाचा जो अखंड घोष महाराष्ट्रांत दुमदुमवीत राहिले, ज्ञानेश्वरांसारख्यांनीं यौगिक सिद्धि संपादिल्या, अलौकिक चमत्कार करणारे सहस्रावधि पुण्यपुरुष जी जपतपअनुष्ठानव्रतवैकल्यादि प्रकारांनीं अीश्वरी कृपा संपादिण्यास्तव जी तपस्या करीत होते तीमुळें भगवंत प्रसन्न झाले. तें तशा अर्थाचें अीश्वरी अधिष्ठान मिळालें यास्तव ती चळवळ समर्थ आणि यशस्वी ठरली. अशा कोटिक्रमानें हिंदुपतपादशाहीस्तव आम्हां हिंदुवीरांनीं झुंजून तो जो जय मिळविला त्या जयाचाच नी त्या झुंजीचाच पुरावा ज्या अर्थीं ह्या अीश्वरी अधिष्ठानाच्या सिद्धांतास देण्यांत येतो त्या अर्थीं त्याच कालच्या अितहासाची छाननी करून आम्ही तो पुरावा किती लंगडा आहे हें दाखवूं अिच्छतों. किंबहुना ती हिंदुपतपातशाही त्या साधनांनीं किंवा तशा अीश्वरी अधिष्ठानानें जिंकली गेली नसून, तो भौतिक विजय, अशा स्वातंत्र्ययुद्धास जीं भौतिक साधनें कुठेंहि संपादूं शकतात तशा भौतिक साधनांनींच आम्हीहि संपादूं शकतों हें सिद्ध करण्यास त्या काळासारखें दुसरें समर्पक अुदाहरण सांपडणें दुर्मिळ असल्यामुळें तेंच आम्ही आमच्या वतीचा पुरावा म्हणून आपण होअून निवडतों.

काय ती यशस्वी होते ! अीश्वर तिच्यावरच कृपा करतो. अशा अर्थी अीश्वराचें अधिष्ठान जिला लाभत नाहीं, ती चळवळ कितीहि प्रबळ असली तरी ती यशस्वी होत नाहीं. यास्तव चळवळ करणारांनीं प्रथम तें भगवंताचें अधिष्ठान संपादिलें पाहिजे, अीश्वराची कृपा अर्जिली पाहिजे. आणि ही अीश्वराची कृपा संपादिण्याचा मार्ग कोणता ? तर अर्थातच पंचाग्निसाधन, पाण्यांत अुभें राहून द्वादशवार्षिक नामजप, योगसाधन, अुपासतापास, अेकशेंआठ सत्यनारायण, अेक कोटी रामनाम जप, संतत धारेचीं अनुष्ठानें, रेडे वा बोकड मारणारे नवस, हजार वाती लावणें, लक्ष दुर्वा वाहणें, स्नानसंध्या, जपजाप्य, नामसप्ताह, पुरश्चरणें–पारायणें, गोग्रास, ब्राह्मणभोजनें, यज्ञयाग, दक्षिणादानें प्रभृति जे शतावधि अुपाय श्रुतीपासून शनिमहात्म्यापर्यंत देवास संतोषविण्यास्तव वर्णिलेले आहेत त्यांस आचरणें हा होय. या अर्थी जिला तपस्या म्हणतात ती आधीं, मग मानवी चळवळ.

वरील मत खरें कीं खोटें हें पहाण्यापूर्वी अितकें स्पष्ट सांगून टाकतों कीं, वर अुल्लेखिलेल्या जपतपादि साधनांचीं आत्मशुद्धि वा पारलौकिक मोक्ष प्रभृति जीं फळें आहेत त्यांचा अूह या लेखांत आम्ही करीत नसून जीं त्यांचीं फळें प्रत्यक्ष अनुभवांत केव्हांहि निश्चितपणें मिळालेलीं नाहींत तीं त्यांचीं फळें नव्हत अितकेंच येथें विशदावयाचें आहे. त्या साधनांविषयीं किंवा त्यांच्या आध्यात्मिक वा पारलौकिक परिणामांविषयीं ज्यांस जसा आदर नी निष्ठा असेल तसें त्यांनीं त्यांस सुखेनैव आचरावें. त्यांपासून लाभणारा आत्मप्रसाद हा भौतिक अशा कोणच्याहि आनंदाहून निरुपम आंतरिक सुखाची जोड ज्यांस देअू शकतो त्यांनीं त्यास सुखेनैव आस्वादावें. परंतु तशा अर्थाच्या अीश्वरी अधिष्ठानावर, वरील ओळींत ज्या राष्ट्रीय अुत्थानादिक भौतिक चळवळींच्या अैहिक यशाचा अुल्लेख केलेला आहे, तें यश वा अपयश बहुधा

ना. नि. क्र.
ता.



मुळींच अवलंबून नसतें; तर तें मुख्यतः तिच्या भौतिक सामर्थ्यावर अधिष्ठित असतें, अितकेंच येथें दाखवावयाचें आहे.

## महाराष्ट्रेतिहासाच्या अेका पानाच्या दोन बाजू

मुसलमानांच्या हातून हा हिंदुस्थान देश सोडविण्यासाठीं हिंदुपतपादशाहीचें जें प्रचंड स्वातंत्र्ययुद्ध आम्हां हिंदूंनीं ठाणलें नी जिंकिलें त्याच्याच पुराव्यानें त्या काळीं रचल्या गेलेल्या वरील ओवींतील अर्थावर हें भाष्य नेहमीं करण्यांत येतें कीं, ती प्रचंड राष्ट्रव्यापी अुठावणी, ती चळवळ, यशस्वी होण्याचें मुख्य कारण तिच्या मुळाशीं असलेलें औश्वरी अधिष्ठान हेंच होय. नाना साधुसंत हरिनामाचा जो अखंड घोष महाराष्ट्रांत दुमदुमवीत राहिले, ज्ञानेश्वरांसारख्यांनीं यौगिक सिद्धि संपादिल्या, अलौकिक चमत्कार करणारे सहस्रावधि पुण्यपुरुष जी जपतपअनुष्ठानव्रतवैकल्यादि प्रकारांनीं औश्वरी कृपा संपादिण्यास्तव जी तपस्या करीत होते तीमुळें भगवंत प्रसन्न झाले. तें तशा अर्थाचें औश्वरी अधिष्ठान मिळालें यास्तव ती चळवळ समर्थ आणि यशस्वी ठरली. अशा कोटिक्रमानें हिंदुपतपादशाहीस्तव आम्हां हिंदुवीरांनीं झुंजून तो जो जय मिळविला त्या जयाचाच नी त्या झुंजीचाच पुरावा ज्या अर्थीं ह्या औश्वरी अधिष्ठानाच्या सिद्धांतास देण्यांत येतो त्या अर्थीं त्याच कालच्या अितहासाची छाननी करून आम्ही तो पुरावा किती लंगडा आहे हें दाखवूं अिच्छतों. किंबहुना ती हिंदुपतपातशाही त्या साधनांनीं किंवा तशा औश्वरी अधिष्ठानानें जिंकली गेली नसून, तो भौतिक विजय, अशा स्वातंत्र्ययुद्धास जीं भौतिक साधनें कुठेंहि संपादूं शकतात तशा भौतिक साधनांनींच आम्हीहि संपादूं शकतों हें सिद्ध करण्यास त्या काळासारखें दुसरें समर्पक अुदाहरण सांपडणें दुर्मिळ असल्यामुळें तेंच आम्ही आमच्या वतीचा पुरावा म्हणून आपण होअून निवडतों.

साधारणतः सन १३०० ते सन १६०० पर्यंतच्या कालास महाराष्ट्राच्या अितिहासाचें, भारताच्या अितिहासाचें कां म्हणाना, अेक पान कल्पिलें तर त्यांत ह्या अीश्वरी अधिष्ठानाच्या दृष्टि-कोनांतून केवढें आश्चर्य दिसून येतें तें पहा ! प्रथमदर्शनींच ज्ञाने-श्वरांसारख्या महायोग्याचें दर्शन घडतें. जर कधीं तपस्येनें, योगानें, पुण्याअीनें कोणा मनुष्यांत भगवंताचें अधिष्ठान सुव्यक्त झालें असेल तर तें ह्या अलौकिक पुरुषांत होतेंच होतें. रेड्यांकडून त्यांनीं वेद म्हणविले; भिंतींना चालविलें; हरिनामाच्या गजरानें महाराष्ट्र दणाणून सोडलें; ते ज्ञानेश्वर, ते निवृत्ति, ते सोपान, ती मुक्ता आपल्या अलौकिक दैवी संपत्तीची महाराष्ट्रभर नुसती लूट करवीत होतीं. जिकडे तिकडे दैवी चमत्कार ! त्यांच्या मागोमाग नामदेव, जनाबाअी, गोरा कुंभार, दामाजीपंत, सावता माळी, रोहिदास चांभार, चोखा महार, सारे जीवन्मुक्त, साऱ्यांस प्रत्यक्ष पांडुरंग प्रसन्नपणें भेटीगांठीं देता आहेत, घेता आहेत. त्यांच्या मागोमाग ते अेकनाथ, ते तुकाराम ब्राह्मणवाड्यापासून महारवाड्यापर्यंत महा-राष्ट्रांत घरोघर साधुसंत, घरोघर यौगिक सिद्धि, घरोघर देवाचें येणेंजाणें, प्रत्यहीं सकाळीं कोण्यातरी अलौकिक चमत्काराची ताजी बातमी ! आज काय रेडा वेद बोलला, अुद्यां दामाजीपंतांसाठीं प्रत्यक्ष देवानें विठू महाराचा वेष घेऊन बादशहाच्या भरदरबारीं दंडाच्या द्रव्याच्या राशीच्या राशी ओतल्या ! तोंच नवीन बातमी कीं, तें द्रव्य बादशहा स्पर्शूं लागतांच त्यांची फुलांची रास झाली ! कधीं देव रोहिदासाच्या घरीं जोडे शिवीत आहेत, कधीं एकनाथाच्या घरीं पाणी भरीत आहेत, कधीं जनाबाअीचें दळण दळीत आहेत, कधीं नामदेवाबरोबर जेवीत आहेत, कधीं पंढरीचें देअूळचें देअूळ गर्कन् फिरत आहे, आज चोख्या महाराच्या पंगतीस बसून पांडुरंग प्रेमभावानें मिटक्या मारीत आहेत, अुद्यां चोख्यास गाडीला बांधून फरफटत ठार मारण्याची शिक्षा दुष्ट लोकांनीं दिली असतां स्वतः

श्रीकृष्ण येऊन तें जूं हातांनीं धरून अडवीत आहेत, कोणाच्या दाराशीं दत्तात्रेय आपलीं कुत्रीं घेऊन अुभे आहेत तर कोणाच्या हातीं ग्रंथ लिहिण्यास विठोबा लेखणी अुचलून देत आहेत. मेलेलीं माणसें जिवंत होता आहेत, जिवंत माणसें जिवंतपणीं पुरून घेऊन समाधिस्थ होता आहेत. माणसामाणसांशीं देव बोलता आहेत, हंसता आहेत, जेवता आहेत. मूर्तिमान् प्रत्यक्ष रामचंद्र कथा अैकता आहेत, मूर्तिमान् प्रत्यक्ष हनुमान संतामागें अुभे राहून कथेस साथ देत आहेत ! त्या काळची ही संतचरित्राची बाजू वाचीत असतां असें वाटतें कीं, ही महाराष्ट्रभूमि त्या काळीं माणसांची भूमि नसून देवांचीच भूमि झालेली होती. महाराष्ट्र हेंच त्या काळीं देवांचें रहातें घर झालेलें होतें, वैकुंठ नव्हतें !

परंतु पुण्यशील, जपतपयोगयागांनीं पवित्र अलौकिक चमत्काराचेंच जें युग, देवाच्या कृपेची जी छायाच, जें ओश्वराचें मूर्तिमंत अधिष्ठान अशी ही महाराष्ट्राच्या अितिहासांतील ह्या पानाची सुवर्णाक्षरांत लिहिलेली बाजू वाचून आपण जों त्याच पानाची दुसरी बाजू अुलटतों तों काय आढळतें? भगवंताचें अधिष्ठान जर कशांत वरील अर्थीं असूं शकत असेल तर तें त्या पुण्यतम काळीं महाराष्ट्रांत होतेंच होतें. आणि जर भगवंताच्या अशा अधिष्ठानामुळेंच राष्ट्राचें भौतिक सामर्थ्य, राज्य, स्वातंत्र्य हीं यशस्वी होत असतील तर त्या काळच्या महाराष्ट्रीय स्वातंत्र्याची नी राज्याची प्रबळता अद्वितीय, दुर्धर्ष, अजिक्य अशीच असावयास पाहिजे होती. पण सुवर्णाक्षरानें लिहिलेली ही ह्या पानाची देवाधिष्ठित बाजू अुलटतांच दुसरी बाजू जी दिसते ती देवांच्या भौतिक विजयाची नसून राक्षसांच्या विजयाची होय!! या देवाच्या अधिष्ठानानें सुसंपन्न काळांतच महाराष्ट्राचें असलेलें स्वातंत्र्य नी राज्य धुळीस मिळवून त्या देवाच्या अधिष्ठानावर राक्षसांच्या राज्याची टोलेजंग अुभारणी झालेली आढळते ! पुण्यशील

अशा त्या देवांच्या लाडक्या लोकांवर जय मिळाला त्या पापी पण प्रबळ अशा मुसलमानी अत्याचारास !!

हाय हाय ! काय दुष्ट योगायोग पहा ! परमयोगी ज्ञानेश्वर-महाराजांनीं ज्ञानेश्वरी लिहून आपली लेखणी खालीं ठेवली न ठेवली, तोंच अल्लाउद्दीन खिलजी अवघ्या दहापंधरा हजार सैन्यास घेऊन ह्या कोटचवधि हिंदूंनीं गजबजलेल्या दक्षिणेंत, बकऱ्यांच्या कळपांत वाघ घुसावा तसा घुसला ! ज्ञानेश्वरांच्या भगवंताच्या अधिष्ठानाचा पूर्ण पाठिंबा असणाऱ्या त्यांच्या आश्रयदात्या त्या रामदेवरावास अल्लाउद्दीन विंध्याद्रि उतरून आल्याची बातमी देखील पुरती कळली नव्हती तोंच त्यानें थेट देवगिरीवर चढाओ केली नी रामदेवरावाच्या हरिभक्त अशा हिंदूंच्या अफाट सैन्याचा त्या हरिद्वेष्टयानें चक्काचूर उडविला, त्याचें हिंदुराज्य बुडविलें, तें परत स्थापूं निघालेल्या परमशूर शंकरदेवास जितें धरून अंगाचें कातडें सोलून ठार मारिलें ! ज्ञानेश्वर, निवृत्ति, सोपान, मुक्ता, नामदेव, गोरा कुंभार प्रभृति संतमहंत घरोघर देवाशीं हंसत, जेवत, बोलत असतां, भगवंताचें अधिष्ठानच काय पण महाराष्ट्र भगवंताची प्रत्यक्ष राजधानी झालेली असतां तिकडे बहार, बंगाल, अयोध्या, काशींत हिंदु राज्यश्री मुसलमानांच्या घोडयांच्या टापा-खालीं तुडविली जात होती. रजपूत वीरांच्या झुंडीच्या झुंडी रणारणांत कत्तल केल्या जात होत्या. आज कां उद्यां येवढाच प्रश्न, पण विंध्याद्रि उतरून तो मुसलमानी प्रलय दक्षिणेवर कोसळणार हें स्पष्ट झालें होतें. ज्ञानेश्वरांच्यापुढें ऋद्धिसिद्धि हात जोडून उभ्या असतां रेडयाच्या मुखें ते वेद बोलवूं शकले, पण रामदेवराजा, अल्लाउद्दीन तुझ्यावर, चालून येतो आहे बघ' म्हणून साध्या टपालवाल्यालाहि जी सूचना देतां आली असती ती मात्र ज्ञानेश्वरांना रेडयाच्या तोंडून वा स्वतःच्या तोंडून रामदेवरावास देतां आली नाहीं !! ज्ञानेश्वर निर्जीव भिंती चालवूं

शकले, पण सजीव माणसें आपल्या मंत्रबळें चालवून विंध्याद्रीच्या खिंडींत अल्लाअुद्दीनाचा मार्ग रोंखण्यासाठीं अुभीं करूं शकले नाहींत !! सन १२९४ त अल्लाअुद्दिनानें दक्षिणेंत पहिला पाय टाकला आणि अितक्या त्वेषानें मुसलमानांनीं रणांरणांत हिंदूंना पिटलें, त्यांच्या राजधान्या, राज्यें, सैन्यें, देवदेवता अुध्वस्त करीत अितक्या दुर्धर्ष वेगानें ते पुढें घुसले कीं, १३१० च्या आंत त्यांनीं रामेश्वरापर्यंत सारें राज्य निर्हिंदु करून रामेश्वरला मशीद बांधली ! अिकडे विठूरायाची नगरी भगवंताच्या नामघोषानें दणाणतच होती, संतांचें जाळें गांवोगांव पसरत होतें, त्यांच्या घरांत प्रत्यक्ष देव येअून जोडे शिवीत होते, मडकीं घडीत होते, दळणें दळीत होते-बादशाहाची खंडणी भरीत होते !— जपजाप्य, व्रतवैकल्य योगयाग, नामसप्ताह, स्नानसंध्या यांचा नुसता पर्वकाळ गजबजला होता ! तिकडे मुसलमानांची अेक सोडून पांच पादशाहचा हिंदूंच्या अुरावर नाचत होत्या ! हिंदूंच्या घरांतून 'देवलदेवी' रावण पळवीत बाटवीत होते, पण प्रत्येक देवास दोहोंपेक्षां जास्त हात असूनहि त्यांपैकीं अेकानेंहि अल्लाअुद्दिनाचा वा मलिकंबराचा हात धरला नाहीं ! बादशाहाची खंडणी भरली पण 'तूं हरिद्वेष्टा ! माझ्या हरिभक्तांपाशीं खंडणी मागणारा तूं कोण ?' म्हणून गर्जत दाढी ओढून त्यास हिंदु सिंहासनावरून खालीं खेंचलें नाहीं ! जनाबाअीचें दळण दळणाऱ्या कनवाळु देवानें त्या दळणापेक्षां कोटिपटीनें हिंदु राष्ट्रास ज्या दळणाची आवश्यकता होती तें दळण दळण्यास सरसावून त्या हरिद्वेष्टयांच्या राजसत्तेसच आपल्या क्रोधाच्या जात्यांत दळून भरडून निर्दाळून टाकलें नाहीं ! पुण्यपुरुष अेकनाथ भगवंताचें अधिष्ठान संपादिलेलें; त्यांच्या तोंडावर जातां येतां पापी यवन थुंके ! हिंदूचीं हजारों तरुण मुलेंमुली गुलाम होत असतां, राजकन्या दिल्लीच्या राजवाड्यांत मुसलमानांच्या दासी झाल्या असतां, रोहिदासाच्या घरीं जोडे शिवीत बसणाऱ्या

कृपाळु देवास त्यांची करुणा आली नाहीं! जें जें देअूळ तें तें काशीरामेश्वरपर्यंत पाडलें, जें जें देअूळ पाडलें त्याची त्याची मूर्ति मशिदीची पायरी केली! पण देवास त्या मुसलमानी अत्याचाराचा राग आला नाहीं! पण अिकडे कोणी हिंदु अेखादा नारळाचा नवस जरी फेडायचा विसरला ना, किंवा अेखादा हिंदु गांवबहिरोबास वार्षिक बोकड मारावयास चुकला ना, कीं तोच देव काय रागावे! — ह्या हिंदु माणसाचा कुळक्षय होअी वा त्या गांवावर महामारीच्या गाढवाचा नांगर फिरे!

रामदेवराव गोब्राह्मणप्रतिपालक होता, न्यायी होता; त्याच्या पक्षाला सत्य होतें, भगवंताचें अधिष्ठान त्याच्या राज्याचें अधिष्ठान होतें; पण त्याच्या राज्याचा चक्काचूर अुडविला! कोणी? जो अन्यायी होता, ज्याचा पक्ष आत्यंतिक असत्याचाच पक्षपाती, जो केवळ गोब्राह्मणविध्वंसक, यज्ञनिंदक, मूर्तिभंजक, भगवंताच्या अधिष्ठानीं आम्ही जीं पंचमहापातकें समजतों तीं ब्रह्महत्यादि पंचमहापातकें हींच ज्यांचीं पंचमहापुण्यें, त्या भगवद्विद्वेषी, मुसलमानी अत्याचारानें त्या भगवंताच्या अधिष्ठानावर अुभारलेल्या सदाचारी, स्नानसंध्याशील हिंदु साम्राज्याच्या, डोकरीसरशीं ठिकऱ्या अुडविल्या!

जी गोष्ट मुसलमानांची तीच गोष्ट किरिस्तावी पुर्तूगीजांची! आम्ही ज्यांस भगवंताचें अधिष्ठान समजतों तें त्यांच्या चळवळींत कुठलें असणार! अुलट आमच्या देवाचा विद्वेश हेंच त्यांच्या चळवळीचें अधिष्ठान! पण यश त्यांना मिळालें! कुठें पोर्तुगाल! तेथून मूठभर लोक येतात काय, गोमांतकांत घुसतात काय, आणि घोड्याच्या अेका फेरपटक्यासरशीं साऱ्या देशभर, नगरोनगरीं त्यांच्या राज्याचे झेंडे लावतात काय! मारहाण जाळपोळ. धर कीं बाटीव, नाकारलें कीं कर ठार, अशी त्या चांडाळांनीं हिंदूंवर

[library stamps]

धार्मिक छळाची नुसती आग पाखडली ! शेंकडों पितीं लेकरें, तरुण कन्या, दास करून यूरोप-आफ्रिकेच्या बाजारीं बाजारीं भाजीसारखीं विकलीं. मुंजी, लग्नें, पूजा, सारे हिंदु संस्कार दंडनीय ठरले. जीव घेऊन लोकच नव्हेत तर देवहि आपल्या मूर्ति भंगूं नयेत म्हणून श्रीमंगेश, शांतादुर्गा प्रभृति देवहि पळाले, आणि तेहि आपल्या भक्तांस सुरक्षितपणें आपल्या खांद्यावर घेऊन आपल्या पायांनीं नव्हे, तर भक्तांच्याच खांद्यावर आपल्या पालख्या लादून !

## मुस्लीम ख्रिश्चनांच्या वल्गना !

"अगदीं बरोबर" वरील विवेचन वाचून प्रत्येक मौलवी आणि मिशनरी म्हणेल, "शाबास ! हिंदूंचा भगवान् खोटा पडला हें अगदीं बरोबर आहे ! जपजाप्यादिक हिंदु पुराणांच्या साधनांनीं देव पावत नाहीं, हा पुराणाचा पराजय अितकेंच सिद्ध करतो; आणि कुराण-बायबलाचा विजय सिद्ध करतो कीं देवाचें अधिष्ठान मूर्तिभंजक धर्मासच असतें; कुराण-बायबलांतील निमाज, रोजा, क्रॉस ख्रिस्तमसादिक साधनांनींच देव पावूं शकतो !" भगवंताच्या अधिष्ठानाच्या अशा वल्गना पीरपाद्र्यांनींहि हजारों वेळां केल्या होत्या. पण त्यांच्या अितिहासांनीं त्याहि तशाच खोटया पाडल्या ! कशा तें पहा.

मुसलमानी धर्माच्या अुदयासरशीं अरब लोकांस आश्चर्यकारक विजय अेकामागून अेक मिळत गेले. ते मिळाले त्यांच्या 'चळवळींतील' सामर्थ्यानें 'भौतिक' सामर्थ्यानें, आणि त्यांच्या शत्रूंच्या भौतिक दुर्बलतेनें. पण ते समजले कीं कुराणांतील मूर्तिभंजक धर्माचाच हा परिणाम आहे. अल्ला मुसलमानास सहाय्यार्थ देवदूतांचीं सैन्यें गुप्तपणें धाडतो; काफर वा किरिस्ताव मुस्लीमांपुढें केव्हांहि टिकूं शकणार नाहीं ! अशा भावनेनें ते भारले होते. पोर्तुगालपासून पेकिनपर्यंत ते प्रलयासारखे भरभराटत गेले; पण

त्यांच्यापेक्षां भौतिक साघनांच्या, शिस्त, शिशाच्या गोळ्या, तडफेची नी तरवारीची धार यांच्या सहाय्यानें सुसज्ज होऊन मुस्लीम नसलेले लोक जेव्हां अुठले तेव्हां कुराणास खोटें म्हणणाऱ्या स्पॅनिश किरिस्तावांचाहि विजय झाला ! मुसलमानांसहि त्यांच्या कुराणांतील भगवंताचें अधिष्ठान असूननसून सारखेंच झालें. निमाज पढणाऱ्या लोकांच्या सरसकट कत्तली निमाजास पाखंड म्हणणाऱ्या 'काफरांनीं' हि केल्या. ख्रिस्ती भौतिक सामर्थ्यानें दुर्बल होते, तेव्हां मुस्लीमांनीं ख्रिस्त्यांना जिंकलें; मुस्लीम आपसांतील फाटाफूट, अज्ञान, भीरुता यांनीं दुबळे होतांच ख्रिस्त्यांनीं मुस्लीमांस जिंकलें, कुराणाच्या शास्त्रास ख्रिस्त्यांनीं लटकें पाडलें नी ख्रिस्त्यांच्या बायबलास कुराणानें लटकें पाडलें. फार काय 'माझाच जेहोवा सगळ्यांवर विजयी होतो' म्हणून गर्जणाऱ्या ज्यूंची जी गत मुस्लीम ख्रिश्चनांनीं केली तीच गत 'मूर्तिपूजकाला कधींहि विजय देणार नाहीं' म्हणून गर्जणाऱ्या ख्रिस्ती मुस्लीमांची मराठ्यांनीं केली. कारण सन १६०० पर्यंत हिंदूंचा धुव्वा अुडविणाऱ्या त्याच पोर्तुगीजांच्या मुस्लीमांच्या राज्यापेक्षां हिंदूंनीं सन १६०० च्या पुढें आपली संघटना, शिस्त, तडफ अेकंदरींत वरचढ केल्यानें, चळवळीला अवश्य तें सामर्थ्य संपादिल्यानें, भौतिक साधनें जीं प्रत्यक्ष सृष्टींत यश देतात त्यांची जुळवाजुळव ठाकठीक केल्यानें. कोठारांतील दारू कोरडी, हातांतील तलवार तिखट, भाल्याचें पातें टोंकदार, वाघनखें झांकलेलीं, अशी भौतिक सज्जता मुस्लीमांहून वरचढ केल्यानें सन १६०० पासून सन १८०० पर्यंत महाराष्ट्रांतील

## हिंदूंनीं अहिंदूंस रणारणांत चोपून काढलें !

त्याच मूर्तिपूजक हिंदूनें, कुराणांतील नी बायबलांतील 'मूर्तिभंजकांस जय मिळतो' म्हणून सांगणारीं सारीं शास्त्रें लटकीं पाडून, मूर्तिभंजक ख्रिस्ती वा मुस्लीम जियें भेटला तियें पिटला. पुराण

पूर्वी कुराणानें खोटें पाडलें; आतां पुराणानें कुराणांस खोटें पाडलें. केवळ चळवळीच्या भौतिक सामर्थ्यानेंच अुभारलेल्या त्या महाराष्ट्रीय हिंदुपतपादशाहीवर अहिंदूंची–

॥ अिराणापासुनि फिरंगाणपर्यंत शत्रुची उठे फळी॥
॥ सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत रणांगणभू झाली ॥ १ ॥
॥ तीन खंडिच्या पुंडांची त्या परंतु सेना बुडवीली ॥
॥ सिंधुपासुनि सेतुबंधपर्यंत समरभू लढवीली ॥२ ॥

आणि आश्चर्य हें कीं, जों जों स्नानसंध्याशील देवांचें अधिष्ठान सुटत चाललें, महाराष्ट्रांत संतमहंतांचें पीक हटत चाललें, धार्मिक अुपायांपेक्षां भौतिक साधनांवरच अधिक भर पडत चालला, देवांचें अधिष्ठान कमीकमी होअू लागलें, तों तों यशाचें माप पदरीं भरभरून पडत चाललें.

सारांश, ज्या महाराष्ट्रीय अितिहासाला अुल्लेखून ही सामर्थ्याची ओंवी रचली गेली त्याच हिंदुमुसलमानांच्या महायुद्धाचा पुरावा असें दाखवितो कीं, ‘सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें,’ अितकेंच काय तें खरें आहे. अैहिक यश ज्या चळवळीस हवें, तिनें अैहिक, भौतिक, प्रत्यक्ष सृष्टींत अुपयोगी पडतील तेवढीं साधनें संपादून विपक्षावर ‘सामर्थ्यांत’ मात केली कीं ती चळवळ बहुधा यशस्वी होते. मग तिला ज्याच्या त्याच्या धार्मिक पोथ्यांतील कल्पनांप्रमाणें न्यायाचा, पुण्याचा, स्नानसंध्याशील अुपायांनीं मिळविल्या जाणाऱ्या भगवंताच्या आध्यात्मिक अधिष्ठानाचा पाठिंबा असो वा नसो ! हीच गोष्ट जगांतील पारशी, ख्रिस्ती, मुसलमानी ,यहुदी प्रभृति यच्चावत् धर्मग्रंथांतील वचनांची नी त्यांच्या अितिहासाची आहे. ह्या प्रत्येक ग्रंथास अीश्वरदत्त म्हणून त्या त्या लोकांनीं मानलें. त्यांतल्या अेकाचा देव तो दुसऱ्याचा राक्षसहि असू शके. तो तो देव त्या त्या

ग्रंथांत वारंवार गर्जत राही कीं, मी माझ्याच भक्तांना 'काफरां' वर, 'पाखंडा' वर, म्हणजेच त्या ग्रंथांतील कर्मकांडांचें अनुसरण न करणारांवर सदोदित विजय देईन. ह्या आपल्या देवाच्या अधिष्ठानाचें सहाय्य आपापल्या अुठावणीस मिळावें म्हणू त्या त्या लोकांनीं त्या ग्रंथांतील, बहुधा अत्यंत परस्परविरुद्ध धार्मिक कृत्यें केलीं. कोणी गोवध करून भगवंताचें अधिष्ठान संपादूं गेले, तर कोणी गाअीला तर काय पण तिच्या गोमय-गोमूत्रालाहि पवित्र मानून ! पण अैहिक यश असें त्यांपैकीं कोणालाहि अशा ह्या भगवंताच्या अधिष्ठानानें मिळूं शकलें नाही ! ! ज्याच्या चळवळींत अितरांहून अवश्य त्या भौतिक साधनांचें 'सामर्थ्य' अधिक होतें ते त्यापुरते अैहिक विजय मिळवूं शकले तें भौतिक सामर्थ्य लोपतांच त्यांच्या त्यांच्या देवांसुद्धां नाश पावले ! मनुष्यांनीं आपापल्या लहरींप्रमाणें ज्या धर्माधर्माच्या, न्यायान्यायाच्या, पापपुण्याच्या, बऱ्यावाअीट कल्पना केल्या त्यांचा 'देवास' कांहीं अेक पक्षपातीं अभिमान दिसत नाहीं. तेव्हां ज्यांना आपल्या चळवळीस अैहिक यश हवें, त्यानें त्यानें आमच्या पक्षास न्याय आहे, आमच्या पक्षास देव आहे, सत्य आहे; यास्तव तो आमचा पक्ष विजयी होणारच अशा वल्गना करण्याचें आणि अशा आंधळ्या निष्ठेंत निःश्चित राहाण्याचें सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादीं न लागतां 'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें,' अितकेंच काय तें खरें मानावें आणि वैज्ञानिक, सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा अैहिक साधनांनीं विपक्षांहून वरचढ होण्याचा यत्न करावा. अैहिक विजयाचा मार्ग हाच ! अन्यायी, परोपद्रवी, व्हावें असें नव्हे; तर न्याय झाला तरी तो 'समर्थ' नसेल तर व्यर्थ होय—समर्थ अन्याय त्याच्यावर कुरघोडी केल्यावांचून राहाणार नाहीं. दुर्बल पुण्याअीहि पंगु होय, हें विसरूं नये. नुसत्या अेकशेंआठ तर काय पण अकराशेंआठ

सत्यनारायणांच्या पूजा केल्या तरी अैहिक यश मिळणार नाहीं. कारण तें चळवळीच्या भौतिक सामर्थ्यावरच काय तें अवलंबतें ! असत्यनारायणाचे पूजकहि ह्या जगांत वारंवार यशस्वी होतात, फार काय सारें जग निर्देव करूं निघालेला रशिया आज अैहिक दृष्टचा परम बलिष्ठ म्हणूनच परम यशस्वी झालेला आहे कीं नाहीं ? 'निर्देव' म्हणून त्याचें वैभव टिकणार नाहीं म्हणाल तर तें 'सदेव' अशाहि कोणाचें टिकलें नाहीं ! ! श्रीकृष्णांची द्वारका समुद्रांत बुडाली; प्रत्यक्ष मदिनेंतील मशीद घोडशाळा बनली, 'जेहोवा' चें सुवर्णमंदिर तडकलें; जीजसला रोमनें फांशीं दिलें —क्रुसिफाय केलें ! ! ! 'अस्पृश्यता काढतां म्हणून बिहारचा भूकंप झाला' म्हणणारा सनातनी समज, आणि 'अस्पृश्यता ठेवतां म्हणून तो भूकंप झाला' असें बजाविणारा सुधारकी ढोंगीपणा हा जितका खुळचट आहे तितकाच कोटि रामनामजपानें वा निमाजपढाअीनें राष्ट्रावरील भौतिक सर्वारिष्ट शांत करूं निघालेला भाबडेपणाहि खुळचट आहे ! रामास हराम समजणारेहि अैहिक सामर्थ्यास संपादून वैज्ञानिक बळानें जें अैहिक यश मिळवूं शकतात तें अैहिक यश ज्यास हवें, त्यानें तें अद्यावत् वैज्ञानिक सामर्थ्य संपादावें. चळवळींत तें सामर्थ्य असलें तर भगवंताच्या अधिष्ठानावांचून कांहीं अडत नाहीं. तें सामर्थ्य नसलें तर भगवंताच्या अधिष्ठानासाठीं कोटि कोटि जप केले तरी अैहिक यश मिळत नाहीं, हाच सिद्धांत ! !

# मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव !

वहात्या नदींत काठी आपटली असतां त्या नदीच्या अखंड धारेचे पळभर दोन भाग झालेले भासतात. संध्याकाळीं अंधुकलेल्या अखंड आकाशांत मधेंच कुठें जी पहिली चांदणी लुकलुकूं लागते ती तशी चमकण्यासरशीं ह्या अखंड आकाशाला अेक गणनबिंदु मिळून त्याच्या चारीकडे चार बाजू चट्कन् वेगळ्या झाल्याशा भासतात.

ह्या पदार्थजातांतहि मनुष्याच्या जाणीवेची चांदणी चमकूं लागतांच त्याचे अकस्मात् दोन भाग पडतात. अुभें विश्व, अनंताच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत चरकन् कांपलें जाअून दुभंग होअून पडतें. सुरूप आणि कुरूप, सुगंधी आणि दुर्गंधी, मंजुळ आणि कर्कश, मृदुल आणि कठोर, प्रिय आणि अप्रिय, चांगलें आणि वाअीट, दैवी आणि राक्षसी, हीं सगळीं द्वंद्वें मनुष्य हा ह्या यच्चावत् विश्वाचा, वस्तुजाताचा, केंद्र कल्पिल्यामुळेंच, मध्यबिंदु समजला-

अेक भाग, मनुष्यास जो दुःखद तो दुसरा. पहिला चांगला, दुसरा वाअीट.

ज्यानें विश्वाचा मनुष्यास सुखद होणारा हा चांगला भाग निर्मिला तो देव; मनुष्यास दुःख देणारा तो दुसरा वाअीट भाग निर्मिला तो राक्षस.

मनुष्याच्याच लांबीरुंदीचा गज घेअून विश्वाची अुपयुक्तता, बरेवाअीटपणा, मोजला असतां ह्या मोजणीचा हा निकाल फारसा चुकत आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

विश्वाची अुपयुक्तता आपल्या मापानेंच मनुष्यानें अशी मापावी हेंहि अपरिहार्यच होतें. विश्वाचें रसरूपगंधस्पर्शादि सारेंच ज्ञान मनुष्याला त्याच्यापाशीं असलेल्या पांच ज्ञानेंद्रियांनींच काय तें कळूं शकणार, विश्वांतील वस्तुजात अेकेकीं गणून तिचें पृथक्करण करून, ते घटक पुन्हा मोजून त्या अमर्याद व्यापाची जंत्री करीत राहिल्यानें विश्वाच्या असीम महाकोषांतील वस्तुजाताचें मोजमाप करणें केवळ अशक्य असें समजून आपल्या प्राचीन तत्त्वज्ञान्यांनीं, आपल्या पांच ज्ञानेंद्रियांनींच ज्या अर्थीं हें सर्व विश्व केव्हांहि जें कांहीं आकळलें जाअूं शकणारें आहे तें जाअूं शकतें, त्या अर्थीं त्याचें 'पंचीकरण' करणें हाच वर्गीकरणाचा उत्कृष्ट मार्ग होय असें जें ठरविलें तें एका अर्थीं क्रमप्राप्तच होतें. अितकेंच नव्हे, तर तो त्यांच्या अप्रतिरथ बुद्धिमत्तेचा त्या काळचा अेक आश्चर्यकारक विजयच होता ! ज्ञानेंद्रियेंच जर पांच तर विश्वाचें यच्चावत् वस्तुजात त्यांच्या त्या पांच गुणांपैकीं कोणत्यातरी अेका वा अनेका गुणाचेंच असणार. अर्थात् त्या पांच गुणांच्या तत्त्वांनीं, पंचमहाभूतांनींच, ते घडलेले असणार. ह्या विश्वदेवाचा आम्हांशीं जो कांहीं संवाद होणें शक्य आहे तो ह्या त्याच्या पांच मुखांनींच काय तो होणार म्हणूनच तो विश्वदेव, तो महादेव, पंचमुखी होय !

आपल्या ज्ञानेंद्रियांनीं विश्वाच्या गुणधर्माचें आकलन करण्याचा मनुष्याचा हा यत्न जितका अपरिहार्य नी सहज, तितकाच स्वतःच्या जातांच, अकस्मात् अुत्पन्न होतात. मनुष्यास जो सुखद तो विश्वाचा

अंतःकरणानें त्या विश्वाला निर्मिणाऱ्या देवाच्या अंतःकरणाची कल्पना करण्याचा मनुष्याचा यत्नहि साहजिकच होता. त्यांतहि मनुष्याला सुख देण्यासाठींच कोण्या दयाळु देवानें ही सृष्टि निर्मिली असली पाहिजे, ह्या मानवी निष्ठेला अत्यंत प्रबळ असा पाठिंबा ही सृष्टिदेवीच प्रतिपदीं, प्रतिपलीं तिला तशी लहरच आली कीं सारखी देत राही. आजहि देतेच आहे !

खरोखर, मनुष्याच्या सुखसोयीसाठीं त्या दयाळु देवानें ही सृष्टीची रचना किती ममताळूपणानें केली आहे पहा ! हा सूर्य, हा समुद्र–किती प्रचंड हीं महाभूतें ! पण मनुष्याच्या सेवेस त्यांना देखील त्या देवानें लावलें. दुपारीं तहान तहान करीत मुलें खेळून दमून येतील तेव्हां त्यांना थंडगार नी गोड पाणी मिळावें म्हणून आअी सकाळींच विहिरीचें पाणी भरून 'कुज्यां'त घालून गारत ठेवते, तशा ममतेनें अुन्हाळ्यानें नद्या सुकून जाण्याच्या आधींच हा सूर्य त्या समुद्रांतलें पाणी किरणांचे दोर खोलखोल सोडून भरतो, मेघांच्या 'कुज्यांतून' सांठवून ठेवतो, आणि तेंहि मध्यंतरीं अशी कांहीं हातचलाखी करून, कीं समुद्रांत असतांना तोंडीं धरवेना असें खारट असणारें तें पाणी किरणांच्या कालव्यांतून त्या आकाशाच्या विस्तीर्ण सरोवरांत सांचतांच अितकें गोड नी गार व्हावें कीं जें पाणी पिण्यासाठीं देवांच्याहि तोंडास पाणी सुटावें ! पुन्हा समुद्राचें खारट पाणी माणसासाठीं गोड करून देण्याच्या धांदलींत साराचा सारा समुद्र गोड करून टाकण्याची भलतीच चुकीहि न होअील अशी तो दयाळु देव सावधगिरीहि घेववितो–एका वर्षांत हवें तितकेंच पाणी गोड करून आटविण्याअितकीच शक्ति सूर्यकिरणांत आणि सांठविण्याअितकीच शक्ति मेघांत ठेविली जाते. नाहींतर सारा समुद्रच गोड झाल्यानें मनुष्यास मीठ मिळणें बंद होअून त्यांचा सारा संसार अळणी व्हावयाचा !

हे पशु पहा ! मनुष्याच्या सेवेला आणि सुखाला हवे तसेच विविध, हवे तितकेच बुद्धिमान्, वाळवंटांतलें तें मनुष्याचें तारू– म्हणून कांटे

खाऊन पाण्यावांचून महिनोगणतीं चालण्याची युक्ति त्या अुंटाला शिकविली तो घोडा किती चपल ! त्याच्यावर स्वारी भरणाऱ्या मनुष्यास भर रणांगणांतहि संभाळून वहाण्याअितकी नी मनुष्याशीं अत्यंत प्रामाणिकपणें वागण्याअितकी बुद्धि त्याला देवानें दिली. पण मनुष्यावरच स्वारी भरण्याअितकी बुद्धि मात्र दिली नाहीं ! ही गाय पहा. अेका बाजूला सुकें गवत ढकलावें नी दुसऱ्या बाजूला त्याचें बनलेलें ताजें ताजें जीवनप्रद दूध चरव्या भरभरून काढीत बसावें ! असें तें आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ज्या देवानें घडविलें तो खरोखरच किती दयाळु असला पाहिजे ! आणि पुन्हा प्रत्येक वेळीं जुनें यंत्र मोडतांच नवें घडण्याचे श्रमसुद्धां मनुष्याला पडूं नयेत अशी सोय त्यांतच केलेली; पहिल्या यंत्रांतच गवताचें दूध करून देतां देतांच तसलींच नवीन अजब यंत्रें बनविण्याचीहि व्यवस्था केलेली !

अेक गव्हाचा दाणा पेरला कीं त्याचे शंभर दाणे ज्या जगांत होअून अुठतात; अेक आंबा ! रसानें, स्वादानें, सत्वानें कोण भरपूर भरलेलें तें देवफळ ! पण तरीहि तें अितकें सुपीक कीं एक आंबा रुजविला कीं त्याचा वृक्ष होअून प्रतिवर्षी हजार हजार आंबे त्याला लागावे नी असा क्रम वर्षानुवर्षे चालावा; :फार काय सांगावें, अेका आंब्याच्या फळापासून होणारीं तीं लाखों फळें सगळींचीं सगळीं जरी मनुष्यांनीं खाल्लीं तरी पुन्हा आंब्यांचा तोटा म्हणून पडूंच नये, यासाठीं आंब्याच्या झाडाच्या फांदीचींच कलमें करून त्यांच्या आंबरायांच्या आंबराया भरभराटण्याची सोय ज्या जगांत देवानें केलेली आहे; अेका कणाचा मण होणारीं हीं तांदूळ, बाजरी, जोंधळे प्रभृति नानाविध सत्वस्थ धान्यें; अेक बीं पेरलीं कीं अेका पिढीस सहस्रावधि रसाळ फळें पुरविणारीं हीं फळझाडें; हे फणस, पपनस, अननस, द्राक्षें, डाळिंबें, या गवतासारख्या अुगव म्हणतांच अुगविणाऱ्या अति रुचकर बहुगुणी, विविधरस शाकभाज्या, फळभाज्या; ज्या जगांत पुरून अुरताहेत, ज्याचा गाभाच गोड आहे, तो साखरेच्या

पाकानें ओतप्रोत भरलेला अूस देखील ज्या जगांत अितका पिकतो कीं त्याचे मळेचे मळे माणसांना नकोसे झाले म्हणजे बैल खाअून टाकतात– त्या जगास निर्मिण्यांत देवानें मनुष्यावर जी अमर्याद दया केली आहे तीविषयीं मनुष्य त्याचा अुतराअी होणार तरी कसा !!

तशीच ही मनुष्याच्या देहाची रचना ! पायाच्या तळव्यापासून तों मज्जांतील सूक्ष्मातिसूक्ष्म पिंडानुपिंडापर्यंत ह्या शरिराची रचना मनुष्याला सुखदायी होअील अशीच सुसंवादी करतांना हे मनुष्याच्या देवा, तूं जी केंसानुकेंसागणिक काळजी घेत आला आहेस ती कुठवर सांगावी ! मनुष्याचा हा अेक डोळा जरी घेतला तरी, कितीं युगें, किती प्रयोग, किती अनवरत अवधानें करून तूं हा आज आहे तसा घडवूं शकलास ! प्रथम प्रकाशाला किंचित् संवादी असा अेक नुसता त्वग्बिंदु; प्रकाशाला नव्हे तर त्याच्या सावलीला तेवढा जाणणारा; अंधेर नी अुजेड अितकाच फरक काय तो जाणणारा तो पहिला त्वग्बिंदु; त्याच्यांत सुधारणा करतां करतां किती प्रयोग करून, किती रद्द करून, पुन्हा प्रयोग करून रचतां रचतां शेवटीं आज मनुष्याचा सुंदर, टपोरा, पाणीदार, महत्वाकांक्षी डोळा तूं घडविलास ! अितका महत्त्वाकांक्षी डोळसपणा त्या मनुष्याच्या डोळ्यांत मुसमुसत आहे कीं, देवा, तुझ्याच कलेंत तुझाच पाडाव करण्यासाठीं दुर्बिणीचे प्रतिनेत्र निर्मून तो तुझ्या त्या आकाशांतील प्रयोगशाळेचेंच अंतरंग पाहूं अिच्छीत आहे ! नव्हे, तुलाहि त्या दुर्बिणीच्या टप्प्यांत गांठून कुठेंतरी प्रत्यक्ष पहातां येतें कीं नाहीं याचे प्रयोग करूं म्हणत आहे !!!

आणि त्या मनुष्याच्या डोळ्यास प्रसादविण्यास्तव सौंदर्याचा नी सुरंगांचा जो महोत्सव तूं त्रिभुवनांत चालू केलास त्याची आरास तरी काय वर्णावी ? हें पारिजाताचें सुकोमल फूल, तें सोनचांफ्याचें सुवासमत्त सुमन ! हा मोराचा पिसारा पहा, अहाहा ! अेकेका

ग्रं. वि... क्र. ८५८
क्र. ८१९३७
२१

पिसाची ती ठेवण, तें रंगकाम, ती जिवंत चमक, तें तरल नटवेंपण ! आद्य कलावन्त ! तशा अनेक सुंदर पिसांचा तो पिसारा पसरून तो तुझा मोर जों जों आनंदानें अुन्मत्त होऊन नाचूं लागतो तों तों देवा, तुझी ती ललित कलाकुसरी पाहून 'धन्य, देवा, धन्य तुझी ! वा रे वा !' असें वारंवार अुद्‌गारत माझें हृदयहि नाचूं लागतें ! आणि असा पिसारा मनुष्यासहि तूं कां दिला नाहींस म्हणून किंचित् रुसूंहि लागतें ! हे नयनाल्हादक रंगांचे नी श्रवणाल्हादक गोड लकेऱ्या घेणारे शतावधि पक्ष्यांचे थवेच्या थवे ज्या जगांत मंजुळ आनंदाचे किलबिलाट करीत आहेत; गुलाब, चमेली, बकुळ, जाअीजुअी, चंपक, चंदन, केतक, केवड्यांचीं बनेंचीं बनें सुंदर फुलांचे सडे पाडीत आहेत आणि सुगंधानें सारा आसमंत दरवळून सोडीत आहेत; मानसांतून ह्या प्रीतिरति आणि मानससरोवरांतून ह्या कमलिनी कुमुदिनी विकसत विलसत आहेत; ज्या जगांत रात्रीं चांदण्या आहेत, अुषःकाल गुलाबी आहेत, तारुण्य टवटवीत आहे, निद्रा गाढ आहे, भोगांत रुचि आहे, योगांत समाधि आहे—देवा ! तें हें जग ज्या तूं आम्हां मनुजांना अितकें सुखमय होअूं दिलेंस, होअूं देत आहेस, त्या तूं तें आमच्या सुखासाठींच असें निर्मिलेंस असें आम्हांस कां वाटूं नये ? आम्हाला जशी आमच्या लेंकरांची माया आहे म्हणनच आम्ही त्यांच्या सुखासाठीं जपतों, तसेंच आमच्या सुखासाठीं अितकें जपणाऱ्या देवा, तुला आम्हां मनुष्यांची माया असलीच पाहिजे. आम्ही माणसें, देवा, तुझीं लेंकरें आहोंत; तूं आमची खरी आअी आहेस ! आअीला देखील दूध येतें—तूं दिलेंस म्हणून ! आम्ही मनुष्यें तुझे भक्त आहोंत, आणि देवा, तूं आम्हां मनुष्यांच्या देव आहेस.

अितकेंच नव्हे, तर तूं आम्हां मनुष्यांचाच देव असून तुझ्यावांचून दुसरा देव नाहीं ! हें सारें जगत् तूं आमच्या सुखसोयीसाठींच घडविलें आहेस ! !

मनुष्याच्या अिच्छेस जुळेशी ही विचारसरणी सत्यास जुळेल अशीहि ठरली असती—जर ह्या जगांतील प्रत्येक वस्तु नी प्रत्येक

वस्तुस्थिति मनुष्याला सुखकारक नी अुपकारक अशीच असती तर ! पण मनुष्याच्या दुर्दैवानें या साऱ्या जगांतील तर राहोतच, पण ज्या पृथ्वीस तो मनुष्य प्रथम प्रथम तरी ' सारें जग ' म्हणून स्वाभाविकपणेंच संबोधीत होता, जिला विश्वंभरा, भूतधात्री, अशा नांवानें तो अजूनहि गौरवितो, त्या पृथ्वीवरील वस्तुजातहि वा वस्तुस्थितीहि मनुष्यास सर्वस्वीं अनुकूल नाहीं; अितकेंच नव्हे, तर उलट अनेक प्रकरणीं मारकच आहे.

ज्या सूर्याचे नी समुद्राचे मनुष्यावर झालेले अुपकार आठवून आठवून आपण आत्तांच त्याचीं स्तोत्रें गाअिलीं तो सूर्य नी तो समुद्रच पहा ! अुन्हानें तापून चक्कर येअूं लागलेल्या अवश वाटसरूवर, लाठीच्या पहिल्या दोनचार तडाक्यांनीं अर्धमेला होअून गेलेल्या सापावर आपण जसा शेवटचा टोला मारून तो साप पुरता ठार करतों तसा, हा सूर्य आपल्या प्रखर किरणांचा शेवटचा तडाका मारून त्या मनुष्यांना ठिकच्या ठिकाणीं ठार करण्यास चुकत नाहीं ! ज्या भारतांत त्या सूर्यास लक्षावधि ब्राम्हण, सकाळ संध्याकाळ अर्घ्य देण्यास अुभे असत, त्याच भारतांत, त्या धर्मशील काळींहि दुर्गादेवीच्या दुष्काळांचा सुकाळ करून बारा बारा वर्षें आपली प्रखर आग सारखी वर्षत लाखों जीवांस जिवंत भाजून काढीत आला आहे ! कुराणांत, तौलिदांत, भाविक पैगंबरांनीं स्तुति केली आहे कीं ' मनुष्यासाठीं, हे देवा, हे किती असंख्य मासे, किती रुचकर अन्नाचा हा केवढा अखंड सांठा तूं या समुद्रांत ठेवला आहेस !' पण तोच समुद्र मनुष्यास जशाचा तसाच गिळून पचवून टाकणाऱ्या अजस्र सुसरींना आणि प्रचंड हिंस्र माशांनाहि तसेंच निःपक्षपातानें पाळीत आहे ! मनुष्यांचीं तारवें पाठीवर वाहून नेतां नेतां, सदय वाटाड्याचें सोंग घेअून चाललेला वाटमाऱ्या जसा भररानांत त्याच बायाबापड्या वाटसरूंवर अुलटून त्यांचे गळे कापतो, तसा हा समुद्र अकस्मात् हजारों माणसांनीं भरलेलीं तीं तारवें नी त्या प्रचंड टिटानिका बोटी आपल्या

पाठीवरून फेंकून आपल्या भयंकर जबड्यांत ढकलतो—गट्कनी गिळून टाकतो ! अेखादी राक्षसीण रागावली तर अेकाद्या लेंकराची मान गुटी नदींत दाबून, त्याचा गुदमरून जीव जाअीतों धरील ! अेखादी हिंस्र सुसर फार तर दोनतीन सुरेख कुमारिकांना नदींत अुतरून लाजत लाजत स्नान करीत असतां त्यांचे कांकडीसारखे कोळे लुसलुशीत पाय दांतांत धरून हिसडून गटकन् गिळून टाकील; पण ही गंगामाय, ही जमनाजी, ही देवनदी जार्डन, हा फादर थेम्स, हजारों कुमारींची—मुलांलेंकरांची—मान अेका मानेसारखी, आपल्या पाण्यांत याचा अवश जीव गुदमरून ठार होअीतों दाबील, नगरेंचीं नगरें त्यांचा पाया हिसडून गिळून टाकील.

अिजिलकुराणादिक धर्मग्रंथांत भावडी भक्ति लिहून गेली कीं, बोकड, कोंबडी, ससा, शेळी हरीण हेहि नानाविध प्राणी मनुष्यांना पुष्कळ मांस मिळावें म्हणून, हे दयाळु देवा, तूं निर्मिलेस ! पण त्यांच्या रुचकर मांसानें, स्मरणानें तोंडास पाणी सुटलेल्या त्या भक्तीस ह्याचें अगदींच कसें विस्मरण पडतें कीं ह्याच जगांत त्याच देवानें मनुष्याचेंहि मांस खाण्यासाठीं सिंह, वाघ, चित्ते, लांडगे हेहि निर्मिलेले आहेत. हे दयाळु देवा, तूं माणसांची कोळींकोळीं मुलें अशाचसाठीं निर्मिलींस कीं, आम्हांस कांकडीसारखी मुखशुद्धि सदोदित मिळावी अशी मनुष्यास फाडून चिरफाडून खाल्ल्यानंतर त्याच्या हाडांवर ढेंकरा देत बसलेल्या सिंहांच्या नी लांडग्यांच्या रक्ताळलेल्या तोंडांतली कृतज्ञ स्तुतीहि त्याच देवास पावत आहे ! आशिया आणि आफ्रिका यांस जोडणारे खंडच्या खंड ज्या दिवशीं महासागरांत, त्या खंडावरील वरमाला घेअून अुभ्या असलेल्या लक्षावधि कुमारिकांसह, दूधपाजत्या आयालेकरांसह, अर्धभुक्त प्रणयीजनांसह, पूजांजलि वाहात्या भक्तांसह, त्याच देवाची स्तुति चाललेल्या लाखों देवालयांसह तें खंडच्या खंड त्याच देवानें ज्या दिवशीं त्या महासागरांत गणपति

डबकन् बुडवावा तसें बुडविलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं हीच उषा, हीच वेदांनीं गाअिलेली अुषा, असेंच गोड गुलाबो हास्य हंसत त्या शुकशुकाट दृश्याकडे पहात होती! कुराणांत म्हटलें आहे कीं, 'चंद्र निर्मिला, अशासाठीं कीं, मनुष्याला निमाज पढावयाच्या वेळा कळाव्या! पण जो जो निमाज पढे त्या त्या अिस्लामियांची, त्या मुल्लामौलवी-मशिदीसुद्धां कत्तल करून, त्या खलिफाच्या घराण्याची राखरांगोळी अुडवून त्या लाखों मुस्लीमांच्या कापलेल्या डोक्यांच्या ढिगावर ज्या दिवशीं तो निमाजाचा कट्टर शत्रु चेंगिझखान चढून जाअून शांतपणें बसला, त्या रात्रीं त्या बगदाद नगरीं हाच चंद्र त्या चेंगिझखानालाहि त्याच्या वेळा पलें पलें मोजून असाच बिनचूक दाखवीत शांतपणें आपली कौमुदी वितरीत होता.

हीं सुगंधीं फुलें, हे सुस्वर पक्षी, तो मनोहर पिसारा पसरून नाचणारे हे सुंदर मोरांचे थवे, रानचें रान अकस्मात् पेटून भडकलेल्या वणव्यांत, चुलींत वांगें भाजावें तसें, फडफड करतात न करतात तोंच भाजून राख करून टाकतो—तो कोण? गाय दिली तो दयाळु, तर त्याच गाअीचें दूध पिवून तिच्याच गोंठ्यांत बीळ करून राहाणारा तो विषारी साप, त्या गाअीचें दूध देवाच्या नैवेद्यासाठीं काढावयास येणाऱ्या व्रतस्थ साध्वीला कडकडून डसून तिचा जीव घेणारा तो साप, तो ज्यानें दिला तो कोण? प्रत्येक भोगामागें रोग, केंसागणिक ठणठणणारे केंसतोड, नखानखांचे रोग; दातांदातांचे रोग, ते कण्ह, त्या कळा, ती आग, त्या सांथी, ती महामारी, ते प्लेग, ती अतिवृष्टि, ती अनावृष्टि ते अुल्कापात? जिच्या मांडीवर विश्वासानें मान ठेवली ती भुअीच अकस्मात् अुलटून मनुष्यांनीं गजबजलेले प्रांतचे प्रांत पाताळांत जिवंत पुरून गडप करून टाकणारे ते भूमिकंप!! आणि कापसाच्या राशीवर जळती मशाल कोसळावी तसें ह्या पृथ्वीच्या अंगावर कोसळून अेखाद्या गवताच्या गंजीसारखी भडभड पेटवून देणारे ते दुष्ट धुमकेतु—ते कोणीं केले?

जर ह्या विश्वांतील यच्चावत् वस्तुजातांच्या मुळाशीं त्यांना धारण करणारी, चालन करणारी, किंवा जिच्या क्रमविकासाचे ते परिणाम होत आले आहेत अशी जी शक्ति आहे तिला देव म्हणा-वयाचें असेल तर त्या देवानें हें सारें विश्व, मनुष्यास त्याचा मध्य-बिंदु कल्पून केवळ मनुष्याच्या सुखसोयींसाठींच निर्मिलें ही भावना अगदीं भाबडी, खुळी आणि खोटी आहे असें मानल्यावांचून वरील विसंगतीचा अुलगडा होअूच शकत नाहीं.

कोणत्या हेतूनें वा हेतूवांचून हें जगड्व्याळ विश्व प्रेरित झालें तें मनुष्याला तर्कितां देखील येणें शक्य नाहीं. जाणतां येणें शक्य आहे तें अितकेंच कीं, कांहीं झालें तरी मनुष्य हा ह्या विश्वाच्या देवाच्या खिसगणतींतहि नाहीं. जशी कीड, मुंगी, माशी, तशाच ह्या अनादि-अनंत कालाच्या असंख्य अुलाढालींतील हा मनुष्यहि अेक अत्यंत तात्पु-रता आणि अत्यंत तुच्छ परिणाम होय. त्याला खायला मिळावें म्हणून धान्य उगवत नाहीं, फळें पिकत नाहींत, कोथिंबीर खमंग झालेली नाहीं. धान्य पिकतें म्हणून तो खाअू शकतो, अितकेंच काय तें. त्याला पाणी मिळावें म्हणून नद्या वहात नाहींत. नद्या वहातात म्हणून पाणी मिळतें अितकेंच काय तें या पृथ्वीवर जेव्हां नुसत्या प्रचंड सुसरीच सुसरी नांदत होत्या नी मनुष्याचा मागमूसहि नव्हता तेव्हांहि नद्या वहात होत्या, झाडें फुलत होतीं, वेली फुलत होत्या. मनुष्यावांचून तर काय, पृथ्वी नव्हती तेव्हांहि हा सूर्य असाच आकाशांत भटकत फिरण्यास भीत नव्हता, आणि हा सूर्यहि जरी त्याच्या साऱ्या ग्रहोपग्रहांसुद्धां हरवला तरी, अेक काजवा मेला तर पृथ्वीला जितकें चुकलेंसें वाटतें तितकेंदेखील या सुविशाल विश्वाला चुकलेंसें वाटणार नाहीं. ह्या विश्वाच्या देवाला अेका पलाचेंहि सुतक, असे शंभर सूर्य अेखाद्या सांथींत अेका दिवसांत जरी मरूं लागले तरी, धरावें लागणार नाहीं !!

तरीदेखील ज्या कोणच्या हेतूनें वा हेतूवांचून ही विश्वाची प्रचंड जगड्व्याळ अुलाढाल चालू आहे तींत अेक अत्यंत तात्पुरता

नी अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून का होईना, पण मनुष्याला, त्याच्या लांबीरुंदीच्या गजानें मापतां यावें असें, त्याच्या संख्येंत मोजतां यावें असें, अितकें सुख नी अितक्या सोयी अुपभोगितां येतात हा मात्र आणि अेवढाच काय तो ह्या विश्वाच्या देवाचा मनुष्यावर झालेला अुपकार होय ! मनुष्याला ह्या जगांत जें सुख मिळू शकतें तेवढेंहि मिळू न देण्यासारखीच जर ह्या विश्वाची रचना ह्या विश्वाच्या देवानें केली असती, तर त्याचा हात कोण धरणार होता ! हे सुगंध, हे सुस्वर, हे सुखस्पर्श, हें सौंदर्य, हें सुख, ह्या रुची, ह्या सोयी आहेत, त्याहि अमूप आहेत ! ज्या योगायोगानें मनुष्यास ह्या सर्व लाभत आहेत त्या योगायोगाला शतशः धन्यवाद असोत ! ज्या विश्वशक्तींनीं कळत न कळत असा योगायोग जुळवून आणला त्यांना त्या अंशापुरतें मनुष्याचा देव म्हणून संबोधिल्याचें समाधान आपल्यास अुपभोगितां येअील, अुपकृत भक्तीचें फूल वाहून त्यास पूजितांहि येअील !

परंतु त्यापलीकडे ह्या विश्वाच्या देवांशीं, बाटच्या भिकारड्यानें सम्राटाशीं जोडूं पहावा तसा कोणचाहि बादरायणसंबंध जोडण्याची लचाळ हाव मनुष्यानें आमूलात् सोडून द्यावी हेंच अिष्ट ! कारण तेंच सत्य आहे ! आपलें चांगलें तें देव करील, देव चांगलें करील तर मी सत्यनारायण करीन, ही आशा, हा अवलंब, अगदीं खुळचट आहे ! कारण तो अगदीं असत्य आहे. ज्या ज्या संकटांतून आपणांस सोडविलें म्हणून आपण देवाचा सत्यनारायण करतों, त्या त्या संकटांत प्रथम आपणांस ढकलतो कोण ? तोच सत्यनारायण, तोच देव ! जो प्रथम आपला गळा कापतो आणि नंतर त्यास मलम लावतो त्याची मलम लावण्यासाठीं पूजा करावयाची तर प्रथम गळा कां कापलास म्हणून त्याची आधीं यथेच्छ शोभाहि करावयास नको काय ? विश्वाच्या देवाच्या ठायीं ह्या दोन्हीहि भावना अनाठायीं नी असमंजस आहेत.

ती विश्वाची आद्यशक्ति ज्या कांहीं ठराविक नियमांनीं वर्तते आहे ते तिचे नियम समजतील ते समजून घेऊन त्यांतल्या त्यांत आपल्या मनुष्यजातीच्या हिताला नी सुखाला पोषक होईल तसा त्यांचा साधेल तितका उपयोग करून घेणें इतकेंच मनुष्याच्या हातांत आहे. मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल तें चांगलें, प्रतिकूल तें वाईट, अशी नीति-अनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे. देवास आवडतें तें चांगलें, आणि मनुष्यास जें सुखदायी तें देवास आवडतें ह्या दोन्ही समजुती खुळचट आहेत; कारण त्या असत्य आहेत. विश्वांत आपण आहोंत पण विश्व आपलें नाहीं; फार फार थोड्या अंशीं तें आपणांस अनुकूल आहे; फार फार मोठ्या अंशीं तें आपणांस प्रतिकूल आहे- असें जें आहे तें नीटपणें, धीटपणें, समजून घेऊन त्याला बेधडकपणें तोंड देणें हीच खरी माणुसकी आहे! आणि विश्वाच्या देवाची खरी खरी तीच पूजा ! !

• • •

# खरा सनातन धर्म कोणचा ?

आज चालूं असलेल्या सामाजिक आणि धार्मिक चळवळीच्या दंगलींत, सुधारक म्हणजे जो सनातन धर्माचा अुच्छेद करूं पहातो तो, अशी 'सनातनी' म्हणविणाऱ्या पक्षाच्या परिभाषेंत सुधारक या शद्वाची परिभाषा ठरून गेली आहेसें दिसतें. लोकांसहि लहानपणापासून सनातन म्हणजे जीविरुद्ध ब्रहि न काढतां ती शिरसावंद्य मानणें हें धार्मिक कर्तव्य आहे अशी आज्ञा वा रूढी होय असें समजण्याची संवय लागून गेलेली असल्यामुळें अेखादी रूढी व्यवहारांत अगदीं ढळढळीतपणें हानिकारक होत आहे हें कळत असतांहि ती सनातन आहे अितकें म्हणतांच ती मोडण्याचें त्यांच्या जिवावर येतें आणि ती मोडूं पहाणारा सुधारक कांहींतरी अपवित्र, धर्मविरुद्ध अकर्म करूं निघाला आहे, असा त्यांचा अेक पूर्वग्रह सहजच होअून बसतो. लोकसमाजाचा हा पूर्वग्रह दूर करण्यासाठीं आणि आमच्या सनातनी बंधूंची ती व्याख्या किती योग्य वा अयोग्य आहे हें दोघांच्याहि स्पष्टपणें ध्यानांत यावें म्हणून या वादग्रस्त प्रकरणांतील

ता. २९

' सनातन धर्म ' ह्या दोन मुख्य शद्बांचा अर्थच प्रथम निश्चित करणें अवश्य झालेलें आहे. नुसतें हा सनातनी आणि तो सुधारक असें ओरडत राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

## आम्ही स्वतःस सनातन धर्माचे कट्टर अभिमानी समजतों.

आणि कित्येक सनातनी आपल्या आचरणानें पुष्कळ सुधारणांस अुचलून धरतांना आढळतात. अशा गोंधळांत सनातन धर्म म्हणजे काय याची आम्हीं आपल्यापुरती जरी निश्चित परिभाषा ठरविली तरी अनेक मतभेद नाहींसे होण्याचा आणि जे रहातील ते कां, कोणच्या अर्थी अुरतात तें अुभयपक्षांच्या स्पष्टपणें ध्यानांत येण्याचा बराच संभव आहे. यास्तव या लेखांत आम्ही सनातन धर्म ह्या शद्बास काय अर्थी योजतों त्या कोणचा अर्थी धर्म आम्हांस सनातन या पदवीस योग्य वाटतो तें थोडक्यांत निःसंदिग्धपणें सांगणार आहोंत.

ज्या अर्थी आज ते शद्ब योजले जातात ते अर्थ अितके विविध, विसंगत व परस्परविरुद्धहि असतात कीं, ते आहेत तसेच स्वीकारणें अगदीं अयुक्त व्हावें. श्रुति–स्मृतींपासून तों शनिमहात्म्यापर्यंतच्या साऱ्या पोथ्या आणि

## वेदांच्या अपौरुषेयत्वापासून तों वांग्याच्या अखेयत्वापर्यंतचे

सारे सिद्धांत सनातन धर्म या अेकाच पदवीस पोंचलेले आहेत. अुपनिषदांतील परब्रम्ह स्वरूपाचे अत्युदार विचार हेहि सनातन धर्मच आणि विस्तवापुढें पाय धरून शेकूं नये; कोंवळचा उन्हांत बसूं नये, लोखंडाचा विक्रय करणाऱ्यांचे अन्न कदापि खाअूं नये, रोगचिकित्सक वैद्यभूषणाचे अन्न तर घांवांतील पुवाप्रमाणें असून सावकारी करणाऱ्या, व्याजबट्टा घेणाऱ्या गृहस्थाचें अन्न विष्ठेप्रमाणें असल्यामुळें त्यांच्या घरीं वा सांगातीं केव्हांहि जेवूं नये ( मनु. ४, २२० );

गोरसाचा खरवस, तांदुळाची खीर, वडे, घारगे खाणें निषिद्ध असून लसूण कांदा आणि

**गाजर खाल्ल्यानें तर द्विज तत्काल पतित होतो.**

( पतेद्द्विजः ! मनु ५, १९ ); परंतु श्राद्धनिमित्त केलेलें मांस जो कोणी हट्टानें खात नाहीं तो अभागी अेकवीस जन्म पशुयोनि पावतो ( मनु ५, ३५ ) 'नियुक्तस्तु यथा न्यायं यो मांसं नात्ति मानवः । सप्रेत्य पशुतां याति संभवानेकविंशतिम् !!' हे सारे सनातन धर्मच. श्राद्धामध्यें भातापेक्षां ब्राम्हणास वराहाचें वा महिषाचें मांस जेवूं घालणें अुत्तम, कारण पितर त्या मांसाच्या भोजनानें दहा महिने तृप्त राहातात आणि वार्धीणस बोकडांचें मांस ब्राम्हणांनीं जर का खाल्लें तर भरभक्कम बारा वाजेपर्यंत पितरांचें पोट भरलेलें राहातें— वार्धीणसस्य मांसेन तृप्तिद्वादश-वार्षिकी ! ( मनु. ३, २७१ ) हाहि सनातन धर्मच; आणि कोणच्याहि प्रकारचें मांस खाअूं नये, 'निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् !' मांसाशनास्तव प्राणिवधास नुसतें अनुमोदिणारा देखील 'घातक' महापापी होय ( मनु ५. ४९-५१ ) हाहि सनातन धर्मच ! तोंडानें अग्नि फुंकूं नये, अिंद्रधनुष्य पाहूं नये, 'नाश्नीयाद् भार्यया सार्धम्'

**स्त्रीसह जेवूं नये,**

तिला जेवतांना बघूं नये, दिवसां मलमूत्रोत्सर्ग अुत्तराभिमुखच करावे, पण रात्रीं दक्षिणाभिमुख ( मनु ४, ४३ ) अित्यादि हे सारे विधिनिषेध तितकेच मननीय सनातन धर्म होत कीं, जितके 'संतोषं परमास्थाय सुखार्थी संयतो भवेत्, संतोषमूलं हि सुखं दुःखमूलं विपर्ययः ( मनु ४-१२ ) प्रभृति अुदात्त अुपदेश हे मननीय सनातन धर्म आहेत !!

ह्या अनेक प्रसंगीं अगदीं परस्परविरुद्ध असणाऱ्या विधि-निषेधांस आणि सिद्धांतांस सनातन धर्म हाच शब्द लुंगेसुंगे भाबडे लोकच लावतात असें नसून आपल्या साऱ्या स्मृतिपुराणांतील सनातन धर्मग्रंथांतूनच ही परंपरा पाडलेली आहे. वरील प्रकारच्या साऱ्या मोठ्या, धाकट्या, व्यापक विक्षिप्त शतावधिनी, क्षणिक आचारविचारांच्या अनुष्टुपाच्या अंतीं अगदीं ठसठशीतपणें ही अेकच राजमुद्रा बहुधा ठोकून दिलेली असते कीं, 'अेष धर्मस्सनातनः !'

आपल्या धर्मग्रंथांतच ही अशी खिचडी झालेली नसून जगांतील अितर झाडून साऱ्या अपौरुषेय म्हणविणाऱ्या प्राचीन आणि अर्वाचीन धर्मग्रंथांचीहि तीच स्थिति आहे. हजारों वर्षांपूर्वींच्या मोसेस पैगंबरापासून तों अगदीं आजकालच्या अमेरिकेंतील मोर्मन पैगंबरापर्यंत सर्वांनीं, मनुष्याच्या अुठण्या-बसण्यापासून,

**दाढी-मिशी-शेंडीच्या लांबीरुंदीपासून,**

वारसांच्या दत्तकांच्या लग्नाच्या निर्बंधांपासून तों देवाच्या स्वरूपापर्यंत आपल्या साऱ्या विधानांवर 'अेष धर्मस्सनातनः' हीच राजमुद्रा आणि तीहि देवांच्या नांवानें ठोकलेली आहे ! हे सारे विधिनिषेध देवानें साऱ्या मानवांसाठीं अपरिवर्तनीय धर्म म्हणून सांगितले आहेत ! सर्व मानवांनीं सुंता केलीच पाहिजे हाहि सनातन धर्म आणि त्रैवर्णिकांनीं तसें भलतेंसलतें कांहींअेक न करतां मुंजच करावी हाहि सनातन धर्मच ! लाक्षणिक अर्थीच नव्हे तर अक्षरशः ह्या साऱ्या अपौरुषेय अीश्वरी धर्मग्रंथांत

**अेकाचें तोंड पूर्वेस तर अेकाचें पश्चिमेस**

वळलेलें आहे ! आणि तेंहि अगदीं प्रार्थनेच्या पहिल्या पावलींच ! सकाळीं पूर्वेकडे तोंड करून प्रार्थना करणें हाहि सनातन धर्म आणि

सकाळीं देखील प्रार्थना म्हटली कीं ती पश्चिमेकडेच तोंड करून केली पाहिजे हाहि मनुष्यमात्राचा सनातन धर्मच ! अेकाच देवानें मनूला ती पहिली आज्ञा दिली नी महंमदाला ही दुसरी दिली ! देवाची अगाध लीला; दुसरें काय ! हिंदुमुसलमानांचे दंगे करवून आपण अंग राखून दुरून मौज पहात बसण्याचा आरोप शौकतअल्लीवर अुगीच करण्यांत येतो. हा खेळ चालू करण्याचा पहिला मान त्यांचा नसून असे अगदीं परस्परविरुद्ध प्रकार अपरिवर्तनीय सनातन धर्म म्हणून त्या दोघांसहि सांगून त्यांची झुंज लावून देणाऱ्या गमती स्वभावाच्या देवाचाच तो मान आहे ! ही मूळची त्याची लीला ! आणि त्याची नसेल तर त्याच्या नांवावर हे ग्रंथ चापून लादून देणाऱ्या मनुष्याच्या मूर्ख श्रद्धेची !

सारें रोम जळत असतांना सारंगी वाजवीत ती गंमत पहाणारा असा देवाला कोणी नीरो समजण्यापेक्षां मानवी मूर्खपणावरच वरील विसंगतीचा दोष लादणें आम्हास तरी अधिक सयुक्तिक वाटतें. या साऱ्या विसंगत आणि परस्परविरुद्ध गोष्टींस

**सब् घोडे बारा टक्के**

भावानें सनातन धर्म ही अेकच पदवी देण्यांत मानवी बुद्धीच चकली आहे. सनातन धर्म ह्या शद्बांचा हा रूढ अर्थच ह्या विसंवादाला कारण झाला आहे, आणि त्या शद्बाच्या मूळ अर्थाची छाननी करून त्याला संवादी असणाऱ्या गोष्टींसच तो शद्ब लावीत गेल्यानें ह्या मतामतांच्या गलबल्यांत खरा सनातन धर्म कोणता तें निश्चयपूर्वक नी पुष्कळ अंशीं निःसंदेहपणें सांगतां येतें अशी आमची धारणा आहे. त्या शद्बांच्या अर्थाची ती छाननी अशी :

—२—

सनातन शद्बाचा मुख्य अर्थ शाश्वत, अबाधित, अखंडनीय, अपरिवर्तनीय. धर्म हा शद्ब, अिंग्लिश 'लॉ' ह्या शद्बाप्रमाणेंच आणि तसाच मानसिक प्रक्रियेमुळें पुष्कळ अर्थांतरें घेत आला आहे.

(अ) प्रथम त्याचा मूळचा व्यापक अर्थ नियम. कोणत्याहि वस्तूच्या अस्तित्वाचें नी व्यवहाराचें जो धारण, नियमन करतो तो त्या वस्तूचा धर्म. सृष्टीचे धर्म, पाण्याचे धर्म, अग्नीचे धर्म प्रभृति त्यांचे अुपयोग ह्या व्यापक अर्थीच होतात. सृष्टिनियमांस 'लॉ' शद्बहि लावतातच, जसें 'लॉ ऑफ ग्रॅव्हिटेशन.'

(आ) ह्याच व्यापक अर्थामुळें पारलौकिक आणि पारमार्थिक पदार्थांच्या नियमांसहि धर्मच म्हणण्यांत येअूं लागलें. मग ते नियम प्रत्यक्षागत असोत वा तसे भासोत! स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, पुनर्जन्म, अीश्वर, जीव, जगत् यांचे परस्परसंबंध, ह्या साऱ्यांचा समावेश धर्म ह्या शद्बांतच केला गेला. अितकेंच नव्हे तर हळुहळु तो धर्म शद्ब या त्याच्या पारलौकिक विभागार्थंच विशेषेंकरून राखून ठेवल्यासारखा झाला. आज धर्म शद्बाचा विशेष अर्थ असा हाच होतो. कीं या अर्थी धर्म म्हणजे 'रिलिजन.'

(अी) मनुष्याचे जे अैहिक व्यवहार वरील पारलौकिक जगतांत त्यांस अुपकारक ठरतीलसें वाटलें, त्या पारलौकिक जीवनांत त्यांचें धारण करतील असे भासले, तेहि धर्मच मानण्यांत आले. अिंग्लिशमध्यें मोसेस, अब्राहिम, महंमद प्रभृति पैगंबरांच्या स्मृतींतहि अशाच खच्चून असलेल्या साऱ्या कर्मकांडास 'लॉ' च म्हटलें आहे. या अर्थी धर्म म्हणजे आचार.

(अु) शेवटीं वरील आचार वगळून मनुष्यामनुष्यांतील जे केवळ अैहिक प्रकरणींचे व्यवहार असतात त्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या वर्तननियमांसहि पूर्वी धर्मच म्हणत. स्मृतींत युद्धनीति, राजधर्म, व्यवहारधर्म प्रभृति प्रकरणांतून हे गोंवलेले असतात. पण आज यांपैकीं पुष्कळसा भाग स्मृतिनिष्ठ अपरिवर्तनीय धर्मसत्तेतून निघून आपल्या अिकडेहि परिवर्तनीय मनुष्यकृत नियमांच्या कक्षेंत, शास्त्रीपंडितांनांहि निषिद्ध न वाटावा अितक्या निर्विवादपणें समाविष्ट झालेला आहे. जसें गाडी हांकण्याचे निर्बंध, शिवीगाळ

चोरी, अित्यादिकांचें दंडविधान तो निर्बंधशासनाचा ( कायदे-शासनाचा ) प्रदेश होय. आपल्या अिकडे धर्म शद्व आज जसा 'रिलिजन' ह्या विशेषार्थी राखीव झाला आहे, तसाच अिंग्लिश-मध्यें 'लॉ' हा शद्व विशेषार्थी ह्या निर्बंधशासनास आज वाहिला जात आहे. ह्या प्रकरणीं धर्म म्हणजे निर्बंध (कायदा, 'लॉ').

--३--

या लेखास अवश्य तेवढा सनातन आणि धर्म ह्या शद्वांच्या अर्थाचा अुलगडा असा केल्यानंतर आतां धर्म शद्वाच्या या वरील विभागापैकीं कोणत्या विभागास सनातन हा शद्व यथार्थपणें लावतां येईल हें ठरविणें फारसें अवघड जाणार नाहीं. सनातन धर्म ह्याचा वर दाखवल्याप्रमाणें आमच्यापुरता तरी आम्हीं निश्चित केलेला अर्थ म्हणजे शाश्वत नियम, अपरिवर्तनीय, जे बदलूं नयेत अितकेंच नव्हे तर जे बदलणें मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे असे अबाधित जे धर्म असतील, नियम असतील, त्यांसच

## सनातन धर्म ही पदवी यथार्थपणें देतां येईल.

हें लक्षण वर धर्माचा जो पहिला विभाग पाडलेला आहे त्या सृष्टि-नियमांस तंतोतंत लागू पडतें. प्रत्यक्ष अनुमान आणि त्यांना सर्वस्वीं विरुद्ध न जाणारें आप्तवाक्य या प्रमाणांच्या आधारें सिद्ध होऊं शकणारें आणि ज्यांविषयीं कोणींहि यथाशास्त्र प्रयोग केला असतां त्या त्या कार्यकारणभावाच्या कसोटीस जे पूर्णपणें केव्हांहि अुतरूं शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यांत जे जे सृष्टि-नियम आणि जीं जीं वैज्ञानिक सत्यें आज आलेलीं आहेत त्यांस त्यांसच आम्ही आमचा सनातन धर्म समजतों. निःशेष परिगणनास्तव नव्हे तर दिग्दर्शनार्थ म्हणून खालील नामोल्लेख पुरे आहेत. प्रकाश, अुष्णता, गति, गणित, गणितज्योतिष, ध्वनि, विद्युत्, चुंबक, रेडियम,

क्रा. ता. ३५

भूगर्भ, शरीर, वैद्यक, यंत्र, शिल्प, वानस्पत्य, जैव आणि तत्सम जीं प्रयोगक्षम शास्त्रें ( सायन्सेस ) आहेत त्यांचे जे प्रत्यक्षनिष्ठ आणि प्रयोगसिद्ध नियम आज मनुष्यजातीस ज्ञात झालेले आहेत तोच आमचा खरा सनातन धर्म होय. ते नियम आर्यांसाठीं वा अनार्यांसाठीं, मुस्लिमांसाठीं वा काफरांसाठीं, अिङ्गराअिलांसाठीं वा हीदनांसाठीं अवतीर्ण झालेले नसून ते सर्व मनुष्यमात्रांस निःपक्षपाती समानतेनें लागू आहेत. हा खरा सनातन धर्म आहे. अितकेंच नव्हे, तर हा खराखरा मानवधर्म आहे. हा केवळ ' कृतेतु मानवो धर्मः ' नाहीं तर त्रिकालाबाधित मानवधर्म आहे; म्हणूनच त्यास सनातन हें विशेषण निर्विवादपणें लागूं पडतें. सूर्य, चंद्र, आप, तेज, वायु, अग्नि, भूमि, समुद्र प्रभृति पदार्थ ह्या, कोणी लोभाच्या लहरीप्रमाणें

**प्रसन्न वा रुष्ट होणाऱ्या देवता नसून**

ह्या आमच्या सनातन धर्माच्या नियमांनीं पूर्णपणें बद्ध असणाऱ्या वस्तु आहेत. ते नियम जर आणि ज्या प्रमाणांत मनुष्यास हस्तगत करतां येतील तर आणि त्या प्रमाणांत ह्या सर्व सृष्टिशक्तींशीं त्याला रोखठोक आणि बिनचूक व्यवहार करतां आलाच पाहिजे— करतां येतोहि. भर महासागरांत तळाशीं भोंकें पडलेली नाव सोडून मग ती बुडूं नये म्हणून जरी त्या समुद्रास प्रसादविण्यास्तव नारळांचे ढीग त्यांत फेंकले आणि अगदीं शुद्ध वैदिक

**मंत्रांत जरी टाहो फोडला**

कीं ' तस्मा अरं गमाव वो यस्य क्षयाय जिन्वथ। आपो जनयथा चनः। तरी तो समुद्र आमच्या 'जनां' सह त्या नावेस बुडविल्यावांचून' हजारीं नअुशें नव्याण्णव प्रसंगीं रहात नाहीं, आणि जर त्या नावेस वैज्ञानिक नियमांनुसार ठाकठीक करून, पोलादी पत्र्यांनीं मढवून ' बेडर ' बनवून सोडली तर तिच्यावर वेदांची होळी करून शेकणारे आणि पंचमहापातकांस पंचमहापुण्यें समजून दारू पीत, गोमांस खात, मस्त झालेले रावणाचे राक्षस जरी चढलेले असले तरी त्या

### वेद्वर रणनौस हजारीं नऊशें नव्याण्णव प्रसंगीं समुद्र बुडवीत नाहीं,

बुडवूं शकत नाहीं; तिला वाटेल त्या सुवर्णभूमीवर तोफांचा भडिमार करण्यासाठीं सुखरूपपणें वाहून नेतो ! जी गोष्ट समुद्राची तीच अितर महद्‌भूतांची. त्यांस माणसाळविण्याचे महामंत्र शब्दनिष्ठ वेदांत वा झेंडावेस्तांत, कुराणांत वा पुराणांत सांपडणारे नसून प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानांत ( सायन्समध्यें ) सांपडणारे आहेत. हा सनातन धर्म अितका पक्का सनातन, अितका स्वयंसिद्ध नी सर्वस्वीं अपरिवर्तनीय आहे कीं, तो बुडूं नये, परिवर्तन पावूं नये, म्हणून कोणताहि सनातन धर्मसंरक्षक-संघ स्थापण्याची तसदी कलियुगांत देखील घ्यावयास नको. कारण या वैज्ञानिक सनातन धर्मास बदलविण्याचें सामर्थ्य मनुष्यांत कोणासहि आणि कधींहि येणें शक्य नाहीं.

हीहि गोष्ट आम्ही जाणून आहोंत कीं, हे सनातन धर्म, हे सृष्टिनियम, संपूर्णपणें मनुष्याला आज अवगत नाहींत-बहुधा केव्हांहि तसे अवगत होणार नाहींत. जें आज अवगत आहेसें वाटतें त्याविषयींचें आमचें ज्ञान विज्ञानाच्या विकासानें पुढें थोडें चुकलेलेंहि आढळेल; आणि अनेक नवीन नवीन नियमांच्या ज्ञानाची भर तर त्यांत निश्चितपणेंच पडेल. जेव्हां जेव्हां ती भर पडेल वा तींत सुधारणा करावी लागेल जेव्हां तेव्हां आम्ही आमच्या या वैज्ञानिक स्मृतींत न लाजतां, न लपवितां किंवा

### आजच्या श्लोकांच्या अर्थाची अप्रामाणिक ओढाताण न करतां

नवीन श्लोक प्रगटपणें घालून ती सुधारणा घडवून आणूं; आणि उलट मनुष्याचें ज्ञान वाढलें म्हणून त्या सुधारणेचें भूषणच मानूं.

आम्ही स्मृतींस सनातन, अपरिवर्तनीय, समजत नाहीं तर सत्यास सनातन समजतों, अपरिवर्तनीय समजतों. स्मृति बदलाव्या लागतील म्हणून सत्यास नाकारणें हें घर वाढवावें लागेल म्हणून

## मुलांमाणसांचीच कत्तल

करण्यासारखें वेडेपणाचें आहे.

धर्म या शद्वाच्या पहिल्या विभागांत मोडणाऱ्या सृष्टिधर्मास सनातन हें विशेषण पूर्ण यथार्थतेनें लागूं शकतें हें वर सांगितलें. आतां त्या धर्म शद्वाचा जो दुसरा विभाग आम्हीं वर पाडला आहे त्या पारलौकिक आणि पारमार्थिक नियमांचा विचार करूं. या प्रकरणासच आज सनातन धर्म हा शद्व विशेषतः लावण्यांत येतो. अीश्वर, जीवजगत् यांच्या स्वरूपाचे नी परस्परसंबंधाचे अस्तिरूप किंवा नास्तिरूप कांहीं त्रिकालाबाधित नियम असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणें जन्ममृत्यु, पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्गनरक यांविषयींहि जी कोणची वस्तुस्थिति असेल ती निश्चितपणें सांगणारें ज्ञानहि त्रिकालाबाधित म्हणवून घेण्यास पात्र असणारच. यास्तव या पारलौकिक प्रकरणीचे सिद्धांतहि सनातन धर्म म्हणजे शाश्वत, अपरिवर्तनीय धर्म होत यांत शंका नाहीं.

परंतु त्या प्रकरणीं जी माहिती नी नियम मनुष्यजातीच्या हातीं आज असलेल्या यच्चावत् धर्मग्रंथांतून दिलेले आढळतात, त्यांतील अेकासहि सनातन धर्म, अपरिवर्तनीय, निश्चित सिद्धान्त असें म्हणतां येत नाहीं. निश्चित झालेल्या वैज्ञानिक नियमांप्रमाणें धर्मग्रंथांतील हें पारलौकिक वस्तुस्थितीचें वर्णन प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांच्या कसोटीस मुळींच अुतरलेलें नाहीं. त्यांची सारी भिस्त बोलूनचालून अेक्या शद्वप्रामाण्यावर, आप्तवाक्यावर, विशिष्ट व्यक्तींच्या आंतर अनुभूतीवर अवलंबून असतें. त्यांतहि फारसें बिघडलें नसतें. कारण कांहीं मर्यादेपर्यंत प्रत्यक्षानुमानिक प्रमाणांस अविरुद्ध असणारें शाद्वप्रमाण, आप्तवाक्य हेंहि अेक प्रमाण आहेच आहे. पण केवळ या प्रमाणाच्या कसोटीस देखील

**या धर्मग्रंथांतलि पारलौकिक विधान लवलेशहि अुतरत नाहीं.**

प्रथम आप्त कोण ?– तर आमच्या अिकडचे धर्मग्रंथच म्हणतात कीं, चित्तशुद्धीनें सत्वोदय झालेले ज्ञानी भक्त आणि समाधिसिद्ध योगी. चालेल; या पूर्णप्रज्ञ आप्तांत शंकराचार्य, रामानुज, मध्व, वल्लभ यांचा तरी समावेश केला पाहिजे ना ? महाज्ञानी कपिलमुनी, योगसूत्रकार पतंजलि यांनाहि गाळणें अशक्य. अुदाहरणार्थ, अितके आप्त पुरेत. आप्तवाक्य, शाद्बप्रमाण असेल तर ह्यांचा त्या त्या विशिष्ट वस्तुस्थितीचा अनुभव अेकच असला पाहिजे. पण पारलौकिक आणि पारमार्थिक सत्याचें जें स्वरूप आणि जे नियम ते प्रत्येकीं सांगतात ते प्रत्येकीं भिन्नच नव्हेत तर बहुधा प्रत्येकीं परस्परविरुद्ध असतात ! कपिलमुनि सांगणार–पुरुष नी प्रकृति हीं दोनच सत्यें आहेत; अीश्वरबीश्वर हम कुछ नही जानते ! समाधिसिद्ध पतंजलि सांगतात– 'तत्र पुरुषविशेषो अीश्वरः !' शंकराचार्य सांगतात–पुरुष वा पुरुषोत्तम अीश्वर हे मायोपाधि आणि मायाबाधित असून 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवोब्रह्मैवनापरः' अद्वैत हेंच सत्य ! रामानुज सांगतात–साफ चूक आहे हा प्रच्छन्न बौद्धवाद ! विशिष्टाद्वैत हेंच सत्य ! माध्व–वल्लभ म्हणणार, जीव आणि शिव भक्त आणि देव, जड आणि चेतन अेक म्हणतां तरी कसें ? द्वैत हेंच सत्य ! अशा या महनीय साक्षीदारांच्या स्वानुभूत शद्बांसरशीं गोंधळून बुद्धि जर अुद्‌गारली—

**"पाहियलें प्रत्यक्षाचि ! कथितों पाहियलें त्याला "॥**
**" वदति सारे ! आप्तचि सारे ! मानूं कवणाला ? "॥**

तर त्यांत तिचा काय दोष ? तरी आम्हीं या योगसिद्धांच्या साक्षींत त्या परम योगसिद्धाची– त्या तथागत बुद्धाची साक्ष काढली नाहीं ! देवविषयक हा यच्चयावत् विधानसमूह त्याच्या समाधिस्थ स्वानुभूतींत निव्वळ 'ब्रह्मजाल' म्हणून टाकाअू ठरला ! समाधिमय ज्ञान, स्वानुभूति ही ह्या पारलौकिक वस्तुस्थितीस अबाधित नी विश्वासार्ह प्रमाण कसें होअूं शकत नाहीं, निदान अजून शकलें नाहीं,

तें असें पाहिल्यावर अितकें सांगणें पुरें आहे कीं, शाब्दप्रमाणाचीहि स्थिति वरील आप्तप्रमाणासारखीच आहे. अपौरुषेय वेद ज्या कारणांसाठीं अपौरुषेय मानावे त्याच कारणांसाठीं तौलिद, अिंजिल, बायबल, कुराण, अवेस्ता, स्वर्णग्रंथ—अेक कां दोन ! जगांत जवळ जवळ जे पन्नासअेक ग्रंथ तरी आजहि अीश्वरप्रदत्त म्हणून प्रख्यात आहेत, तेहि सर्व अपौरुषेय मानणें भाग पडतें. आणि त्या प्रत्येकांत देवानें प्रत्येक तदितर अपौरुषेय धर्मग्रंथांतील पारलौकिक वस्तुस्थितीच्या दिलेल्या माहितीशीं आणि नियमांशीं विभिन्न, विसंगत नी विरुद्ध माहिती दिली आहे. वेद सांगतात, स्वर्गाचा अिंद्र हाच राजा ! पण बायबलाच्या स्वर्गांत

**अिंद्राचा पत्ता टपालवाल्याला देखील माहीत नाहीं.**

देवपुत्र येशूच्या कंबरेस साऱ्या स्वर्गाची किल्ली ! देव नी देवपुत्र दोघे अेकच ! Trinity in Unity, Unity in Trinity ! कुराणांतील स्वर्गांत 'ला अल्ला अिल्लिल्ला आणि महंमद रसुलल्ला!' तिसरी गोष्ट नाहीं. रेड अिंडियनांच्या स्वर्गांत डुकरेंच डुकरें, घनदाट जंगलें ! पण मुस्लीम पुण्यवंतांच्या स्वर्गांत असली 'नापाक चीज' औषधाला देखील सांपडणार नाहीं ! आणि ह्या प्रत्येकाचें म्हणणें हें कीं,

**स्वर्ग मी सांगतों तसाच आहे.**

प्रत्यक्ष देवानें हें सांगितलें, नव्हे, महंमदादि पैगंबर तर वर जाअून, राहून, स्वतः तें पाहून, परत आले नी त्यांनींहि तेंच सांगितलें ! तीच स्थिति नरकाची ! पुराणांत मूर्तिपूजक नी याज्ञिक तर काय, पण यज्ञांत मारलेले

**बोकड देखील स्वर्गांतच जातात !**

असा त्यांचा मेल्यानंतरचा पक्का पत्ता दिला आहे. पण कुराण शपथेवर सांगतें कीं, नरकांतल्या जागा, कितीहि दाटी झाली तरी, जर

कोणाकरितां राखून ठेवल्या जात असतील तर त्या ह्या मूर्तिपूजक आणि अग्निपूजक सज्जनांसाठींच होत ! मेल्यानंतरचा त्यांचा नक्की पत्ता नरक ! शद्बाशद्बांत भरलेली अशी विसंगति कुठवर दाखवावी ! हे सारे धर्मग्रंथ अपौरुषेय यास्तव खरे धरावे तरीहि त्यांत सांगितलेली पारलौकिक वस्तुस्थिति शाद्बप्रमाणानें देखील सिद्धांतभूत ठरत नाहीं—अन्योन्य व्याघातात् ! ते सारे मनुष्यकल्पित म्हणून खोटे मानले तर ती सिद्धांतभूत ठरत नाहींच नाहीं—वदतो व्याघातात् आणि त्यांपैकीं खरें आणि कांहीं खोटें मानावें तरीहि तें तसें नी हें असें कां, हें ठरविण्यास त्यांच्या स्वतःच्या शद्बावांचून दुसरें प्रमाणच नसल्यामुळें, ती सिद्धान्तभूत ठरत नाहीं ती नाहींच—स्वतंत्र प्रमाणाभावात् ! !

यास्तव प्रत्यक्ष, अनुमान वा शाद्ब यांपैकीं कोणच्याहि प्रमाणानें पारलौकिक वस्तुस्थितीचें आज अुपलब्ध असलेलें वर्णन हें सिद्ध होत नसल्यामुळें त्यास सनातन धर्म त्रिकालाबाधित नी अपरिवर्तनीय सत्य, असें म्हणतां येत नाहीं. तशा कोणच्याहि विधेयास तसें सिद्धान्तस्वरूप येतांच तेंहि आमच्या सनातन धर्माच्या स्मृतींत गोंवलें जाअीलच; पण आज तरी तो विषयच प्रयोगावस्थेंत आहे. आणि आप्तांचीं वा अपौरुषेय ग्रंथांचींहि तद्विषयक विधानें सिद्धान्त नसून क्लृप्ती ( हायपॉथेसीज ) आहेत, फार तर सत्याभास आहेत; पण सत्य नव्हे ! तें जाणण्याचा प्रयत्न यापुढेंहि व्हावयास पाहिजे. तथापि त्याविषयीं शक्य त्या क्लृप्ति योजून तें स्वर्गीय अृत आणि अनृत प्राप्त करून घेण्यासाठीं अितका अतिमानुष प्रयत्न करून

## अितक्या दिशांना तरी त्यांचा पत्ता लागत नाहीं

हें सिद्ध केल्याविषयीं आणि आपल्या देवतुल्य अवतारांनीं अखिल मानवजातीचा कुसुवा धन्य केल्याविषयीं नाचिकेतापासून तों नानकापर्यंतच्या या पुण्यश्लोकांचे आणि प्रेषितांचे, या श्रुतींचे आणि या

स्मृतींचे, आम्हां मानवांवर जे नानाविध अुपकार झालेले आहेत ते मात्र केव्हांहि फेडतां येणार नाहींत; ही कृतज्ञ जाणीव अिथें व्यक्तविल्यावांचून आम्हांस पुढचें अक्षर लिहवतच नाहीं !

—६—

शेवटीं राहतां राहिले धर्माचे शेवटचे दोन अर्थ. आचार आणि निबंध. या दोन्ही अर्थीं धर्म शद्बांस सनातन हें विशेषण लावतां येत नाहीं. मनुष्याचे जे अैहिक व्यवहार त्याच्या पारलौकिक जीवनास अुपकारक आहेत असें समजलें जाअी, त्यांस आम्ही आचार हा शद्ब योजतों. अर्थात् वर दर्शविल्याप्रमाणें पारलौकिक जीवनासंबंधीं अस्तिपक्षीं वा नास्तिपक्षीं अजून कोणताहि नक्की सिद्धान्त मनुष्यास कळलेला नसल्यानें त्याला कोणता अैहिक आचार अुपकारक होअील हें ठरविणें अशक्य आहे. हिंदूंच्याच नव्हे तर मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, यहुदी प्रभृति झाडून साऱ्या धर्मग्रंथांतील परलोकांपेक्षां कर्मकांडाचा पाया असा वाळूच्या ढिगावर उभारलेला आहे. 'क्ष' भू हें बेट कीं गांव, रान कीं वैराण, पूर्वेस कीं उत्तरेस, कीं आहे कीं नाहींच हेंच जिथें निश्चियलें गेलें नाहीं तिथें त्या 'क्ष' भूमध्यें सुखानें नांदतां यावें म्हणून कोणच्या वाटेनें जावें आणि कोणची शिधाशिदोरी तिथें अुपयोगी पडेल ह्याचे बारीकसारीक अपरिवर्तनीय नियम ठरविणें किती अनमानधपक्याचें काम ! तसेंच हें. यास्तव अमुक अैहिक आचारानें परलोकीं अमुक अुपयोग होतो असें सांगणाऱ्या कोणत्याहि नियमांस आज तरी सनातन धर्म म्हणजे शाश्वत अपरिवर्तनीय, नी अबाधित नियम असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. बाकी प्रश्न अुरला निबंधाचा (कायद्याचा); आणि मनुष्यामनुष्यांतील शिष्टाचाराचा. यांसहि स्मृतींत जरी 'अेष धर्मस्सनातनः' म्हणून म्हटलेलें असलें तरी ते

**सर्वथैव परिवर्तनीयच होते आणि असले पाहिजेत.**

स्मृतींतहि सत्यादि युगांतील सनातन धर्मांपैकीं कांहीं कलिवर्ज म्हणून पुढें त्याज्य ठरविले. म्हणजे काय? त्याचप्रमाणें बहुतेक 'अेष धर्मस्सनातनः' पुढच्याच अध्यायांतून आपद्धर्माच्या अनुष्टुपानें खरडून टाकले जातात. म्हणजे काय? म्हणजे हेंच कीं आपद् वा संपद् प्रसंगीं किंवा युगभेदानें परिस्थितिभेद झाला कीं हे निबंध बदलणेंच अिष्ट होय. अर्थात् ते अपरिवर्तनीय, सनातन नसून परिवर्तनीयच होत. मनूनें राजधर्मांत युद्धनीतीचा सनातन धर्म म्हणून जो सांगितला त्यांत चतुरंग दळाचा सविस्तर अुल्लेख आहे; पण तोफखान्याचा वा **वैमानिक दळाचा नामनिर्देशहि नाहीं.** आणि सैन्याच्या अग्रभागीं शौरसेनी लोक असावेत असें जें सांगितलें तें मनूच्या काळीं हितावह होतें म्हणूनच सांगितलें असलें तरीहि ह्या नियमांस अपरिवर्तनीय सनातन धर्म समजून जर आमचे सनातन धर्मसंघ आजहि केवळ धनुर्धरांना पुढें घालून आणि आठघोडी रथ सजवून एकाद्या युरोपच्या अर्वाचीन महाभारतांत शत्रूस–थरारविण्यासाठीं अगदीं श्रीकृष्णाचा पांचजन्य फुंकीत चालून गेले तर

**पांचजन्य करीतच त्यांना परत यावें लागेल**

हें का सांगावयास पाहिजे! हिंदुसेनेच्या अग्रभागीं मनुनिर्दिष्ट शौरसेनीय प्रभृति सैनिक होते तोंवर हिंदूंस मुसलमान धूळ चारीतच पुढें घुसत आले; पण मनुस्मृतींत ज्यांचें नांवगांवहि नाहीं ते मराठे, ते शीख, ते गुरखे जेव्हां हिंदुसेनेच्या अग्रभागीं घुसले तेव्हां त्याच मुसलमानांस तीच धूळ खावी लागली! आचार, रूढि, निर्बंध हे सारे मनुष्यामनुष्यांतील अैहिक व्यवहाराचे नियम

**परिस्थिति पालटेल तसे पालटीतच गेले पाहिजेत.**

ज्या परिस्थितींत जो आचार वा निर्बंध मनुष्याच्या धारणास आणि अुद्धारणास हितप्रद असेल तो त्याचा त्या परिस्थितींतील धर्म, आचार, निर्बंध. 'नहि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्तते, तेनैवान्यः प्रभवति सोपरो बाधते पुनः ॥' ( म. भा. शांतिपर्व. )

सारांश ( १ ) जे सृष्टिनियम विज्ञानास प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांतीं सर्वथैव अबाधित, शाश्वत, सनातन असे आढळून आले आहेत तेच काय ते खरे सनातन धर्म होत.

(२) पारलौकिक वस्तुस्थितीचें असें प्रयोगसिद्ध ज्ञान आपणांस मुळींच झालेलें नाहीं. यास्तव तो विषय अद्याप प्रयोगावस्थेंत आहेसें समजून त्याविषयीं अस्तिरूप वा नास्तिरूप कांहींच मत करून घेणें अयुक्त आहे. त्या पारलौकिक प्रकरणीं नाना क्लृप्ति सांगणारे कोणचेहि धर्मग्रंथ अपौरुषेय वा ओश्वरदत्त नसून मनुष्यकृत वा मनुष्यस्फूर्त आहेत. त्यांच्या क्लृप्ति प्रमाणहीन असल्यानें त्यांस सनातन धर्म, शाश्वत सत्य असें म्हणतां येत नाहीं.

(३) मनुष्याचे झाडून सारे अैहिक व्यवहार, नीति, रीति, निर्बंध हे त्यास या जगांत हितप्रद आहेत कीं नाहींत या

**प्रत्यक्षनिष्ठ कसोटींनेंच ठरविले पाहिजेत**

पाळले पाहिजेत, परिवर्तिले पाहिजेत. व ‘परिवर्तिनि संसारे’ ते मानवी व्यवहारधर्म सनातन असणेंच शक्य नाहीं, अिष्ट नाहीं. महाभारतामध्यें म्हटलें आहे तेंच ठीक कीं, ‘अतः प्रत्यक्ष मार्गेण व्यवहारविधि नयेत्.”

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

# यज्ञ [पूर्वार्ध]

## (१) यज्ञाची कुळकथा

मनुष्याला हवा तेव्हां नी हवा तितकाच अग्नि जेव्हां कृत्रिमपणें उत्पादितां आला, तेव्हां निसर्गावर अेक अत्यंत महत्वाचा विजय त्यानें संपादिला. बाष्प वा विद्युत् वा रेडिअमच्या शोधांनीं मनुष्याच्या संस्कृतीचें जसें अेकेक नवें युगचें युग प्रवर्तिलें, तसेंच अग्नीच्या शोधानेंहि मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंत प्रगतीचें अेक मन्वंतर घडवून आणलें. अर्वाचीन अैतिहासिक कालीं बाष्प वा विद्युत् किंवा रेडिअम यांचा शोध जितका अलौकिक तितकाच त्या प्राचीन पौराणिक कालांतील हा अग्नीचा शोधहि अेक अलौकिक आश्चर्य होतें !

यास्तवच त्या अग्नीचा शोध ज्या ज्या बुद्धिमान् पुरुषांनीं लावला त्यांना त्यांना त्या त्या प्राचीन लोकांत महर्षिपदाचा वा देव-

त्वाचा मान मिळाला. आपल्या वैदिक आर्यांत कांहीं ॠषींना अग्नीचे शोधक म्हणून दैविक शक्तिशाली मंत्रद्रष्टयासमान गौरविलें जातें. प्राचीन पारसिकांत आणि प्राचीन चिनी लोकांतही अग्नीचे शोधक, अग्नीची युक्ति काढणारे, अग्नीस प्रकटविणारे म्हणून ह्या वा त्या पुरुषांस त्यांच्या त्यांच्या धर्मग्रंथांतून देवकल्प स्थान प्राप्त झालेलें आहे. धर्मग्रंथांतील ह्या आख्यायिकांवरूनहि अग्नीची 'युक्ति' मनुष्यांत कोणींतरी 'शोधून' काढली असली पाहिजे हेंच सिद्ध होतें.

मनुष्यास, अगदीं प्राचीन काळीं अग्नीची युक्ति सुचण्याचे दोनच मार्ग संभवनीय असावेत. ज्या विस्तीर्ण रानावनांतून तो मनुष्य त्याच्या पशुकल्प वन्यावस्थेंत हिंडे, त्यांत जे बोलतां बोलतां झाडावर झाडें घांसून प्रचंड वणवे पेट घेत, ते सूक्ष्मपणें अवलोकीत असतां त्याचें 'घर्षण' हें कारण मनुष्याच्या लक्षांत हळूहळू आलें असावें. आणि त्या त्या लांकडांवर तीं तीं लांकडें घांसून पाहातांच ठिणगी अुडल्यावांचून राहात नाहीं हा नियम त्यास कळला असावा. आज अत्यंत तुच्छ नी अुपेक्षणीय वाटणारें तें हें दृश्य जेव्हां मनुष्यास दिसलें तेव्हां त्यास त्या प्राथमिक बुद्धीच्या युगांत केवढें आश्चर्य वाटलें असेल ! ज्या लांकडांस पेटतांक्षणींच तो जाळून भस्म करतो, तोच अग्नि ह्या लांकडाच्या पोटांत स्वच्छपणें राहातो, केवढें आश्चर्य ! मनुष्याच्या पाठीवर थापट मारतांच त्याचा तत्क्षणीं वाघ होअून अुठावा नी माणसें खात सुटावा असें कांहीं घडतांच आज जितकें आश्चर्य वाटेल, तितकेंच त्या वेळेस तें अद्‌भुत वाटलें असलें पाहिजे ! दुसरा संभव म्हणजे गारगोटीवर गारगोटी सहजगत्या आपटतां आपटतां ठिणगी उडून खालीं पसरलेल्या पालापाचोळ्यानें पेट घेण्याचा आणि वारंवार तेंच घडतां डतां अग्नीच्या अुत्पत्तीचा तो नियम ध्यानांत यावयाचा. होय ना होय, वन्यावस्थेंत मनुष्यांस या दोनीं-पैकींच कोणत्या तरी अेका नियमाचा पत्ता लागून अग्नीचा 'शोध',

# यज्ञ [पूर्वार्ध]

## (१) यज्ञाची कुळकथा

मनुष्याला हवा तेव्हां नी हवा तितकाच अग्नि जेव्हां कृत्रिमपणें अुत्पादितां आला, तेव्हां निसर्गावर अेक अत्यंत महत्वाचा विजय त्यानें संपादिला. बाष्प वा विद्युत् वा रेडिअमच्या शोधांनीं मनुष्याच्या संस्कृतीचें जसें अेकेक नवें युगचें युग प्रवर्तिलें, तसेंच अग्नीच्या शोधानेंहि मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंत प्रगतीचें एक मन्वंतर घडवून आणलें. अर्वाचीन अैतिहासिक कालीं बाष्प वा विद्युत् किंवा रेडिअम यांचा शोध जितका अलौकिक तितकाच त्या प्राचीन पौराणिक कालांतील हा अग्नीचा शोधहि अेक अलौकिक आश्चर्य होतें !

यास्तवच त्या अग्नीचा शोध ज्या ज्या बुद्धिमान् पुरुषांनीं लावला त्यांना त्यांना त्या त्या प्राचीन लोकांत महर्षिपदाचा वा देव-

त्वाचा मान मिळाला. आपल्या वैदिक आर्यांत कांहीं ॠषींना अग्नीचे शोधक म्हणून दैविक शक्तिशाली मंत्रद्रष्टयासमान गौरविलें जातें. प्राचीन पारसिकांत आणि प्राचीन चिनी लोकांतही अग्नीचे शोधक, अग्नीची युक्ति काढणारे, अग्नीस प्रकटविणारे म्हणून ह्या वा त्या पुरुषांस त्यांच्या त्यांच्या धर्मग्रंथांतून देवकल्प स्थान प्राप्त झालेलें आहे. धर्मग्रंथांतील ह्या आख्यायिकांवरूनहि अग्नीची 'युक्ति' मनुष्यांत कोणींतरी 'शोधून' काढली असली पाहिजे हेंच सिद्ध होतें.

मनुष्यास, अगदीं प्राचीन काळीं अग्नीची युक्ति सुचण्याचे दोनच मार्ग संभवनीय असावेत. ज्या विस्तीर्ण रानावनांतून तो मनुष्य त्याच्या पशुकल्प वन्यावस्थेंत हिंडे, त्यांत जे बोलतां बोलतां झाडावर झाडें घांसून प्रचंड वणवे पेट घेत, ते सूक्ष्मपणें अवलोकीत असतां त्याचें 'घर्षण' हें कारण मनुष्याच्या लक्षांत हळूहळू आलें असावें. आणि त्या त्या लांकडांवर तीं तीं लांकडें घांसून पाहातांच ठिणगी अुडल्यावांचून राहात नाहीं हा नियम त्यास कळला असावा. आज अत्यंत तुच्छ नी अुपेक्षणीय वाटणारें तें हें दृश्य जेव्हां मनुष्यास दिसलें तेव्हां त्यास त्या प्राथमिक बुद्धीच्या युगांत केवढें आश्चर्य वाटलें असेल ! ज्या लांकडांस पेटतांक्षणींच तो जाळून भस्म करतो, तोच अग्नि ह्या लांकडाच्या पोटांत स्वच्छपणें राहातो, केवढें आश्चर्य ! मनुष्याच्या पाठीवर थापट मारतांच त्याचा तत्क्षणीं वाघ होअून अुठावा नी माणसें खात सुटावा असें कांहीं घडतांच आज जितकें आश्चर्य वाटेल, तितकेंच त्या वेळेस तें अद्‌भुत वाटलें असलें पाहिजे ! दुसरा संभव म्हणजे गारगोटीवर गारगोटी सहजगत्या आपटतां आपटतां ठिणगी उडून खालीं पसरलेल्या पालापाचोळ्यानें पेट घेण्याचा आणि वारंवार तेंच घडतां डतां अग्नीच्या अुत्पत्तीचा तो नियम ध्यानांत यावयाचा. होय ना होय, वन्यावस्थेंत मनुष्यांस या दोनीं-पैकींच कोणत्या तरी अेका नियमाचा पत्ता लागून अग्नीचा 'शोध',

अग्नीची ' युक्ति ' सांपडली असली पाहिजे. आणि ज्यानें ती प्रथम काढली किंवा ती माहीत नसलेल्या लोकांत प्रथम प्रचारली तो मनुष्य, आज आपणांस बाष्पशक्तीचा वा बिनतारी तारायंत्राचा शोधक वाटतो त्याहून कितीतरी अधिक पटीनें त्याच्या युगांतील वन्य नी अप्रबुद्ध मनुष्यास ' अलौकिक ' वाटला असला पाहिजे.

मागच्या वन्य युगांतील अत्यंत पुढारलेल्या पण आजच्या वैमानिक युगाच्या मानानें अत्यंत मागासलेल्या अशा ज्या रानटींतील रानटी जाति आज सांपडतात त्यांच्यांत अग्नि अुत्पादिण्याची युक्ति म्हणजे वरील दोन्हींपैकीं कोणची तरी अेक वा दोन्ही तेवढयाच सांपडतात. तिसरी युक्ति त्यास ठाअूक असल्याचें बहुधा आढळत नाहीं. ह्या पुराव्यावरूनहि वरील तर्कासच बळकटी येते.

त्यांतहि वैदिक आर्यांच्या वेदकाळपूर्व परिस्थितींत जेव्हां केव्हां अग्नीची युक्ति सांपडली तेव्हां ती ज्वलनगर्भ काष्ठांच्या घर्षणाचीच असली पाहिजे हा तर्क आपल्या यज्ञसंस्थेंतील अग्नि अत्पादिण्याची जी क्रिया अत्यंत धर्म्य मानलेली आहे तीवरूनहि समर्थिला जातो.

धर्मसंस्कारांत ज्या ज्या क्रिया धार्मिक म्हणून चिरस्थायित्व पावतात, त्या बहुधा त्या त्या काळचा अितिहासच असतात. भूगर्भित स्तरांतून जशी त्या त्या काळची सृष्टिस्थिति नी समाजस्थिति चिरेबंद करून टाकलेली असते, तसेंच धार्मिक संस्कारांतून त्या त्या काळचें ज्ञान नी अज्ञान अस्थि-स्थिर ( Fossilized ) चिरेबंद नी चिरंतन करून ठेवलेलें असतें. अुदाहरणार्थ; विवाहाच्या वेळीं आपल्या महाराष्ट्रीय कुमारिका नेहमींप्रमाणें कासोटा न घालतां त्या धार्मिक विधीपुरतें बिनकासोटयाचें वस्त्र नेसतात. कारण जेव्हां हा विवाहविधि रचला, तेव्हांच्या आर्यकुमारिकांत कासोटयाची चाल नसावी. अुत्तरेकडे मूळ 'आर्यावर्तीत' अुच्च वर्णाच्या स्त्रियांत

आजहि कासोटा बहुधा नसतो. लग्नादि कार्यीं मुहूर्ताची नक्की शुभ वेळा साधणें अत्यंत महत्वाचें वाटत असतांहि तशी वेळा अचूकपणें दाखविणारें अगदीं अद्यावत् घडचाळ कोणीहि उपाध्याय ह्या धार्मिक विधींतल्या घटिकापात्र-पूजनांत पूजणार नाहीं, त्याला तें स्थान घेऊं देणार नाहीं. ह्या धार्मिक घटिकालयाचा मान त्या गंगाळांत तें भोंक पाडलेलें घटिकापात्र टाकून बनविलेल्या अत्यंत अडाणी घटिकापात्रालाच मिळणार! कारण? हेंच कीं जेव्हां हे विवाहविधि रचले वा रूढावले तेव्हां आपल्या लोकांचे अत्यंत सुधारलेलें घडचाळ म्हणजे गंगाळाचेंच होतें. त्यावर 'धर्मा' चा छाप पडतांच तें जें 'अस्थिस्थिर' होऊन बसलें तें बसलें. तीच गोष्ट विजेच्या वा ग्यासच्या आजच्या अद्यावत् प्रदीपाची! देवळांत वा घरांत ह्या लखलखीत दिव्यास देवपणाचा, पवित्रतेचा मान कांहीं मिळणार नाहीं. त्यांना संध्याकाळीं कोणींहि 'दीपो-ज्योति नमोस्तुते' म्हणून नमस्कार करणार नाहीं– तो दीपदेवतेचा मान मिळणार त्या मिणमिण्या पंथीला वा समओला; कारण आपल्या पूजाप्रभृति धार्मिक आचारांची ठेवण जेव्हां घडली गेली, तेव्हां त्या काळच्या सुधारलेल्यांत सुधारलेला दिवा होती ही पंथी वा समओी; धर्माचा छाप पडला तिच्यावर, त्यासरशीं तिचें पावित्र्य 'अस्थिस्थिर' होऊन बसलें. 'धर्माचा' दिवा त्या सनातन पंथीचा; असा मिणमिणा, काजळलेला, अुजेड थोडा–धूर फार! विज्ञानाचा दिवा विजेचा!! अद्यतन!!!

प्राचीन समाजस्थितीचा सांगाडा प्राचीन धर्मसंस्कारांतील तंत्रांतूनच बहुधा गाडलेला सांपडतो, या नियमाच्या अनुसंधानानें अग्नीची युक्ति वैदिक आर्यांच्या अत्यंत प्राचीन पूर्वजांस कशी सांपडली याचा पत्ता त्यांच्या अग्नि चेतविण्याच्या पुरातन धार्मिक तंत्रांत– म्हणजेच यज्ञविधींत –सांपडण्याचा पुष्कळ संभव असणारच. आणि ज्या अर्थीं यज्ञांतला पवित्र अग्नि म्हटला म्हणजे तो काष्ठा-

वर काष्ठ घांसूनच अुत्पादावा लागतो, त्या अर्थी त्या यज्ञीय तंत्रास रचणाऱ्या प्राचीन युगांत अग्नि चेतविण्याची अुत्कृष्ट युक्ति काष्ठावर काष्ठ घांसून ठिणगी पाडणें ही आणि हीच असली पाहिजे. आतां त्याहून अनेक पटीनें सुधारलेली आगपेटी वा वीज-बटनें जरी निघालीं आहेत, तरीहि धार्मिक अग्नि, समंत्रक वैदिक अग्नि चेतविण्याचा मान त्या अद्यतन साधनांस केव्हांहि मिळणार नाहीं. तो त्या पांच हजार वर्षांपूर्वीच्या, म्हणजेच पांच हजार वर्षांनीं मागसलेल्या, काष्ठावर काष्ठ घांशीत बसण्याच्या रीतीलाच मिळणार. कोणचेंहि अज्ञान वा अपकृष्ट प्रघात त्यावर धार्मिक छाप पडला कीं कसे 'सनातन' होअून बसतात, पवित्र होअून बसतात याचीं हीं मननीय अुदाहरणें होत. अद्यतन आगपेटीनें पेट-विलेला अग्नि जरी अग्नीच, तरी तो केव्हांहि यज्ञीय पूज्यता पाव-णार नाहीं. यज्ञीय पूज्यतेला पात्र असा अग्नि म्हटला कीं तो त्या पुरातन रानटी पद्धतीनें काष्ठावर काष्ठ घांशीत बसूनच पाडला पाहिजे !

अग्नि हवा तेव्हां पेटवण्याची ही युक्ति मनुष्यांस सांपडतांच त्याच्या जीवनावर केवढा क्रांतिकारक परिणाम झाला असेल ! त्याचें खाणें, पिणें, रहाणी, गति, स्थिति यच्चावत् प्रकरणीं केवढें प्रगतिपर मन्वंतर झालें असेल तें कल्पनेनें आपणांस सहज जाणतां येतें. काळ्याकभिन्न मध्यरात्रीस अेक प्रतिसूर्य, 'अुगव' म्हणतांच अुगवण्याचें सामर्थ्य मनुष्यांत आलें ! जन्मांध काळोखास डोळा फुटला—दिसूं लागलें ! त्या अग्नीच्या कृपेनें जें पचवितां येत नव्हतें तें अन्न मनुष्य पचवूं लागला, वितळवितां येत नव्हत्या त्या धातू वितळवूं लागला, काळोखांतील भयंकर भीतीला म्हणजेच भुतांना चक्क अुजेडाच्या तीक्ष्ण तरवारीनें कापून नाहीसें करूं लागला. अशा त्या अत्यंत तेजस्वी असतांहि मनुष्यास अेखाद्या सुहृदाप्रमाणें हांके-सरशीं पावणाऱ्या महत्सत्वाविषयीं मनुष्यास अत्यंत कृतज्ञता वाटावी

आणि मनुष्यानें साऱ्या 'चकाकणाऱ्यांत,' देवांत त्याला अत्यंत प्रिय नी पूज्य मानावें हें अगदीं साहाजिक होतें.

अग्नीची युक्ति सांपडली तरी ती फार सोयिस्कर नव्हती. भर रात्रीं चटकन् दिवा लावायचा तर काष्ठावर काष्ठ घांसून, ठिणग्या धरून, विस्तव करणें लांबणीचेंच काम, तीच अडचण गारगोटचांच्या युक्तींत. अर्थातच अेकदां केव्हांतरी सवडीअंतीं पेटवून ठेवलेला विस्तव तसाचा तसाच पेटलेला ठेवणें, धान्यासारखाच तें शिजविणाऱ्या विस्तवाचाहि स्थिर सांठा घरांत नेहमींचाच सज्ज असणें हेंच सोयिस्कर. त्या काळीं घासलेटासारखी ज्वालाग्राही नी आगपेटीसारखीं शीघ्रचेतन साधनें जवळ नव्हतीं. तेव्हां घरांत विस्तव सारखा पेटलेला ठेवणें किती सोयीचें नी अवश्य असे, तें अगदीं तीसचाळीस वर्षांपलीकडच्या अत्यंत आधुनिक काळांतील गृहीणीहि घरोघर सांगू शकतील. कारण या प्रौढ पिढीच्या बालपणापर्यंत घरांतील चुली महिनोगणतीं सारख्या पेटलेल्याच ठेवल्या जात. दिवसा सैंपाक संपला कीं, राखेखालीं गोवऱ्यांचीं खांडें खुपसून शिलगलेलीं ठेवायचीं; तींच हवीं तेव्हां ढोंसून पुन्हां भडकायचीं, रात्रींचा सैंपाक झाला कीं पुन्हा राखेंत गोवऱ्यांचीं खांडें शिलगत रात्रभर ठेवायचीं, सकाळीं पुन्हा भडकावून चुलीवर सैंपाक चालू. असा क्रम सतत घरोघर चालला असल्यानें बहुतेक घरीं चारचार महिन्यांपूर्वीं केव्हांतरी पेटविलेला विस्तव मध्यें मुळींच न विझतां महिनोगणतीं सारखा जिवंत राहिलेला असे. जर तीस वर्षांपूर्वीं ही स्थिति, तंर तीनचार हजार वर्षांपूर्वीं विस्तव सारखा जिवंत ठेवणें किती सोयीचें नी अवश्य वाटत असेल तें सहज ध्यानांत येतें.

अग्नीच्या अत्यंत अुपयुक्ततेमुळें तें दैवी तेज जसें देवांतील अत्यंत प्रिय नी पूज्य देव झालें, तसेंच अग्नि सतत पेटत ठेवण्याची त्या देवाचें अस्तित्व नी अुपस्थिति आपापल्या गृहांत सतत शक्य करण्याची ही क्रियाहि तिच्या अत्यंत अुपयुक्ततेमुळेंच अेखाद्या

दैविक, धार्मिक, पवित्र, क्रियेसारखी कर्तव्य होअून बसली, संस्कार होअून बसली, अग्निहोत्रपद पावली ! पारसिकांत पूजेचा अग्नि पिढ्यान् पिढ्या विझूं दिला जात नसे. पडपणजोबांनीं काष्ठावर काष्ठ घांसून वा गारगोटीनें अेकदां जी ठिणगी पाडली तिची अव्याहत वंशपरंपरा, तो अग्नि, केव्हांहि न विझतां चारचार तर काय, पण चौदा चौदा पिढ्याहि सारखा जिवंत ठेवण्यांत येअी: – तीच अुपपत्ति आमच्या अग्निहोत्राच्या संस्थेचीहि असावी.

चूल वा चिलीम पेटविणाऱ्या व्यावहारिक आगीचें देवीकरण म्हणजेच अग्निदेव, यज्ञीय अग्नि ! आणि चुलींत ती आग सारखी पेटत ठेवण्याची व्यावहारिक सोयीची जी क्रिया, तिचें देवीकरण म्हणजेच अग्यारी, अग्न्यागार, वा अग्निहोत्र. अेक प्राकृत, घराअु, अैहिक व्यवहाराचा शद्ब, दुसरा संस्कृत, देवाळु, पारलौकिक धर्माचा शद्ब; अितकाच काय तो त्या दोन शद्बांत असलेला भेद सोडला तर सदा शिलगलेली चूल हीच अग्निहोत्राची वा अग्यारीची आअी आहे.

त्यांतहि घरांत वा झोंपडीपाशीं आगोटी सदोदित पेटलेली असण्याची आवश्यकता शीत प्रदेशांत राहाणाऱ्या लोकांतच जास्त असणार. आजहि अिंग्लंड, जर्मनी, रशियासारख्या देशांतून बैठकींत, बंगल्यांत, सभागृहांत, देवालयांत, नाटचगृहांत–बसाल तिथें अेकेक जुनी शेकोटी किंवा अद्यतन पद्धतीचे स्टोव्ह किंवा गरम पाण्याचा नळ अित्यादि साधनांनीं कृत्रिम अुष्णता नेहमीं ठेवावी लागते. साठसत्तर वर्षांपूर्वी शेगड्या नी आगोटचाच सर्वत्र पेटवून ठेवलेल्या असत. अशा शीत प्रदेशांत सदा धगधगलेल्या अग्निहोत्राचें व अग्यारींचें सर्वकालीन सान्निध्य, धार्मिक कर्तव्य म्हणूनच नव्हे तर अैहिक आवश्यकता ह्या दृष्टीनेंहि, सुखप्रदच वाटणारें होतें. अुष्ण देशांतहि अत्यंत अुपयुक्त असलेला अग्नि नेहमीं प्रज्वलित ठेवणें त्या वन्य नी अर्धसंस्कृत स्थितींत आवश्यक असेच, पण अुष्ण देशांत

दा. क्र. ५५८२



ती आवश्यकता होती तर शीत प्रदेशांत सतत प्रज्वाळलेल्या अग्नीचें साहचर्य ही केवळ आवश्यकताच नसून आवडहि असे. यामुळें अुष्ण देशांत आगीचें स्तोम अितकें न माजतां तें शीत प्रदेशांतच माजणें अधिक संभवनीय होतें. त्यांतहि हिमप्रदेशांत तर आग– अुष्णता म्हणजेच जीवन होतें ! जीभ बाहेर काढतांच गारठून चाटायच्या पदार्थासच जिथें चिकटून बसावयाची अशा भयंकर रक्त गोठणाऱ्या थंडींत हिममय प्रदेशांत अग्नीचे मोठमोठे ढिगारे वस्तीच्या नाक्या-नाक्यावरूनहि पेटवीत राहिलें तरी तें हवेसेंच होतें, आवडणारेंच होतें, आवश्यकहि होतें. अुष्ण प्रदेशांत आधींच आंगाला उकाड्यानें घामाच्या जिथें धारा लागणार–तिथें मोठ्यामोठ्या होळ्यांस गांवां-तून नी शेकोट्यांस घरांतून आवडीनें कोण पेटवूं अिच्छिणार ? यावरून असें अनुमान सहज निघूं शकतें कीं, अग्निपूजा, अग्निहोत्रें, अग्न्यागारें, आणि महिनोगणती, वर्षोगणतीं सारखे भडकलेले मोठमोठे यज्ञ ह्या सर्व धार्मिक संस्था कोण्यातरी हिम प्रदेशांत किंवा शीत प्रदेशांतच त्यांतल्या त्यांत प्रथमतः अत्यंत प्रिय नी पूज्य मानल्या गेल्या असाव्या, 'धर्म' होऊन बसल्या असाव्या. प्रथम आवश्यकता नंतर आवड, नी शेवटीं देवीकरण,–धर्मीकरण अशा परंपरेनें अग्निपूजा 'यज्ञ' ही संस्था हिमप्रदेशांतच अद्भविली गेली असण्याचा फार संभव वाटतो. तिला अेकदां दैवी, धार्मिक, पारलौकिक स्वरूप मिळाल्यानंतर मग ती त्या हिम वा शीत प्रदेशांतील जे दुसऱ्या देशांत वसत गेले ते लोक, त्या यज्ञादिक अग्निपूजेची आवश्यकता वा सुखद साहचर्य ज्या ठिकाणीं वा काळीं तितकें अुरलें नव्हतें तिथेंहि त्याच संस्थांस धर्मसंस्था म्हणून स्थापिते झाले, त्यांना अंधश्रद्धेनें अुष्ण प्रदेशांतसुद्धां तितका उपयोग नसतांहि तितकेंच चिकटून राहिले असावे.

आमच्या या तर्कास आज अुपलब्ध असलेला प्राचीन संस्कृतीचा अितिहास आणीत असेल तर बळकटीच आणतो. अुष्ण प्रदेशांत

ज्ञात काळाच्या अगदीं आरंभापासून निवसणाऱ्या राक्षस ( निग्रो-प्रभृति ) लोकांत यज्ञसंस्था जन्मली नाहीं, अितकेंच नव्हे तर ती कळली तेव्हांहि ती त्यांना केव्हांहि आवडली नाहीं. हिमप्रदेशांत विकसलेल्या संस्कृतीच्या पारसिक नी भारतीय अनुयायांतच ती अग्निपूजा मुख्यत्वेंकरून जटिल कर्मकांडाचें धार्मिक केंद्र होअून बसली. हिम वा शीत प्रदेशांत आर्य लोक असतां अग्नीचें सतत साहचर्य अपरिहार्यच व हें तर सुखकरहि वाटणें साहाजिकच होतें. मोठमोठ्या होळ्या अिंग्लंडमध्येंहि कांहीं धार्मिक सणांत पेटवितात. असहनीय शीतऋतूंत गांवोगांवीं त्या सुखकरच होतात. ह्या आर्यप्रभृति जाति अुष्ण प्रदेशांत आल्यानंतरहि ती अग्निपूजा नी यज्ञसंस्था जी असुखोदर्क असतांहि सोडूं शकले नाहींत तो तिच्या देवीकरणाचा—धार्मिकीकरणाचा परिणाम.

## २ सद्यःकालीं यज्ञाचे व्यावहारिक लाभ.

यज्ञसंस्थेच्या या कुळकथेवरून जर कांहीं स्पष्ट होत असेल तर तें हेंच कीं, ज्या आवश्यकतेमुळें ती अग्निपूजा वा यज्ञसंस्था निर्माण झाली आणि व्यावहारिक दृष्टीनें अुपयुक्त ठरली त्यांतील अेकहि आवश्यकता आज अुरली नसल्यामुळें आपल्या हिंदुस्थानसारख्या अुष्ण प्रदेशांत तर ती अगदीं अनवश्यक, अपायकारक अतअेव अैहिक दृष्ट्या तरी टाकाअूच ठरत आहे. अर्थात् तिची आज जरी आवश्यकता नसली तरीहि मनुष्यजातीस पूर्वी अेकदां होती हें मात्र विसरतां कामा नये. आणि त्या त्या संस्थेच्या ह्या पूर्वसेवेविषयीं तिचें आम्हीं सदैव कृतज्ञच राहिलें पाहिजे. ज्या प्राचीन पूर्वजांना ती अत्यावश्यक नी अतिप्रिय वाटली, त्यांच्या परिस्थितींत ती तशीच वाटणें साहाजिक असल्यानें तिला संगोपिण्यांत ते हास्यास्पद ठरत नाहींत; पण ती परिस्थिति आमूलाग्र बदलली असतांहि, त्या काळचें सृष्ट पदार्थाविषयींचें अज्ञान आज पुष्कळ अंशीं नाशलें असतांहि, आजहि

त्या अज्ञानासच धर्म समजून त्याची पूजा करीत राहाणें हा आमचा मूर्खपणा होय. हास्यास्पद आम्ही ठरत आहोंत. अुपयुक्त यज्ञाच्या कुळकथेंत स्पष्ट झालेले तिचे अुपयोग आज अनवश्यक नव्हेत तर अगदीं टाकाअू कसे ठरतात ते पहा :–

( १ ) ज्या कोण्या थोर नी बुद्धिमान् शोधकांनीं त्या अत्यंत अडाणी युगांत कृत्रिम अग्नीचा शोध लावला त्यांचे मनुष्यजातीवर अुपकार आहेत. त्यांचें अुतराअी व्हावयाचें म्हणजे अितकेंच करावयाचें कीं, त्या गारगोटयांतून चमक पाडणाच्या युक्तीपासून तों आजच्या दूरदर्शक ( Teelvision ) यंत्रापर्यंतच्या थोर थोर शोधकांत, त्या अग्निशोधकांत, त्या अग्निशोधक म्हणून पुरातन ग्रंथांत कीर्तिलेल्या ऋषींची गणना करून त्यांची स्मृति कृतज्ञपणें अमर ठेवावी परंतु अग्नि पेटविण्याची युक्ति त्यांना त्या अत्यंत अडाणी युगांत सुचली एवढेंच काय तें तिचें खरें महत्त्व असतां त्या युक्तीचा येवढा बडेजाव आजहि करावयाचा कीं तिच्यापुढें आजच्या अग्निविषयक साऱ्या कळी, यंत्रशोध नी शास्त्रें कुचकामाचीं ठरवावयाचीं, केवळ 'मानवी' मानायचीं–आणि आज अगदीं रानटी ठरणारी ती लांकडांवर लांकडें घासून ठिणगी पाडण्याची रीत तेवढी अेकदम 'दैवी' ठरवायची, वेदांच्या पवित्र मंत्रावांचून जें आचरणें पाप असा 'धार्मिक' 'संस्कार' मानावयाचा–हा निर्भेळ खुळेपणा नव्हे काय ? वास्तविक पाहतां काष्ठांवर काष्ठ नी गारगोटीवर गारगोटी घासून ठिणगी पाडणें हा अग्निविद्येंतील बिगरयत्तेचा धडा. कुठें ती ठिणगीची युक्ति नी कुठें आजची ती भर काळोख्या रात्रीं प्रतिसूर्यासमान भर मध्यान्ह करून सोडणारी शोधज्योतीची ( Search Light ) कळ ! तिला मानवी म्हणणें नी गारगोटी घांसण्यास 'दैवी' पावित्र्य समजणें, शोधज्योतीचा महत्प्रकाश ओंवळा नी ती चिलीम पेटविण्यासाठीं खेडवळ जी ठिणगी पाडतो ती सोंवळी मानणें, शोधज्योतीचा उद्भावक साधा माणूस, लांकडावर लांकूड घांसून

ठिणगी पाडणारा तो अृषि' 'देव' मानीत राहणें म्हणजे बिगर यत्तेच्या पंतोजीला भास्कराचार्याहूनहि थोर अशी गणितशास्त्रपारंगततेची पदवी येवढ्यासाठीं देणें होय कीं त्यानें प्रथम शिकविला म्हणून मला बे अेके बेचा पाढा तोंडपाठ येतो. म्हणून बिगरीचा पंतोजी 'अृषि'–आणि बे अेके बे चा पाढा तेवढा अीश्वरीय गणित ! भास्कराचार्यांचें सारें गणितशास्त्र केवळ मानवी तुच्छ गणित ! ! सनकाडानें पूर्वी दिवा लावीत, नंतर आगपेटी निघाली; यास्तव देवाचा दिवा म्हटला कीं, सनकाडीनें लावावयाचा, आगपेटी अपवित्र ! वास्तविक ज्या आगपेटीनें अग्नि पेटींत दास करून ठेवला तिनेंच यज्ञाचा अग्नि चेतवावयास हवा. यज्ञांत ज्या लांकडांस घांसून ठिणगी पाडतात त्यांची स्तुति करणारीं स्तोत्रें आहेत !–पण आगपेटीला फुलाची पाकळी देखील वाहात नाहींत. याचें कारण अितकेंच कीं, यज्ञ निघाले तेव्हां त्या 'त्रिकालदर्शी' मंत्रद्रष्टयांस साधी आगपेटीची युक्ति दिसली नाहीं. जर त्या वेळीं आगपेटी असती तर तिच्यावर दोन चार अृचा रचल्या जाअून घंटेची, कलशाची, फार काय पण शंखाची देखील जिथें पूजा असते त्या विधींत आगपेटीची पूजाहि असती. ती कला तेव्हां माहीत नव्हती हा त्यांचा दोष नव्हे पण आज ती कला माहीत झाली असतांहि पुन्हा आपलें पवित्र अग्नि म्हटला कीं तो लांकडें घांसण्याच्या रानटी पद्धतीनेंच पाडला पाहिजे ही समजूत आम्हींहि अुराशीं धरणें म्हणजे रानटी अज्ञान हेंच अीश्वरी ज्ञान, पवित्र ज्ञान असें मानण्याचा मूर्खपणा करणें होय.

(२) जी स्थिति गारगोट्यांच्या ठिणगीची, सनकाडीची तीच पुढें आगपेटीचीहि. आगपेटी निघाली तेव्हां तो शोध अितका अपूर्व, अुपयुक्त नी महाग होता कीं, अिंग्लंडांत बरींच वर्षें वीसपंचवीस रुपयाला आगपेटीचें अेक डझन मिळत नसे ! पुढें तिच्याहूनहि सोयिस्कर युक्त्या निघाल्या आणि आज हातांत आगपेटी घेअून रस्त्यानें

रात्रीं जाणारा माणूस विरळा होऊन ज्याच्या त्याच्या हातीं हातचमक (Hand-Battery) नी घरीं खोल्याखोल्यांतून वीजबटन झळकूं लागलें; आगपेटी दीडदमडीची वस्तु झाली. पण आगपेटीच्या आविष्कर्त्याचा सन्मान म्हणून जर कोणीं अर्वाचीन धर्मपंथ हातचमक वा वीजबटन याला अपवित्र वस्तु मानूं लागला नी दैवी अग्नि म्हटला कीं, देवाचा दिवा म्हटला कीं, तो आगपेटीनेंच पेटविला पाहिजे म्हणून सांगूं लागला तर तो आगपेटीपूजक धर्मपंथ जसा अडाणी ठरेल तसाच हा प्राचीन गारगोटी वा लाकूडघाशी अग्निपूजक पंथहि आज अडाणीच मानला पाहिजे; सोडून दिला पाहिजे.

(३) अग्नि हवा तेव्हां पेटविणें कठीण होतें तेव्हां तो घरांत वा गांवांत सतत पेटता ठेवणें सोयीचें होतें हा जो अग्निहोत्राचा व्यावहारिक अुपयोग नी अुगम, तोहि आतां मागासलेला पक्ष जुना अंक (Back Number) झाला आहे. कारण आतां अग्नि हवा तेव्हां काडी ओढली कीं पेटवितां येतो, फुंकर घालतांच विझवितां येतो. मंत्र नको कीं तंत्र नको, तें सारें अगडबंब अग्निहोत्र आज अेक टीचभर आगपेटींत कोंबून खिशांत वा कोनाड्यांत माणसाळवून ठेवतां येतें. सारखें सर्पण ढोशीत त्यास पोसण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. कुंडांतील वा चुलींतील अग्निहोत्रास सारखें पेटलेलें ठेवण्यांत त्याच अग्निनारायणानें भडकून घर वा यजमानच जाळून टाकण्याचा जो अपघात होण्याचा संभव होता तो आगपेटींत फार कमी. आणि आगपेटींत जी भीति होती ती बिनधोक आगपेटी (Safety Match) निघाल्यापासून तर मुळींच अुरली नाहीं. त्यांतहि आतां अग्नीचेंच व्यावहारिक महत्त्व गॅस नी वीज यांच्या माणसाळविण्यामुळें मुळांतच घटलें आहे. अग्निहोत्र प्रथम आगपेटींत अंतर्धानलें नी नंतर आगपेटीहि वीजबटनांत अंतर्धानली ! स्टोव्हची राजवट चालू होतांच त्या धुरकट चुलीचें तिरसट सासूबाओपण नाहींसें झालें आणि आतां तर आगीचा, धुराचा क्वचित् अुष्णतेचाहि

त्रास नामशेष करणाऱ्या 'प्रकाशचुली' सूर्यकिरणाच्या योगेंच चालणारे स्टोव्ह निघूं लागले आहेत. आतां लवकरच सूर्यकिरणांच्या वा प्रकाशकिरणांच्या केंद्रीकरणानें रात्रीं वा दिवसां चटकन् पेटणारा नी पटकन् विझणारा स्टोव्ह निघत आहे. त्याला तेल नको, गॅस नको, अग्नीहि नको—मग धुराची गोष्टच दूर. त्या प्रकाशचुलीवर हवा तेवढा सैंपाक करावा. किरणांस विशिष्ट पद्धतीनें केंद्रविणाऱ्या कांहीं कांचा त्यांत अशा जुळविलेल्या असतात कीं, सूर्यप्रकाश असो वा नसो तो पेटतो नी सैंपाक होऊं शकतो. आजवर अग्नि मनुष्याचा सैंपाकी होता, आतां सूर्य सैंपाकी होणार आहे. ज्या सूर्याची लहर लागावी म्हणून मंत्र म्हणत, गायत्री जपत, अर्घ्य देत त्या सूर्यनारायणास आराधिल्यानें नव्हे तर अेखाद्या निर्जीव पदार्थासारखा सृष्टिनियमानुसार नुसता राबविल्यानें ! वेदांपेक्षां विज्ञानानें हे सूर्य, अग्नि, प्रकाश, वीज, मरुत्, सोम कसे तत्काळ बिनचूक नी हटकून माणसाळले जातात तें पहा ! सैंपाक करणाऱ्या स्त्रियांना ह्या अेका 'प्रकाशचुली नें त्या प्राचीन शंभर शंभर अग्निहोत्रांनीं पावता ना, तसा अग्नि पावणार आहे, 'होती ना' तशी सोय होणार आहे नी त्या आमच्या चुलीपासून किंवा अग्निहोत्रापासून साडी पेटविणारा वा घर जाळणारा धोका, डोळे धुरानें लाल करणारा त्रास, नी फुंकणीची फूं फूं नीं लांकडें ढोंसण्याची खटपट साफ नाहींशी होणारी आहे.

सैंपाकास स्टोव्ह नी प्रकाशचूल, अुजेडास बिनधोक आगपेटी, वीजबटणें, हातचमक्या ( Hand–batteries ) गॅस नी शोधज्योति ( Searchlights ); गतीस पेट्रोल नी वीज, अुबेस तप्तजलाच्या वा विजेच्या घरभर फिरविलेल्या नलिका; फार काय अत्यंत कडक हिंवाळ्यांतहि अंगाची उष्णता हवी तितकी मोजून ठेवतां यावी अशी आगतार दोऱ्यासारखी विणलेलीं वस्त्रेंहि निघण्याचा उत्कट संभव. हीं सारीं ज्या विज्ञानयुगांत मनुष्याच्या सेवेसाठीं हात जोडून दासांसारखीं मनुष्यापुढें उभीं राहाता आहेत, त्या

विज्ञानयुगांत अग्नीचें तें प्राचीन वैदिकयुगांतील स्तोम साफ नाहींसें झालेलें आहे. आतां आगीचा मनु संपला असून विद्युत रेडियमचें मन्वंतर चालू आहे. अग्निपूजेपासून प्राचीन काळीं होणारे व्यावहारिक लाभ आतां मुळींच होणारे नसल्यामुळें आणि त्याची निर्जीव भावनाशून्य नी नियमबद्ध जड द्रव्यांत गणना झाल्यामुळें त्याचें देवत्वच नव्हे तर राक्षसत्वहि नष्ट झालें आहे. तिथें त्या अग्नीची पूजा कसली, प्रार्थना कसली, नसती पर्वा कसली !

(४) अग्नीच्या अुपयुक्ततेंतून अग्निपूजा निघाली आणि अग्निपूजेंतून यज्ञसंस्था, हें वर दिलेल्या यज्ञाच्या कुळकथेवरून अुघड होतें. पैकीं अग्नीचे जें अनन्यसामान्य उपयोग नी दुर्लभत्व प्राचीन वैदिक युगांत होतें तें आतां मनुष्यास वैज्ञानिक प्रगतीमुळें या वैज्ञानिक युगांत राहिलेलें नाहीं हें वर दाखविलेंच आहे. त्यांतहि हिमप्रदेशांत वा शीतभूभागांत अग्नीचें जें साहचर्य सुखकर वाटतें तें आजच्या या हिंदुस्थानच्या अुष्ण भूभागांत अत्यंत असहनीय झालेलें आहे. घरांत अगदीं अवश्य म्हणून तास अर्धा तास पेटलेली चूल देखील जिथें सहन होत नाहीं, नुसत्या बसण्याअुठण्याच्या हालचालीनेंहि अंगांतून घामाच्या धारा ज्या अत्युष्ण वायुमानांत निघतात नी अुन्हाच्या तिरपीसरशीं माणसें मरतात अशा देशांत नी ऋतुयानांत हौसेनें अग्निहोत्रांच्या होळ्या घरोघर पेटवून ठेवणें किंवा सार्वजनिक यज्ञांच्या आगीचे डोंब महिनोगणतीं मैदानांतून भडकवीत बसणें केवळ असह्य नी तामस धर्माचार होत. असला 'धर्ममप्यसुखोदर्कम् लोकविक्रुष्टमेवच' अधर्मासारखा त्याज्य होय. मग ज्या केवळ व्यावहारिक दृष्टीनेंच आपण या लेखांकांत अग्नीकडे पहात आहोंत, त्या व्यावहारिक दृष्टीनें तर अुष्ण प्रदेशांत अत्यंत कष्टप्रद असणारी ही चाल ती पूर्वी हिमप्रदेशांत सुखकर होती म्हणूनच केवळ आजहि निष्कारण पाळीत बसणें म्हणजे लहानपणीं लांकडी घोड्यावर बसून भागे म्हणून

मोठेपणींहि खऱ्या घोड्यावर बसण्याच्या प्रसंगीं लांकडी घोड्यावर बसून पहाण्यासारखें खुळचटपणाचें आहे.

(५) यज्ञसंस्थेनें भूतकालांत आपल्या भारतीय आर्यांवर अेवढी छाप जी पाडली त्याचें आणखी एक त्या काळीं प्रत्यक्ष फलदायी वाटलेलें नी कांहीं प्रमाणांत खरोखरीच तसें असलेलें कारण हें होतें कीं त्या यज्ञसंस्थेनें आपल्या वदिक काळच्या आर्यराष्ट्राच्या संघटनेस, संस्कृतीस आणि दिग्विजयास फारच मोठें साह्य दिलें होतें. मरुद्वरुणसूर्यप्रभृति सृष्टिशक्तींप्रमाणें अग्नि ही अेक भावनाशील सजीव परमशक्तिमान् देवता आहे अशी त्यांची प्रामाणिक निष्ठा असे. त्या काळच्या मानवीय ज्ञानानुसार निष्ठा तोच सिद्धांत वाटणें साहजिक होतें. त्या निष्ठेनें बद्ध असलेल्या अुत्स्फूर्त झालेल्या त्या आर्यांचे पुरोहित, योद्धे, कारस्थानी राजे, प्रजा– सारें राष्ट्र त्या यज्ञसंस्थेभोंवतीं जमत, त्या यज्ञाग्नीचें तेज आमच्यांत संचरो म्हणून प्रार्थीत नी त्या देवतेच्या भावनामय आशीर्वादास मस्तकीं धरून शत्रूंवर तुटून पडत–आणि त्यांस अनार्यादिक अयाज्ञिक राष्ट्रांवर विजयामागून विजय मिळत. अग्नि पुढें पुढें जसजसा जाअी, तसतसें त्याच्या मागोमाग आर्यांचें वीर्य, पराक्रम, राज्य, संस्कृति पुढेंपुढें सरत, नवनवे देश पादाक्रांत करीत. विदेहांत अग्नि पुढें गेला. आर्यांचें प्रभुत्वहि पुढें गेलें. अशी जीं उत्स्फूर्त यशोवाक्यें आपल्या प्राचीन मंत्रांतून संकीर्तिलेलीं आहेत तीं अेकदां घडलेली घटना नसून शंभरदां तशाच घटना घडल्या ! मोठमोठ्या यज्ञांचीं प्रस्थें पडलेलीं असतांना शास्त्रांच्या चर्चा चालत, तत्वज्ञानाच्या परिषदा भरत, दूरवर पसरलेलीं आर्यराष्ट्रें तिथें प्रतिनिधिलीं जाअून राष्ट्रीय अैक्याच्या भावनेनें पुनःपुनः संघटित होत, आर्यसंस्कृतींत अेकसूत्रता नी अेकजीव, अेकरूपता नी अेकप्राण पुनःपुनः संचरला जाअी. आर्यांच्या ज्ञानाचें पराक्रमाचें, वाणिज्याचें, राज्याचें, आर्यराष्ट्राचें नी राष्ट्रसंघाचें ही यज्ञसंस्था प्रत्यक्ष हृदयच झालेली असे ! पराजित राष्ट्रें अयज्ञिय,

विजेतें आर्यराष्ट्र यज्ञिय. या विरोधानें ज्या त्या आर्यांची भावना सहजच अशी झाली, असा कार्यकारणभाव ह्या साहचर्यानें सहजच सुचला कीं यज्ञ तिथें जय, जिकडे अग्नि तिकडे विजय. अर्थात् आर्यांना जो विजय बहुधा हटकून मिळे, तो अग्निदेवतेची कृपा होय, यज्ञाचा प्रताप होय, अशी भावना बळावली. यज्ञ तिकडे जय, अग्नि तिकडे विजय, हें साहचर्य त्या वैदिक काळीं भारतीय आर्यांपुरतें तरी अेकंदरींत खरें होतें पण त्या काळच्या धार्मिक भावनामय युगांत अनुभवाच्या अभावीं त्यांच्या हें ध्यानांत आलें नाहीं वा येअू शकणेंच कठीण होतें कीं यज्ञ तिकडे जय हें केवळ साहचर्य होतें : कार्यकारणभाव नव्हे.

अग्निपूजक यज्ञप्रस्थ भारतीय आर्यांना वैदिक काळीं, अेकंदरींत, त्यांच्या शत्रूंवर जयामागून जय मिळत ही गोष्ट खरी. पण ते जय अग्निपूजेमुळें मिळत नसून त्या काळच्या त्यांच्या शत्रूंहून ते आर्य अधिक संघटित, सुसंस्कृत नी वीर्यशाली होते म्हणून. अैहिक शस्त्रास्त्रविद्या प्रभृति भौतिक साधनांनीं संपन्न होते म्हणून. अनार्यांहून ते त्या काळच्या राष्ट्रशासनशास्त्रप्रभृति विज्ञानांत ज्या मानानें श्रेष्ठ होते त्या मानानेंच वरिष्ठ नी गरिष्ठहि ठरते. अद्यावत् विज्ञानानें अग्नि ही देवता नसून भावनाशून्य नी जड अशा सृष्ट पदार्थांतील अेक पदार्थ आहे हें जसें सिद्ध केलें आहे तसेंच अद्यावत् अितिहासानें हेंहि निर्विवाद सिद्धिलें आहे कीं यज्ञ नी यश, अग्निपूजा नी पराक्रम यांचा कांहींअेक कार्यकारणसंबंध नाहीं, अैहिक विजय अैहिक साधनांनींच मिळतात, आणि जेव्हां केव्हां त्या साधनांच्या भरीस यदृच्छा म्हणजेच आपणां मानवांस अजून अज्ञात असणाऱ्या वा आपल्या कह्यांत नसलेल्या कारणांचीं कार्यें अुभीं राहातात तेव्हां तेव्हां देखील तो योगायोग अग्निपूजकांच्याच वतीनें जुळून येतो असें मुळींच नाहीं. आर्य अनार्यांवर वैदिक काळीं जे जय मिळवीत ते जर अग्निपूजेचें

फळ होतें, आर्य साग्नि, त्यांचे शत्रु निरग्नि म्हणून आर्यांना अग्नि विजय देअी, आर्य यश पावत कारण ते यज्ञपूजक होते आणि त्यांचे शत्रु अपयश पावत कारण ते यज्ञध्वंसक असत; असेंच जर असतें तर वैदिक, यज्ञीय नी आर्य अशा पौरस राजाला त्या अवैदिक म्लेंच्छानें कसें जिंकिलें ? रणांगणांत यदृच्छा, दैव म्हणून जें असतें त्या योगायोगास जर भगवंताचें अधिष्ठान, अग्नीची कृपा म्हणावयाचें तर अलेक्झांडराच्या अलौकिक चरित्रांत तें दैव त्याच्याच बाजूनें तितकें वेळां कसें अनुकूल झालें कीं आर्यांतहि ह्मण पडावी 'त्याचें दैवच शिकंदर !' शिकंदराचें शस्त्रबळ नी भारतीयांची फूट हें पौरसाच्या नाशाचें अैहिक प्रत्यक्ष कारण ! तीच फूट न पडूं देतां शिकंदराहून सवाअी शस्त्रबळ भारतीयांनीं संपादतांच चंद्रगुप्तानें त्याच म्लेंच्छांस दांतीं तृण धरविलें. पौरसापेक्षां चंद्रगुप्त हा कांहीं यज्ञाचा अधिक अेकनिष्ठ भक्त थोडाच होता ? अुलट तो यज्ञत्यागी निरग्नि जैन मतास अवलंबिता झाला होता असेंहि दिसतें. अत्यंत विस्तृत, प्रबल नी स्मरणीय असें आर्यांचें अैतिहासिक भारतीय साम्राज्य होतें अशोकाचें– अेका त्यक्तयज्ञ, निरग्नि, वेदबाह्य बुद्धवीराचें ! हे तर नुसते त्यक्तयज्ञ होते पण यज्ञध्वंसक हूणांनीं नी मुसलमानांनीं भारतादि आर्यांवर जे जयांमागून जय मिळविले ते कसे ? जे अग्नीस पूजीत ते विझून गेले आणि जे यज्ञध्वंसक तमाचे पूजक– ते प्रकाशले ! कशानें ? पराक्रमानें, अैहिक साधनांनीं ! दैव म्हणजे जर भगवंताचें अधिष्ठान असेल तर तो भगवंत यज्ञध्वंसकांस कसा मिळाला ? रामदेवाचा पराभव झाला त्यास म्हणे भगवंताचें अधिष्ठान नव्हतें ! हें असें 'ज्ञानमंदिरांत' अेका लेखकानें लिहिलें आहे ! पण त्यांतल्या त्यांत यज्ञाचा, अग्नीचा, वेदाचा, आर्यधर्म ज्यास 'भगवंत' म्हणतो त्या भगवंताचा रामदेव हा मुसलमानापेक्षां तरी अधिक अभिमानी नी पूजक नव्हता काय ? बिचारा रामदेवराजा ! लढाअीला जावयाच्या आधीं देवास, अग्नीस, गाअीस, ब्राम्हणांस किती आदरानें

पुजून, काकुळतीनें हें 'धर्मराज्य रक्षा' अशी करुणा भाकून मुसलमानांशीं लढूं गेला तें हृदय हालवून सोडणारें वर्णन ह्या लेखकमहाशयांनीं जुन्या बखरींतून एकदां वाचावें. जर त्या तितक्या भक्तीनेंहि भगवंताचें अधिष्ठान त्यास मिळालें नाहीं म्हणून अपेश आलें, जर रणांगणांतलें यश भगवंताच्या अधिष्ठानावर अवलंबतें, तर अल्लाउद्दिनाला यश आलें तें त्याच्याकडे भगवंताचें अधिष्ठान होतें म्हणूनच आलें असेंहि मानलेंच पाहिजे. मग काय अल्लाउद्दिन रामदेवापेक्षां अधिक यज्ञभक्त होता, अग्निपूजक होता? वेदब्राम्हणांचा भक्त होता? कोटि कोटि रामनाम, त्रिकाळ स्नान आचरी? अग्निहोत्री होता होय तो अल्लाउद्दिन? म्हणून भगवंत रामदेवरावांस आपलें अधिष्ठान न देतां तें अल्लाउद्दिनास त्यावर बसावयासाठीं देता झाला? अहो, जो गोभक्षक-यज्ञ-ध्वंसक, ब्रम्हहत्यारी, देवशत्रु, भगवद्द्रोही– त्यास यश आलें तें जर भगवंताच्या अधिष्ठानामुळे असेल तर तसल्या त्या अभद्र भगवानाला प्रसादविण्याचा खरा मार्ग हा मूर्तिपूजक हिंदुधर्म नी यज्ञपूजा नसून तो मूर्तिभंजक यज्ञध्वंसक मुसलमानी धर्मच होय असें म्हणावें लागेल! तसें बरळायचें नसेल तर ऐहिक यशापयश नी राष्ट्रीय बलाबल हें ऐहिक साधनांच्याच बलाबलावर नी योगायोगावर अवलंबत असून तीं ऐहिक नी भौतिक प्रत्यक्ष साधनें वा ती अप्रत्यक्ष यदृच्छा, योगायोग, हीं अग्निपूजा वा अग्निनिंदा, पुराणीय मंत्रतंत्र वा कुराणीय शिव्याशाप यांवर अवलंबत नसतात असें तरी निश्चितपणें मानावें लागेल!

जड अग्नीची पूजा हा जसा धर्म नव्हे अज्ञान आहे, तसेंच जड अग्नीची निंदा, यज्ञाचा विध्वंस, यांनाच देवप्रिय धर्म समजणें हाहि धर्म नव्हे–दुष्टपणा आहे; अग्निपूजेनें देव पावत नाहीं, अग्निनिंदेनेंहि पावत नाहीं, अग्निनिंदक, यज्ञध्वंसी नी कुराणानुयायी मुसलमानांसहि पहिल्या बाजीरावाच्या तरवारीचा विळा कुरणासारखा

सपासप कांपीत गेला– अग्निहोत्रादि तो पूजीत होता म्हणून नव्हे तर तरवारीची धार परजीत होता म्हणून ! तेच शेवटले बाजीराव पहा, पहिल्या बाजीरावापेक्षां पंचमहायज्ञाचे कितीतरी अधिक अभिमानी, पण तरवारीचा ढिला–राज्य बुडविलें !

आज तर बोलावयासच नको. अग्नीचे आजहि त्यांतल्या-त्यांत कट्टे अुपासक असलेले ते पारसिक आणि प्रत्यहीं अजूनहि कुठें ना कुठें दोनतीन तरी यज्ञ नी शेकडों अग्निहोत्रें पूजणारे हे आम्ही भारतीय आम्ही दोघेंच जगताचे पददलित ! आणि अुभ्या आयुष्यांत युगानुयुगांत, सिगारेटवांचून दुसरी समिधा ज्यांनीं कधीं पेटविलीच नाहीं आणि आपलपोटेपणाच्या कुंडांतील जठराग्नी वांचून अितर कोणत्याहि आहवनीय अग्नींत आहुति म्हणून ज्यांनीं दिलीच नाहीं– तें तें सारें जग राज्यपदाधिष्ठित !

तेव्हां अग्निपूजेनें यश येतें, यज्ञानें संतति, संपत्ति राज्य, साम्राज्य प्रभृति अैहिक लाभ होतात ही गोष्ट अितिहासाच्या अन्वयी आणि व्यतिरेकी पुराव्यानें साफ खोटी ठरत आहे. विज्ञानानें ठरत आहे कीं अग्नि ही देवता नसून अेक जड सृष्ट पदार्थ आहे. प्राचीन काळीं अग्निपूजेपासून होतात असे वाटलेले नी कांहीं अंशीं झालेले लाभ आज मुळींच होत नाहींत, होणारे नाहींत, वैज्ञानिक नी व्यावहारिक दृष्टीनें ते यज्ञाचे अडाणी प्रपंच आतां अगदीं खुळचटपणाचे ठरत आहेत. अनवश्यक आहेत. अितकेंच नव्हे तर अज्ञानाची पूजा ठरत आहेत. हें झालें अैहिक, व्यावहारिक दृष्टीचें विवेचन, परंतु पार-लौकिक दृष्टीनें श्रद्धेच्या दृष्टीनें ! यज्ञाचे कांहींच लाभ नसतात काय ?

तें विवेचन नी या विषयाचा समारोप अुत्तरार्धाच्या लेखांत करूं.

● ● ●

# यज्ञ [ उत्तरार्ध ]

पूर्वार्धांत अैतिहासिक दृष्टीनें यज्ञाची कुळकथा सांगून आम्हीं असें दाखविलें कीं, ज्या कारणासाठीं नी लाभासाठीं अत्यंत प्राचीन काळीं मनुष्यांतील अनेक राष्ट्रांस यज्ञ, अग्निहोत्रप्रभृति अग्निपूजेचे प्रकार अत्यंत प्रिय झाले, त्या कारणांपैकीं नी लाभांपैकीं अेकहि गोष्ट आजच्या परिस्थितींत अुचित वा अुपयोगाची ठरत नाहीं. यासाठींच रोम, ग्रीस, बौद्धप्रभृति राष्ट्रांत नी पंथांत अग्नि-पूजा नामशेष झाली असतांहि त्यांस त्यामुळें कोणतीहि अुणीव भासत नाहीं, आपणां भारतीय वैदिक हिंदूंनाहि भासण्याचें कारण नाहीं. त्याचें त्रोटक स्पष्टीकरण असें–

( १ ) अग्नीची युक्ति काढणाऱ्या शोधकाची संशोधक वा प्रकल्पक ( Inventor ) वर्गांत गणना करून त्यास सन्मानिलें कीं त्याचे आपण अनृणी झालों. त्यास देव वा देवता कल्पिणें व्यर्थ. त्याहून अनेक आश्चर्यकारक असे बाष्प, विद्युत्, रेडियमप्रभृति

शक्तींचे नी युक्तींचे संशोधक आज प्रत्यहीं निघत असतां त्यांस जसें अतिमानुष वर्गांत ढकलण्याचें भोळेपण किंवा त्या युक्तीस दैवी कृपेचे चमत्कार म्हणून समजण्याचें वेडेपण आम्ही करीत नाहीं, तसेंच अग्नि नी त्यास स्वेच्छेनुसार प्रकटविण्याची युक्ति काढणारा संशोधक यांच्याहि प्रकरणीं आपली समज वैज्ञानिक कसोटीचीच असली पाहिजे.

( २ ) मानवी व्यवहारांत अग्नीपासून जे आश्चर्यकारक अुपयोग पूर्वी झाले, त्याहूनहि अधिक प्रमाणांत नी अधिक सोयीचे अुपयोग बाष्प, विद्युत्, रेडियमप्रभृति शक्तींच्या व्यवहारीकरणानें आज मनुष्यास गतिप्रकाश–अुष्णताप्रभृति प्रकरणीं होत आहेत. त्या अनुभवामुळें अति प्राचीन काळीं अग्नीचें जें अपूर्वपण नी अद्वितीयपण वाटलें तें आतां वाटण्याचें कारण नाहीं. अग्नीचें महत्वहि आतां त्या काळापेक्षां प्रत्यक्ष व्यवहारांत पुष्कळ कमी झालें आहे. आणि बाष्प, विद्युत्, रेडियमप्रभृति अनेक शक्ती जशा देवता नसून अगदीं ठराविक नियमांनीं ठराविक कार्यें करणाऱ्या जड, हृदयशून्य, भावनाहीन सृष्ट पदार्थ आहेत हें विज्ञानानें ठाम ठरविलें आहे, तसाच अग्नि हाहि एक पदार्थ आहे, हेंहि आतां अनुभवसिद्ध झालें आहे. त्यास ताजी ताजी तुपाची धार नी ओदनमोहनभोगाचे ढीग अर्पिले काय किंवा रखरखीत कोळशाचे तोबरे दिले काय, तो अग्नि जळायचा तितकाच नी तसाच जळतो, जाळायचें तेंच जाळतो. त्याला संस्कृत मुळींच येत नसल्यामुळें वेद वा अवेस्ता जी कळकळीची गौरवपूर्ण स्तुति करतात, तिनें तो भाळत नाहीं. यजमानाच्या हितार्थ त्यांत समंत्रक बोकड घातला तरी तो जसा जाळतो तसा बोकडाच्या हितार्थ यजमानाला जरी त्यांत ढकललें तरी तो यज्ञाग्नि त्या यजमानाचीहि राख करून टाकण्यास सोडीत नाहीं. त्यास अरेबी वा हिब्रूहि येत नसल्यानें कुराणीय वा तौलिदीय अग्निनिंदेचे शिव्याशाप देणारे मंत्र म्हटले तरी त्यासहि तो अग्नि भीक घालीत नाहीं. अनेक

रा. ता. ग्रा.

मुल्लांच्या नी परिसीझांच्या दाढया त्यानें जाळल्या आहेत. खलिफांच्या राजधान्यांच्या राजधान्यांची त्यानें गवताच्या गंजीसारखी होळी केली आहे. सारांश, अग्निपूजक वेद अवेस्तांतील यज्ञप्रस्थांची स्तुति किंवा अग्निनिंदक कुराणबायबलतौलिदादिकांतील यज्ञपांखंडाची निंदा हीं दोन्हींहि धार्मिक खुळें व्यावहारिक दृष्टया आज साफ चुकीचीं, भलत्याच भाबडेपणावर अुभारलेलीं धर्मवेडें ठरलीं आहेत. त्यांच्या पाळण्यानें अग्नीचे व्यावहारिक परिणाम लवलेश बदललेले आढळत नाहींत. अग्नीचे जे ठराविक वैज्ञानिक सृष्टिनियम आहेत त्यांच्या अनुरोधें त्याचा मनुष्यहितास जो अुपयोग करून घेतां येतो तो करून घेत राहणें हाच मार्ग या वैज्ञानिक युगांतील खरी नी प्रत्यक्ष फलदायी अग्निविद्या होय. त्या अुपयोगास्तव त्या जड, मनुष्यभावनाहीन, नी ज्ञप्तिहीन सृष्ट पदार्थाची कृतज्ञता वा अुपकार मानण्याचेंहि कांहींअेक कारण नाहीं. आगगाडीच्या अिंजिनाचे आभार मानण्याचें जसें कारण नाहीं, गिरणीच्या बंबाची पूजा जशी खुळी, तशीच यज्ञकुंडाची वा अग्यारीची.

( ३ ) मानवी स्तुतिनिंदेनें अग्नीच्या व्यापारांत जसा कोणताहि फरक होत नाहीं, लाभ होत नाहीं, तसाच यज्ञसंस्थेपासूनहि आजच्या युगांत पूर्वीचा अेकहि राष्ट्रीय लाभ होत नाहीं. पूर्वी अग्नि चेतविणें दुर्घट म्हणून काष्ठघर्षणानें अेकदां चेतविलेला अग्नि सतत पेटत ठेवणें अुपयुक्त असे. त्या क्रियेचें धार्मिकीकरण म्हणजे अग्निहोत्र. पण आतां आगपेटया, वीजबटणेंप्रभृति साधनें झटपट अग्नि चेतवितात, यास्तव अग्नि सतत पेटत ठेवण्याचें कारण नाहीं. **आतां अग्निहोत्राचें आगपेटीकरणच युक्त!** तसेंच ती सतत पेटलेली आग्यारी, तीं यज्ञाग्नींनीं महिनोगणतीं भडकलेलीं यज्ञकुंडें, त्या होळया, हे सर्व अग्निपूजेचे प्रकार हिम वा शीत प्रदेशांत सुखकर होते; पण आजच्या भारतीय अुष्ण वायुमानांत असह्य अुष्णता अत्पादिणाऱ्या ह्या चाली अतिशय तापकारकच

होत. हिमप्रदेशांतहि थंडीपुरतें लागलेंच तर विद्युतादि साधनें नी युक्त्या, होळयांहून अधिक सोयीच्या अशा कितीतरी निघालेल्या नी निघण्यासारख्या असतां आतां, लांकडावर लांकडें धांशीत आग भडकावून तींत तुपाच्या नद्या, नाना प्रकारचे मंत्रतंत्र म्हणतां म्हणतां घामाघूम होत्साते, ओतीत राहाण्यांत काय अर्थ आहे !

( ४ ) 'वेदांत आहे म्हणून आम्ही यज्ञ करणार–अुपयोग असो वा नसो–' असें म्हणणाऱ्या 'वचनात्प्रवृत्ती'चा अर्थ जितका सुसंगत वाटतो, तितकादेखील या यज्ञप्रभृति धार्मिक प्रथांचें समर्थन त्या आजहि अुपयुक्त आहेत म्हणून आजहि आचरणीय आहेत, अशा व्यावहारिक दृष्टीनेंहि करूं पाहणाऱ्या अर्धवट आधुनिकांचें म्हणणें सुसंगत दिसत नाहीं. यज्ञ कां करावा, तर म्हणे चंदनादि द्रव्यें जाळल्यानें वायु सुगंधित रहातो, तूप जाळल्यानें स्निग्ध होतो. पण तें कार्य घरोघर अेक धुपाळें नी अेक तुपाळें ठेवूनहि होओल. मशिदींत, चर्चमध्यें, बुद्धविहारांत वातावरण काय सुगंधी नसतें ! युरोपादि पुढारलेल्या जगांत काय यज्ञीय आर्यावर्ताहून शतपट अधिक आरोग्यबलतेजओज आज नांदत नाहीं ? पुन्हा हें वायु स्निग्ध करण्याचें कार्य धूप नी तूप जाळण्यास समर्थितें–यज्ञाच्या त्या मंत्रतंत्र जटिल अगडबंबास नव्हे !

( ५ ) चांगल्या चांगल्या आचार्यांकडूनच नव्हे, तर आजकालच्या कांहीं व्याख्यात्यांकडूनहि यज्ञाचें समर्पक कारण म्हणून सांगण्यांत येतें कीं, 'यज्ञात्भवति पर्जन्यः !' मोठमोठ्या यज्ञांनीं अुत्पन्न होणाऱ्या तापामुळें वातावरणांत मेघ जमतात अशी क्लृप्ति, आणि अेकटदुकट वेळां येत गेलेला काकतालीय अनुभव यांहींकरून प्राचीन काळीं मनुष्यांस असें वाटणें साहजिक होतें कीं, यज्ञानें पर्जन्य पडतो हा भौतिक दृष्ट्याहि अेक सृष्टिनियम आहे. परंतु वास्तविक पाहतां ह्या भगवद्गीतेसारख्या विचारपरिप्लुत ग्रंथांतहि अुल्लेखिलेल्या समजुतीचें मूळ कारण धार्मिक निष्ठा होय. अिंद्र हा

पर्जन्यांचा– 'जलांचा' विमोचक, पर्जन्य तो पाडतो; आणि यज्ञानें तो सोमप्रिय अिंद्र प्रसादतो; या दोन निष्ठा वेदांच्या मंत्रामंत्रांतून व्यक्त होतात. त्या धार्मिक निष्ठेंतच 'यज्ञात् भवति पर्जन्यो' ह्या नियमाचें मूळ आहे. ही मूळची अेक निर्भेळ, प्रत्यक्ष पुराव्याची अपेक्षाच न ठेवणारी, पोथीजात समजूत. पण प्रत्येक पोथीजात समजुतीला, पूर्वी वैदिक पोथीवर अंधविश्वास न ठेवणाऱ्या बुद्धादिक, अवैदिक लोकांच्या नी आतांच्या भौतिक विज्ञानवाद्यांच्याहि गळीं अुतरविण्यासाठीं ती धार्मिक समजूत सृष्टिविज्ञानाच्या प्रत्यक्ष कसोटीलाहि अुतरते हें सिद्ध करण्याच्या मोहामुळें तिच्यावर हें वैज्ञानिक पुटहि चढविण्यांत आलें कीं, अिंद्र यज्ञानें प्रसादून पाअूस पाडतो, ही नुसती आमची शद्बनिष्ठ कल्पना नव्हे, तर हा एक प्रत्यक्ष अनुभवास येणारा वैज्ञानिक नियम आहे. आमचा 'धर्म' विज्ञानदृष्टचाहि सत्य आहे. यज्ञानें वातावरणांत तापमान वाढतें, त्यायोगें मेघीभवन होअून पाअूस पडतो हें सृष्टिविज्ञानाचें तत्व आमच्या महर्षींस ठाअूक होतें, असें समर्थिलें जाअूं लागलें. आणि आजहि बेधडकपणें मोठमोठ्या विद्वानांच्या तोंडीं तें जें वाक्य रुळून गेलें तें तसेंच रुळलेलें आहे.

पण ही समजूत पोथीजातच काय ती असून तिला मनुष्याच्या अनुभवानें साफ खोटी पाडली आहे. प्रत्यक्ष भारतांत यज्ञभगवान् नी दुर्गादेवीचे दुष्काळ हातांत हात घालून युगोयुगें नांदत आले आहेत ! यज्ञसंस्थेचे पुरस्कर्ते समुद्रगुप्तादिक सम्राटहि राज्यांतील दुष्काळनिवारणार्थ मोठमोठे कालवे बांधवीत; मोठमोठे नुसते यज्ञ ठिकठिकाणीं पेटवून स्वस्थ बसत नसत ! जर यज्ञांनीं पाअूस, सृष्टिनियमाच्या निश्चिततेनें निरपवाद पडते तर जगांतून यज्ञसंस्था लुप्त होण्याचें जें महान् भय शास्त्रीमंडळास पडलें आहे तें न पडतां जगांतून आजला दुष्काळ लुप्त झाले असते ! ज्या देशांत यज्ञ नी अग्निपूजा युगोयुगांत कधीं झाली नाहीं अितकेंच नव्हे तर अग्निपूजा करील तो नरकांत जातो असें कंठरवानें सांगणारे 'धर्म' प्रचलित

आहेत; दक्षिण अमेरिकेपासून तों दक्षिण आफ्रिकेपर्यंतच्या पृथ्वीवर दुष्काळाचें प्रमाण सारखें हटत आहे; वैज्ञानिक साधनांच्या प्रभावामुळें ! आणि द्वादशवार्षिक सत्रांपासून तों दोन वर्षांमागच्या कुरुंदवाडच्या यज्ञापर्यंत ज्या भारतांत यज्ञकुंडें सारखीं धगधगलेलीं आहेत, त्या भारतांत दुष्काळाच्या खाअीहि सारख्या धगधगलेल्या आहेत ! आज युरोपमध्यें व अमेरिकेंत त्या यज्ञध्वंसी राष्ट्रांत दुष्काळाच्या नांवाचा दुष्काळ पडत असतां दुष्काळाचेंच प्रमाण नव्हे, तर दुष्काळांत मृत्युमुखीं पडणाऱ्या लक्षावधि मनुष्यांचें प्रमाण जर कोणत्या भूभागांत अधिक असेल तर तें आहे या यज्ञीय भारतांतच ! मोठमोठ्या नद्यांचे कालवे काढून दुष्काळ प्रत्यक्षपणें हटवितां येतात, सुकाळांतील प्रदेशांतून धान्य आणून दुष्काळांतील प्रदेशांतील माणसांचे जीव जसे निश्चितपणें वांचवितां येतात तसें, जोंवर प्रत्यक्षपणें, नियमितपणें, निश्चितपणें यज्ञ करतांच निदान तें यज्ञकुंड विझविण्यापुरतें तरी पाणी आकाशांतून घळाघळा वर्षत नाहीं, तोंवर ह्या काकतालीय निव्वळ पोथीजात नी काल्पनिक 'यज्ञात्भवति पर्जन्यो 'ला, 'प्रातःकाले शिवं दृष्ट्वा निशिपापं विनश्यति । आजन्मकृत मध्यान्हे सायान्हे सप्तजन्मनि' या स्मृतीपेक्षां किंवा 'पाण्यांत पाहिलें तर दांत पडतात अं !' या अर्भकास पढविल्या जाणाऱ्या आजीबाअीच्या सूत्रापेक्षां सृष्टिज्ञानाच्या दृष्टीनें दमडीचेंहि अधिक मूल्य देतां येत नाहीं. यज्ञानें पाअूस पडून दुष्काळ हटतो, यापेक्षां जर मनुष्यास कोणचा अनुभव रोखठोक येत असेल तर तो असलें नसलें धान्य नी तूप अग्नींत जाळून टाकल्यानें दुष्काळ त्या त्या प्रमाणांत वाढविला मात्र जातो हाच होय !

सदां यज्ञ होतात त्या राष्ट्रांत बारा वर्षें दुष्काळ पडावे अितका पावसाचा अभावहि होतो—मुळींच यज्ञ नसतात तिथें पाअूस, कुठें बारा महिनेसुद्धां यथावत् पडतो. या अन्वयव्यतिरेकी अुभयविध अनुभवानें 'यज्ञात् भवति पर्जन्यो' हें वचन साफ खोटें पाडलें आहे.

त्यांतहि यज्ञानें वातावरण तापल्यामुळें मेघीभवन पावतें असें समर्थन क्षणभर किंचिदंशीं गृहीत धरलें तरी त्यामुळें पर्जन्याचें कारण अुत्ताप असें सिद्ध होईल; पर्जन्याचें कारण यज्ञ असें कांहीं सिद्ध होणार नाहीं. अुत्ताप यज्ञानेंच कांहीं होत नाहीं. मोठमोठ्या युद्धांत तोफा प्रभृति अग्न्यस्त्रांच्या धूमधडाक्यानें वातावरण अुत्तप्त नी क्षुब्ध होअून पाअूस पडतो असें क्वचित आढळतें. म्हणून काय जीं माणसें जगावयासाठीं पाअूस हवा, तींच लक्षावधि माणसें युद्धांत मारवून तो पाअूस पाडायचा ? अुत्तापच म्हणाल तर तो शेंकडों यज्ञ पेटवून होतो तसाच प्लेगमध्यें लक्षावधि चितांचे भडाग्नि भडकतात तेव्हांहि होतो. मग काय चिताग्नीनें पाअूस पडतो असें सूत्र बांधून टाकायचें ? अुत्तापानें पाअूस पडत असला तरी तें समर्थन कोणच्याहि अुत्तापोत्पादक साधनांचें होईल– या अितक्याच विटा, अशाच रचा, अिथें अुठा, तिथें ओणवे व्हा, अिथें हा मंत्र, तिथें हे मंत्र, अिथें बोकड बांधा, असा बोकड बुकला, असा मटामट खा, या जटिल यज्ञीय अगडबंबाचें नव्हे !!

दूरध्वनीच्या ( टेलिफोनच्या ) कर्ण्याला हातीं घेतलें कीं वाटेल त्या मनुष्याचा ध्वनि वाटेल तितक्या लांब जसा मोजून मापून निरपवाद धाडतां येतोच येतो, तशा निश्चितीनें 'पड पावसा' म्हटलें कीं पाअूस पडलाच पाहिजे अशी वैज्ञानिक जी युक्ति रशियादिक देशांतील प्रयोगामुळें निघण्याच्या बेतांत आली आहे तिलाच काय तें पर्जन्याचें वैज्ञानिक सूत्र म्हणतां येअील. अर्थातच आतां त्या पूर्वींच्या काळीं खऱ्या वाटलेल्या पोथीजात सूत्राला अनुभवान्तीं खोट्यांत काढून; पण पूर्वींच्या लोकांची तशी समजूत असणें त्या काळच्या ज्ञानांत सहाजिक होतें, अितकेंच नव्हे, त्यांनीं ती अुपपत्ति नी तो प्रयोग अुपयोजून पाहिला म्हणूनच आज आपणांस तो चुकीचा आहे असें ठाम सांगतां येअून खऱ्या कारणाकडे वळतां आलें, याविषयीं त्या प्राचीन प्रयोगाचे कृतज्ञ राहून; आपण आतां 'यज्ञात् भवति

पर्जन्यो ' या सूत्राच्या ठाअीं ' विज्ञानादेव पर्जन्यो ' हें सूत्र स्थापिलें पाहिजे.

( ६ ) वरील सर्व कारणांसाठीं यज्ञापासून प्राचीन काळीं होणारे किंवा होतात असे भासलेले प्रत्यक्ष लाभ आज अप्राप्य आहेत ही गोष्ट ज्यांच्या मनांतून पटलेली असते अशा आधुनिक गृहस्थांपैकीं देखील कित्येकांना यज्ञ हे तरीहि मधून मधून व्हावे असें वाटतें. तें अेवढ्यासाठीं कीं, ' यज्ञसंस्था ही आपल्या प्राचीन संस्कृतीचें केंद्र, प्राचीन संस्कृतीचें स्मृतिचिन्ह म्हणून तरी ती रक्षिणें अुक्तच. परंतु या त्यांच्या सदिच्छ युक्तिवादांत मुख्य हेत्वाभास हा कीं, प्राचीन संस्कृतींतील सर्वच गोष्टी आज ' संस्कृत ' समजतां येत नाहींत. प्राचीन संस्कृतींतील यज्ञसंस्था जरी घेतली तरी नृयज्ञ हाहि त्यांतील अेक प्रकार होता. मग त्याची ओळख बुजूं नये म्हणून आज मधून मधून नरमेधहि सांगोपांग करीत बसायचें कीं काय ? पूर्वी शास्त्रांत वराहाचें मांस ब्राम्हणांस खाअूं घालीत. किती प्रकारचें मांस, मासे, पक्षी ' श्राद्धीय ' त्याची टिपणीच मनुस्मृतींत देअून ।। नियुक्तस्तु यथाशास्त्रं यो मांसं नात्ति मानवः । सप्रेत्य पशुतां याति संभवान्नेकविंशतिम् ।। श्राद्धांत मांस न खाणारा ब्राम्हण पतित होतो, अेकवीस जन्म पशुयोनि पावतो, असा भयंकर शापहि दिला आहे ! मग आज त्या प्राचीन ' संस्कृतिरक्षणार्थ ' तशा श्राद्धांत डुकराचें मांस, मासे ब्राम्हणांनीं खात बसावयाचें का ? प्राचीन काळीं नियोग असे. द्यूत खेळतां खेळतां राज्येंचीं राज्यें पणास लावणें, राजपत्नीहि शेवटीं बटीक म्हणून हरणें, धर्मराजहि क्षत्रियांचा धर्म मानीत. मग आजहि कांहीं नियोग सार्वजनिकपणें घडवून, कांहीं राजांनीं, निदान कांहीं धर्माभिमानी सज्जनांनीं तरी वर्षाकांठीं दोनदां तीनदां तसें द्यूत खेळून शेवटीं स्वभार्यांचीहि पैज लावावी कीं काय ? सनातन संस्कृत ग्रंथांचा लोप होअूं नये म्हणून ?

# संस्कृतिरक्षणाचा खरा अर्थ

संस्कृतिरक्षणाचा खरा अर्थ, प्राचीन काळीं वेळोवेळीं ज्या ज्या अुलटसुलट प्रथा त्या काळच्या ज्ञानाज्ञानाप्रमाणें 'संस्कृत' वाटल्या त्या साऱ्यांची तशीच्या तशी पुनरावृत्ति करणें त्या रूढि आज व्यर्थ वा विक्षिप्त वा विघातक ठरत असल्या तरीहि त्या तशाच चालू ठेवणें, हा नव्हे. जी वेदकाळाची रूढि किंवा आचारात्मक धर्म आज विज्ञानाच्या दिव्यतर प्रकाशांत समाजघातक रोगाणूंनीं लडबडलेला दिसतो ती ती रूढि वा आचार आजच्या संस्कृतींत न मोडतां दुष्कृतींतच मोडला पाहिजे. मग तो प्राचीन काळीं लोकांना परवडला असो वा नसो, संस्कृत वाटला असो वा नसो. **आज जें संस्कृत म्हणून अभिमानानें रक्षावयाचें तें, प्राचीनांतलें आजहि संस्कृत ठरणारें, मनुष्यास हितकारक असणारें, तेवढें तेवढेंच काय तें होय.**

प्राचीनांतलें जें आजहि अुत्तम, अनुकार्य, अुदात्त, अपेक्षणीय प्रगत नी प्रबुद्ध ठरतें तें तें आजचें संस्कृत, तें तें रक्षिणें म्हणजे खरें खरें संस्कृतिरक्षण होय. तसें प्राचीन संस्कृतिरक्षण हें आजचें कर्तव्य होय, प्राचीन दुष्कृतिरक्षण हें नव्हे.

त्या संस्कृतिरक्षणाच्या कर्तव्याहूनहि पुढचें कर्तव्य म्हणजे संस्कृतिविकसन ! प्राचीनांतलें जें आजच्या विज्ञानांतहि संस्कृत वाटतें तें रक्षूनच चालणार नाहीं तर त्यांत नवीन सत्याची नी तथ्याची भर टाकून संस्कृतिवर्धन केलें पाहिजे. तें मुख्य कर्तव्य ! त्यास जें अडथळा करील, त्या कसोटींत जें हीणकस ठरेल त्यास त्यागिणें म्हणजे संस्कृतिरक्षण, संस्कृतिविकसन.

यज्ञसंस्था त्या कसोटींत आज हिणकस ठरते. लाखों मनुष्यें नाचण्याच्या आंबिलीचा भुरकाहि मिळेना म्हणून ज्या राष्ट्रांत पटा-पट भुकेनें मरताहेत त्या राष्ट्रांत प्रत्यक्ष लाभांत अगदीं कुचकामाच्या

ठरलेल्या ह्या यज्ञसंस्थेस संस्कृति म्हणून आगीचे डोंबाळे भडकावून त्यांत खंडोगणति अन्नाचे ढीग नी मणोगणति तुपाचे हौद समंत्रक, समारंभपूर्वक जाळीत बसणें म्हणजे, नकळत आगलावेपणा होत आहे; संस्कृतिरक्षण नव्हे !

तरीहि यज्ञाचें कर्मकांड होतें तरी कसें अितकेंच अैतिहासिक दृष्टीनें विस्मरूं द्यावयाचें नसेल तर अैतिह्य संग्रहालयांत ब्राम्हणें नी मीमांसादिक ग्रंथरक्षण केलें कीं पुरे. त्याहीपेक्षां प्रत्यक्ष यज्ञ सदा पेटवलेला नो मंत्रघोष चाललेला पिढयान् पिढया दाखविण्याचीहि अुत्कृष्ट सोय विज्ञानानें आज केली आहे ! अेकेका यज्ञाचा अेकेक बोलपट अेकदां केव्हांतरी काढून ठेवला कीं पुन्हा तुपाचा अेक बिंदूहि न दवडतां वाटेल तेव्हां यज्ञ चाललेला प्रत्यक्ष पाहतां येअील !

## यज्ञाचे पारलौकिक लाभ

अैहिक दृष्टीनें यज्ञसंस्थेपासून जे जे प्रत्यक्ष या लोकीं मिळणारे लाभ म्हणून आजवर कल्पिले गेले किंवा जे प्राचीन काळीं कांहीं अंशीं झाले, त्यांची छाननी अितका वेळ आपण केली. यज्ञसंस्थेची ही छाननी करतांना अितका वेळ केवळ अैतिहासिक नी अैहिक कसोटीच आम्हीं वापरली.

परंतु ज्या आमच्या अनेक हिंदुबांधवांची श्रद्धा यज्ञाच्या पारलौकिक फलांवरहि असेल ते, त्यांना वरील कोटिक्रम पटला तरी विचारणारच कीं, ‘ यज्ञापासून आजच्या वैज्ञानिक युगांत वैदिककाळामध्यें आपल्या राष्ट्रास जे अैहिक लाभ होअूं शकत किंवा होताततसे वाटत, ते जरी होणारे नसले तथापि त्यांचे पारलौकिक लाभ तरी होतात कीं नाहीं ? त्यासाठीं तरी यज्ञसंस्था रक्षणीय आहेच आहे !’

या आमच्या श्रद्धाशील धर्मबंधूंना त्यांच्या श्रद्धामय कसोटीच्या दृष्टीनेंहि आम्ही प्रथम असें विनवूं अिच्छितों कीं, यज्ञाची प्रक्रिया

ग्रं. क्र. ...

यथावत् पार पाडली तरच ते पारलौकिक लाभ पदरांत पडणारे असल्यामुळें आणि ती प्रक्रिया नक्की कशी आहे याविषयींच अत्यंत शद्ध-निष्ठ सज्जनांतहि तीव्र मतभेद असल्यामुळें ते पारलौकिक लाभ पदरांत पाडून घेण्याचाहि यज्ञ हा अत्यंत संदेहास्पद नी अनमानधपक्याचा मार्ग ठरत आहे. यज्ञापासून अैहिक लाभ तर निश्चयपूर्वक आतां मिळत नाहींत; आणि पारलौकिक लाभ वचनात् प्रवृत्तीच्या कसोटीनेंदेखील सर्वस्वीं अनिश्चित आहेत. कसें तें अुदाहरणार्थ अेका पशुहनन-प्रक्रियेच्या प्रश्नावरूनच पहा.

## पुष्ट पशु कीं पिष्टपशु ?

पशुयज्ञांत पशु मारावा लागतो म्हणूनच यज्ञ गर्ह्य होय असें आम्ही मुळींच मानीत नाहीं. जर पशुहननानें मनुष्यजातीचा अैहिक वा पारलौकिक यथाप्रमाण लाभ होत असेल तर अेक सोडून अेक हजार पशु यज्ञांत मारावे लागले तरी मारले पाहिजेत. त्यांतहि मनुष्याच्या पोटासाठीं सहस्रावधि पशु प्रत्यहीं कसाअीखान्यांत मारतांना ज्यांस दुःख करावेंसें वाटत नाहीं त्यांना, पोटासाठीं जरी दहापांच बोकड यज्ञांत मारले तरी कांगावा करण्याचा काय अधिकार आहे ? जे पिढ्यान्‌पिढ्याचे मांसाशनी त्यांनीं सागुतीच्या वासाचे भपकारे टाकणाऱ्या आपल्या तोंडांनीं कांहीं ब्राह्मणांनीं केव्हांतरी अेकदां अेक बोकड मारून खाल्ला म्हणून भूतदयेच्या गोष्टी बोलणें म्हणजे अट्टल चोरानें अस्तेयावर व्याख्यानें झोडीत चोऱ्या करीत राहाण्यासारखाच बेरडपणा होय. शंभर शंभर गाअींचे कळप मिरवणुकी काढून अुघड अुघड कत्तल करविण्यांत प्रसन्न होणारे देव ज्या मनुष्यजातीस अजून खपतात तिनें अहिंसेच्या दृष्टीनें बोलायचें तरीहि अेका बोकडाच्या आलभनानेंच संतोषणाऱ्या देवाच्या पायाचें तीर्थच घेतलें पाहिजे. पशूस आत्माच नाहीं म्हणून चक्क प्रतिज्ञा करणाऱ्या ख्रिश्चनांस

किंवा प्रत्यहीं पशूंच्या मांसावर पिंड पोसणाऱ्या नी येतां जातां देवाच्यां पुढें कुरबाणीच्या सुऱ्यानें पशूंच्या रक्ताचे पाट वाहविणाऱ्या मुसलमानास, ' यज्ञांत मारलेल्या पशूचा आत्मा अुत्तम गतीस जातो ' असें सांगणाऱ्या श्रुतिस्मृतींतील श्लोकांस हंसतांना स्वतःचीच लाज वाटली पाहिजे ! अितकेंच नव्हे, तर पशुहननपर अेकेका श्लोकाच्या खंडनार्थ 'मा हिंस्यात्सर्वभूतानि' म्हणून टाहो फोडणारीं नी प्रत्यक्ष आचरणांत मनुष्यास शक्य ती अहिंसा व्यवहारविण्यास कारणीभूत झालेलीं जीं शंभर शंभर वचनें हिंदूंच्या श्रुतिस्मृति-शास्त्रांत सांपडतात, त्याहींकरून देवाला शक्य तितकें खरेंखरेंच देवलसी करून सोडलेल्या नी भूतदयेच्या ध्येयास यावच्छक्य तों या हिंसामय सृष्टींतहि व्यवहार्य करून सोडण्याचा यत्न करणाऱ्या हिंदुधर्माच्या सदिच्छेपुढें तरी जगतानें स्वताचें मस्तक नमविलेंच पाहिजे.

अितक्या प्रयत्नांनींहि जर कांहीं ना कांहींतरी हिंसा आचरली जाणें अपरिहार्यच असेल तर तो बुद्ध, जैन, वैष्णव प्रभृति हिंदु-राष्ट्राच्या अनेक पंथोपपंथांच्या दयाशील सदिच्छेचा वा प्रयत्नांच्या पराकाष्ठेचा दोष नसून ज्यानें ही सृष्टि मूलतःच ' जीवो जीवस्य जीवनम् ' ह्याच मुख्य सूत्राच्या पायावर रचली त्याचा, त्या आदि-शक्तीचा वा शक्तींचा दोष आहे !

यास्तवच भूतदयेची व्याप्तीहि मनुष्यास मनुष्यजातीच्या-बाहेर फारशी नेतां येणें शक्य नाहीं, अिष्ट नाहीं. ' चलानाम-चलाभक्ष्या दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिणः । सहस्तानां अहस्ताश्च शूराणां चैव भीरवः ' हें जें सूत्र मनु भगवानांनीं सांगितलें तें त्रिकाल सत्य आहे. **मनुष्यहितास अवश्य ती हिंसाच मनुष्यधर्म ! मनुष्य-हितास अनुकूल तितकीच भूतदया नी तितकीच अहिंसा श्रेयस्कर, अिष्ट, उचित; मानवनीति ती अितकीच !**

या दृष्टीनें मनुष्याचें अैहिक वा परलौकिक हित जर यज्ञांत पशुहननानें खरोखरीच साधत असतें तर यथाप्रमाणें अवश्य तितके पशु यज्ञांत बळी देणेंच हित, प्राप्त, अत अेव धर्म्य ठरतें. पशुहिंसे-मुळेंच यज्ञसंस्था गर्ह्य ठरत नाहीं.

पण यज्ञाचें पारलौकिक फळ मिळतें असें गृहीत धरलें तरी त्याची प्रक्रिया निःसंदेह बिनचूक कळली तरच मिळणार हें शास्त्र-सिद्धच आहे. आणि अडचण ती अिथेंच आहे. पशुहननाचाच प्रश्न घेतला असतां वेदांतील त्या वाक्यांचा अर्थ मोठमोठे आचार्य अनेक प्रकारचा करीत आहेत. पशूचें हनन असें करावें; वपा, नसा, मेंदु, मज्जा, रस, रक्त प्रभृति अंगोपांगांच्या छेदन, अर्पण, दहन, भक्षण प्रभृति प्रक्रिया कांहीं वेदभागांत अितकी स्पष्ट आहे कीं, प्रत्यक्ष पशु मारणेंच त्या वेदमंत्रांत विहित आहे यांत शंका अुरत नाहीं. पण अितर वेदभागांत किंवा अर्थेमधें असे उलट अर्थाचे मंत्र नी प्रक्रिया येतात कीं, पशुहननाची ती निंदाच होय हेंहि स्पष्ट दिसतें. मग प्रश्न येतो समन्वयाचा, कीं फावलेंच मतभेदास ! योगानें अतींद्रिय ज्ञान पावलेल्यांचा, साक्षात्कार झाल्याचा ज्यांचा विश्वास, तसल्या आचार्यांचा, स्मृतिकारांचा, नव्हे प्रत्यक्ष मंत्रद्रष्ट्या ॠषींचा तो मतभेद ! कोणा लुंग्यासुंग्यांचा नव्हे ! कांहीं म्हणणार पशु मार-ण्याचें कारण नाहीं, नुसता देवास वाहून सोडून द्यावा. पण अितर मंत्रांत परिस्फुटपणें वर्णिल्याप्रमाणें देवांना तो पशु नुसता गोठ्यांत बांधण्यापुरताच नको असून खावयास हवा असतो ! त्याचे निर-निराळे मांसाचे आपापले पुरोडाश खाण्याचीच लालसा अुत्पन्न झाली असेल तर, तो पशु यज्ञांत नुसता त्यांना दाखवून सोडून दिल्यानें केवढी देवांची निराशा होईल, नव्हे, त्यांना केवढा राग येईल ! बुंदी-जिलबीच्या भोजनाचें आमिष दाखवून भुकेलेल्या ब्राम्हणास वा पाहुण्यास जेवावयास बोलवावें आणि त्यास नुसते तुपाचे बुधले नी साखरपीठ-मसाल्याचीं पोतीं दाखवावीं, हात जोडून म्हणावें हेंच

सर्व आपण बुंदी-जिलबीच्या ठायीं ‘कल्प्यन्ताम् !’ आणि लगेच ती सारी सामग्री ज्या वाण्याकडून आणली त्या वाण्याच्या घरीं धाडून द्यावी ! नाहींतर ‘त्या पाहुण्याच्या’ नांवें गांवांतल्या अितर लोकांनाच वांटून टाकावी ! असलें ‘आलभन’ म्हणजे त्या आमंत्रितांना बळानें पाडलेलें कडकडीत लंघनच नसून जसा त्या आमंत्रितांवर केलेला अेक अपमानाचा अत्याचारच होअील, तसेंच देवांस ‘पशूंचें रुचिर मांस देतों या, या, या,’ म्हणून वेदमंत्रांहीं आवाहनांवर आवाहनें करून, मांसाच्या त्या मसालेदार अपेक्षेनें तोंडास पाणी सुटलेले ते देव येतांच त्यांस पशु नुसता दाखवून सोडून देणें नी सांगणें कीं ‘यावें आतां ! ह्या आलभनालाच भोजन म्हणतात !’ ही निव्वळ चेष्टा होणारी आहे.

पिष्टपशूचा विकल्प तर त्याहूनहि ! पशु सोडून देणें ही जर चेष्टा तर पिष्टपशु निव्वळ वंचना ! पशूच्या पायाचे, काळजाचे, मज्जाचे, पाठीचे, अशा निरनिराळ्या रुचीच्या मांसांच्या लालसेस संतोषविण्याचें वेदमंत्रपूर्वक गंभीर वचन देअून बोलाविलेल्या देवतांसमोर पिठाचा गोळा ठेवायचा आणि म्हणायचें ‘पशु समजून हें पीठ खा !’ ‘पशु’ हा शद्ब तेवढा त्या दोन्ही पदार्थांस लावल्यानें मसाला घातलेल्या मांसाची नी तिखटमीठदेखील न घातलेल्या त्या पिठाच्या गोळ्याची बरोबरी होअील काय ? देव कांहीं ‘पशु’ हा शद्ब खावयास आलेले नसतात ! मग पुष्ट पशूच्या ठायीं पिष्टपशु देण्यानें त्यांची वंचनाच होअील, नाहीं का ? दुधासाठीं हपापलेल्या द्रोणाचार्यांच्या मुलास ‘दूध देतों आं’ म्हणून पिठांत पाणी कालवलेलें पेय दिलें; तेव्हां लहान मूल म्हणून फसलें नी दूधच मिळाल्यासारखें मिटक्या मारूं लागलें. पण सुरुचिर नी संपन्न मांसाची रुचि शतक्रतूंत मिटक्या मारमारून आस्वादिलेले देव तसे का फसणार आहेत ? लहान मुलांहून तरी अधिक चाणाक्षपणा देवांत असतो हें गृहीत धरणें बरें नव्हे काय ?

ग्रा. नि ... ८८९६ ता. ... ८।८।३७

ही सगळी आपत्ति टाळावयास जे मुळींच ठांसून सांगतात कीं, 'वेदांत पशुहनन मुळीं सांगितलेलेंच नाहीं; मांस म्हणजे माष–डाळीची अेक जात! तीं पशुहनन प्रकरणीं सारीं रूपकें आहेत!' त्या तसा अर्थ करणाऱ्या थोरथोर आचार्यांचें म्हणणें प्रमाण समजावें तर तितक्याच थोर असणाऱ्या दुसऱ्या आचार्यांचें म्हणणें अप्रमाण कां मानावें तें ठरविण्यास स्वतंत्र साधनच नाहीं! प्रत्यक्ष सृष्टींतील प्रकरणीं दोघां थोर पुरुषांचा मतभेद झाल्यास समक्ष पुराव्यानें तो निवारतां येतो. 'लंडन हें नगर आहे' 'लंडन हें अेक केवळ सरोवर आहे' अशीं भिन्न मतें दोघां अतींद्रिय ज्ञानी म्हणविणाऱ्या समयोग्य आचार्यांनीं बसल्या बसल्या दिलीं तर लगेच लंडनला जाअून दहा जणांच्या डोळ्यांसमक्ष नी डोळ्यांनीं तें पाहून तें नगरच आहे हें सिद्धितां येतें. पण मरणानें डोळे नित्याचे मिटल्यानंतरच जें दिसणार नी जें तसें दिसतें कीं नाहीं हें सांगण्यास परत येण्याची मुळींच सोय नाहीं, ते स्वर्गादिक प्रकरणींचे समज्ञानी आचार्यांचे मतभेद मिटणार तरी कसे? अितर प्रकरणींचे मतभेद, शद्वनिष्ठ श्रद्धा म्हणजे ते गृहीत धरले तरी, वेदवचन मिटविणार, पण वेदवचनच काय म्हणतें या प्रकरणींचा मतभेद मिटविण्यास श्रद्धेलादेखील, तिच्याच शद्वनिष्ठ प्रतिज्ञेप्रमाणें बुद्धीवांचून दुसरें साधन नाहीं!

वेद स्फुरविणाऱ्या अीश्वरानें जोंवर अशी सोय केली नाहीं कीं, वेदाचे शद्वहि अेकच नी त्यांचा मनुष्यबुद्धींत प्रतीतणारा अर्थहि अेकच; दुसरा अर्थच बुद्धींत प्रतीतणें अशक्य, तोंवर वेदवचनां-विषयींच होणारा अितका सर्वस्वीं परस्परविरुद्ध मतभेद, आणि सर्वकालज्ञानी म्हणविणाऱ्या साक्षात्कारी अधिकाराच्या आचार्यां-मधला!–केव्हांहि मिटणें शक्य नाहीं. समन्वयहि सदोदित संशयास्पदच राहाणार. कारण समन्वयाविषयींच तीव्रतर मतभेद शास्त्रकारांत होत आलेले आहेत.

तेव्हां सपशुहनन, पशुविसर्जन, पिष्टपशुहनन, किंवा अपशुहनन यांपैकीं कोणची प्रक्रिया खरी हें सदा संशयास्पद राहणारें असल्यामुळें यज्ञ हा केव्हांहि निःसंशयपणें, यथाविधि पार पाडतां येणें दुर्घटच असणार ! अर्थात् त्याच्या यथाविधि सांगतेवरच अवलंबणारीं पारलौकिक फळेंहि सदा संशयास्पदच राहणार, अितकेंच नव्हे, तर या चारांपैकीं कोणच्या तरी तीन वेदांविरुद्ध चुकाच होणाऱ्या असल्यामुळें वेदविधि अेका अक्षरानेंहि अयथावत् होतांच 'अिंद्रशत्रु' न्यायाचे घोर परिणाम मात्र बिचाऱ्या यजमानादिक यज्ञकर्त्यांस भोगावे लागण्याचा संभव तिप्पट असणार ! स्वर्गादिक फलप्राप्तीचा अेकेरीहि संभव संशयास्पद ! !

पुन्हा हे साग्निस्थूल यज्ञ हिणकस ठरविणारीं आणि यज्ञाची याहून प्रभिन्न अशीं निरग्नि सात्विकतर नाना रूपें नी प्रकार सांगणारीं वेदवचनें भरपूर सांपडतात तीं काय अुगीच समजायचीं ? तींहि वेदवचनेंच ! जपयज्ञ आहे, तपयज्ञ आहे, ज्ञानयज्ञ आहे, द्रव्ययज्ञ आहे, फार काय, कामयज्ञहि आहे ! कामाग्नि हाच अग्नि, योनि हेंच यज्ञकुंड, असें वर्णितां वर्णितां लावणींतहि सांगतां येत नाहीं अितक्या स्फुटतेनें कामसंभोगाच्या प्रक्रियेवर यज्ञप्रक्रियेचें रूपक वर्णिणारे कामयज्ञाचे प्रशंसक मंत्र आहेत ! जेवण हाच यज्ञ, जीवन हाच यज्ञ, जठराग्नि, कामाग्नि, संयमाग्नि, नाना प्रकारचे असे अग्नि वर्णिले आहेत. त्यांतून काय निवडायचें ? आणि निवड जर वेदविहित आहे तर ती कोणच्या कसोटीनें करायची ?

सर्व धर्म हे 'धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः तस्मात् धारणसंयुक्तं तम् धर्मं वेद तत्वतः' याच कसोटीनें परीक्षिले पाहिजेत, हेंच शास्त्रें प्रतिपादित असल्यामुळें या नानाप्रकारच्या यज्ञांत निवड करण्याचीहि तीच कसोटी शद्धनिष्ठ श्रद्धेच्या दृष्टीनेंहि त्यांतल्या त्यांत अधिक निरपवाद मानली पाहिजे.

त्या कसोटीस लावतां ज्या अग्निपूजेपासून प्रत्यक्ष अैहिक हित काडीचेंहि आतां या वैज्ञानिक युगांत साधणें शक्य नाहीं; अुलट समाजाची भावडी प्रवृत्ति जोपाशीत राहिल्यानें बुद्धिहत्या केल्याचा दोष पदरीं पडून द्रव्याचा, कालाचा, नी कष्टांचा अपव्यय होअूनहि प्राचीन अडाणीपणास चिरंतनविण्याची हानीच हाबि घडते; आणि पारलौकिक दृष्टचाहि ज्याचीं फळें मिळविणें सांग प्रक्रियेच्या प्रश्नीं वेदमंत्राचा कोणचाहि निश्चितार्थ ठरवितां येणें मानवी बुद्धीस अशक्य झाल्यामुळें, सर्वदा नी सर्वथा संदेहास्पदच असतें; ती अग्निपूजा आतां 'कलिवर्ज्यांत' ढकलून तें सारें यज्ञ-साहित्य त्या यज्ञाग्निसह यज्ञसंस्थेनें प्राचीन काळीं आपल्या राष्ट्रावर केलेले अुपकार ममत्वपूर्ण कृतज्ञतेनें वारंवार संस्मरत, भगवान् बुद्धा-प्रमाणें गंगेंत विसर्जिणें हेंच राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आतां श्रेयस्कर आहे ! !

त्यांतहि जीं स्वर्ग-संतति-संपत्ति प्रभृति अैहिक, पारलौकिक काम्य फळें साग्नियज्ञापासून लाभतात म्हणून सांगितलें आहे तींच नी त्याहूनहि क्वचित् अिष्टतर फळें, जपतपनृसेवाज्ञान प्रभृति स्वरूपाचे निरग्नि-यज्ञ आणि अितर साधनें यांनींहि मिळतात असें निःसंदेहपणें श्रुतिस्मृतिशास्त्रें वचन देत आहेत. स्वर्गादि पारलौकिक फलप्राप्तीचें साधन साग्नियज्ञ हेंच नसून त्याहून भक्ति, त्याग, सेवा, दया, ज्ञान, जनहितरतता प्रभृति अनेक साधनें वेदांत नी शास्त्रांत भरपूर आहेत. यज्ञामुळें जे स्वर्गांत गेले म्हणून कीर्तिले आहेत, त्यांच्यापेक्षां शतपटीनें अधिक साधक नी सिद्ध ह्या यज्ञव्यतिरिक्त साधनांनींहि क्षमशील स्वर्गपद पावले अितकेंच नव्हे तर अक्षय्य, मोक्षपदहि पावले, असें नामावलीसह त्याच वेदशास्त्र-पुराणांतून नी अर्वाचीन संतकथांतून आपणांस संकीर्तिलेलें आढळतें.

या यज्ञदानतपोभक्ति अित्यादि नाना साधनांनीं श्रद्धेच्या शास्त्राप्रमाणेंच, जे कांहीं पारलौकिक लाभ मिळतात ते, या

साधनांनीं तो 'यज्ञतपसाम्' भोक्ता नी फलाफलांचा नियंता जो भगवान्, जो नारायण, तोच संतोषून अर्पितो नव्हे काय? आणि यज्ञज्ञानतपांनाहि ज्याच्या योगेंच धर्म्यपण येतें त्या लोकधारण-व्रतापेक्षां, नारायणाची त्यांतल्या त्यांत अत्यंत उत्कृष्ट व्यक्ति जो नर त्या मनुष्यजातीच्या अुद्धारार्थ झिजण्यापेक्षां नारायणास संतोषविणारा दुसरा कोणचा यज्ञ, कोणचें व्रत, कोणचें तप, असूं शकणार आहे बरें? यज्ञापासून होणारे जे कोणचे पारलौकिक लाभ आहेत ते, श्रद्धेच्या नी शास्त्राच्या दृष्टीनेंहि, ज्या अर्थी परोपकारी जनसेवेपासून निःशंकपणें होणारे असलेच पाहिजेत आणि ज्याअर्थी यज्ञापासून आज जे मुळींच होत नाहींत ते अैहिक लाभ तर मनुष्य जातीच्या पदरांत ह्या परोपकारी जनसेवाव्रतानें रोखठोक येथल्या-येथेंच मोजून टाकतां येतात त्या अर्थी आतां आम्ही नरांची सेवा तीच नारायणाची सेवा समजून त्या सेवायज्ञावांचून अितर साग्निमज्ञांचें नित्याचें विसर्जन करणेंच खरा धर्म आहे, खरें कर्तव्य आहे.

## अगदीं आजच्या हिंदुराष्ट्राच्या परिस्थितींत अेकेक अनाथालय हें अेकेका अश्वमेध यज्ञाअितकें पुण्यप्रद आहे.

यज्ञ करणारा, सहस्रावधि सत्यनारायण तर सत्यनारायणच करीत राहणारा आणि त्यांत लक्षावधि रुपये खर्चणारा जो वर्ग आज भारतांत वा महाराष्ट्रांत आहे, तोहि धर्मात्मा नी हिंदुराष्ट्राचा अभिमानी वर्गच आहे. त्यांस लेखाच्या शेवटीं आमची विनंति अशी कीं, आज हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वावर जें धार्मिक भ्रष्टीकरणाचें आक्रमण होत आहे तें धर्मदृष्टयाच अत्यंत भयंकर विघातक असल्यामुळें त्यांनीं त्यांचें तरी निवारण करण्याचें व्रत आधीं घ्यावें. शुद्धीकरणाची कामगिरी ज्या ज्या हिंदुसभा करीत आहेत त्यांचा

हाच अनुभव आहे कीं, आज भारतामध्यें तर राहोच पण महाराष्ट्रांतहि अेकाद दुसरेंसुद्धां आर्थिक संपन्नतेच्या पायावर बळकटपणें अुभारलेलें हिंदु अर्भकालय नसल्यामुळें म्लेंच्छांच्या तावडींतून वांचवितां येण्याची संधि आली तरी हजारों हिंदु अर्भकें पाळणें अशक्य झाल्यानें मुसलमान मिशनच्या हातीं अहिंदु धर्माच्या शिकवणीनें हिंदु राष्ट्राच्या शत्रूंची संख्या नी बळ आमचींच हिसडून नेलेलीं अर्भकें वाढवीत आहेत–वाढवितांना डोळे मिटून पहात बसावें लागत आहे. अितर सर्व कर्तव्यें राहोत, धर्म्य विषयाशीं ज्याचा अत्यंत निकट संबंध पोंचतो तें अेक कर्तव्य तरी त्या सज्जनांनीं जशा तांतडीनें त्यांनीं सत्यनारायणसहस्त्रकें वा यज्ञ पार पाडला तशा तांतडीनें पार पाडावें. **केडगांवच्या नारायण महाराजांस, तुकडोजीबुवांस, किंजवडेकर शास्त्रीबुवास, नव्हे, उपासनीमहाराजांस देखील आमची या विषयानुरोधें अशी विनंति आहे कीं, त्यांनीं प्रत्येकीं अेकेक हिंदु अर्भकालय, विशेषतः अहिंदूंच्या हातून हिंदुसभांनीं सोडविलेल्या अर्भकांस पालनपोषण-शिक्षण यांहीं हिंदुराष्ट्राचे सैनिक बनविणारीं हीं उद्धारालयें तत्काळ संकल्प सोडून स्थापावीं.** यज्ञांत वा सत्यनारायणांत जो अन्नाचा अेका दहापांच दिवसांत फडशा पडतो, गेल्या दोन वर्षांत जें लाखों रुपयांचें द्रव्य त्यापायीं अिंदूर, कुरुंदवाड, केडगांव, मोर्शी प्रभृति ठिकाणीं व्यय झालें त्याच द्रव्यांत प्रत्येकीं अेकेक अर्भकालय स्थापतां आलें असतें, शंभर वर्षें तरी टिकणारी अेक नोंदीव ( रजिस्टर्ड ) संस्था काढण्याचें पुण्य लाभतें ! असें हिंदु धर्माच्या नी हिंदु राष्ट्राच्या अस्तित्वास आज अत्यंत अवश्य असलेलें हिंदु अनाथालय हें पारलौकिक दृष्टयादेखील, अेका यज्ञानें वा हजार सत्यनारायणांनीं संतोषविला जातो त्याहून त्या नारायणास नरांच्या अुद्धाराचें धर्मकृत्य म्हणून अधिक संतोषवील हें श्रद्धेलादेखील नाकारतां येणार नाहीं; आणि हिंदुराष्ट्राच्या अभिमानास जाग-

विणारे नी जगविणारे सारे अैहिक लाभ तर यज्ञांदिकांहून ह्या धर्मकृत्यानें येथल्या येथें रोखठोक पदरांत पाडून घेतां येतील.

मसूरकर महाराजांनीं गोमांतकांत दहा हजार ओघव जे हिंदूंच्या सांस्कृतिक बंदींत आज तीन शतकें खितपत पडले होते यांस सोडविलें नी हिंदूंच्या छावणींत परत आणलें नी त्यास हिंदुचें धर्माचे अभिमानी करून सोडिलें, तोः आजच्या परिस्थितींत या हिंदु राष्ट्रधर्माची अेक खरी कामगिरी पार पाडणारा यज्ञच नव्हे काय? नारायणाची पूजा दहा हजार घरीं पुन्हा चालू झाली! हिंदु राष्ट्राचा जो कोणी अभिमानी देव असेल तो ह्या अशाच यज्ञानें अधिक संतोषेल आणि यज्ञाचीं म्हणून जीं पारलौकिक फळें मिळणें तीं, मिळत असतील तर, अधिक निश्चितीनें मिळाल्यावांचून कधींहि राहाणार नाहींत. जेवढ्या द्रव्यांत हे दहा हजार लोक अहिंदूंच्या बंदींतून सोडविले, म्लेंच्छांची तीन शतकांची कारवाअी विफल केली यांचें अुट्टें काढलें, तेवढीच मोठी रक्कम कुरुंदवाडास अेक बोकड मारण्याच्या कार्यीं खर्च पडावी हा काय देशकालपात्रविवेक? का हिंदुधर्मरक्षण? याचा विचार शांत चित्तानें आमच्या हिंदु-बांधवांनीं करावा.

ज्या परिस्थितींत हिंदुराष्ट्राच्या धारणास नी अुद्धारणास जें कृत्य प्रत्यक्षपणें लाभदायक नी अवश्य असेल तें संपादिणें हाच त्या परिस्थितींतील यज्ञ, हिंदु धर्म! मनुष्यजातीस हितप्रद – तो मनुष्यधर्म!

• • •

# गोपालन —गोपूजन नव्हे !

गाय हा पशु हिंदुस्थानासारख्या कृषिप्रधान देशाला अत्यंत अुपयुक्त असल्यामुळें अगदीं वैदिक काळापासून आपणां हिंदु लोकांस तो आवडता असावा हें साहजिकच आहे. गायीसारखा वत्सल, माणसाळू, बापडा, सुरेख, दुधाळ पशु कोणास आवडणार नाहीं ? आअीच्या दुधाखालोखाल जिचें दूध आपल्या देशांत तरी मुलांस मानवतें, मृगयाशील युग ओलांडण्याअितका सुधारतांच त्या प्राचीन काळापासून मनुष्याची जी गाय आज युगानुयुगें अत्यंत प्रामाणिक सोबतीण झालेली आहे आणि शेतीचे खालोखाल जिच्या दूधदहीलोणीतुपावर मनुष्याचा पिंड आजहि पोसला जात आहे, त्या अत्युपयुक्त पशूचें आम्हां मनुष्यांस अेखाद्या कुटुंबीयाअितकें ममत्व वाटावें हें अगदीं माणुसकीस धरूनच आहे. अशा त्या गाअीचें रक्षण करणें, पालन करणें, हें आपलें वैयक्तिक नी कौटुंबिकच नव्हे तर आपल्या हिंदुस्थानापुरतें तरी अेक राष्ट्रीय कर्तव्यच आहे.

अितकेंच नव्हे, तर जो प्राणी आपणांस अितका अुपयुक्त आहे त्याविषयींमनांत अेक प्रकारची कृतज्ञ भावनाहि अुपजणें, विशेषतः आपणां हिंदूंच्या भूतदयाशील स्वभावास, अगदीं साजेंसें आहे.

आपणांस गाय ही अुपयुक्त आहे म्हणून प्रिय वाटते ही गोष्ट अितकी निर्विवाद आहे कीं, जे गोभक्त तिला कृतज्ञतेच्या भरांत देवी मानून तिला पूजितात, त्यांस देखील ती पूजा योग्य आहे का, असें विचारतांच, ते त्या पूजेच्या समर्थनार्थ गाय ही देवता आहे, अितकेंच कारण सांगण्याच्या आधीं चटकन् ती गाय आपणांस किती अुपयुक्त आहे, हेंच सांगूं लागतात. तिच्या दुधापासून तो शेणापर्यंतच्या सर्व पदार्थांचे मनुष्यास किती भिन्न भिन्न प्रकारचे अैहिक अुपयोग होतात, ह्याचाच यथाप्रमाण वा अतिप्रमाण पाढा वाचूं लागतात. अर्थातच, जे त्या गायीला देवता मानतात, तेदेखील ती गाय मनुष्यास अिहलोकीं सुद्धां अुपयुक्त आहे म्हणूनच देवता होय. मनुष्यास ती गाय सिंहासारखी जर ह्या जगांत खाअूं लागती, दूध देअून पोषण्याच्या ठायीं सापासारखेंच विष दंशून ठार मारती, तर ती गाय आम्हीं अशी देवता म्हणून मानली नसती, पूजलीच असती. तरी कृतज्ञतेनें नव्हे, तर मरीआओस पूजतों तशा त्रासिकभीतीनें; हें सत्य ते गोपूजक गोभक्तदेखील कळत वा नकळत पण अपरिहार्यपणें मानून जातात.

तेव्हां, गाय हा पशु मनुष्यास ह्या जगीं अुपयुक्त आहे म्हणून पालनीय आहे असें म्हणणारे आणि गाय ही मनुष्यास अिहलोकींसुद्धां अितकी उपयुक्त आहे कीं, ती अेक पूजनीय देवता आहे, असें म्हणणारे या दोन्ही पक्षांत मनुष्यास गायीपासून ह्या जगांत पुष्कळ अुपयोग होतात, म्हणून ती पाळावी वा पूजावी हें विधेयच काय तें निर्विवाद मान्यता पावलेलें असतें.

मग उभयपक्षांस अगदीं निर्विवादपणें मान्य असलेल्या या विधेयास ( पॉइंटला ) अनुसरून जर तेंच सत्य व्यवहारिलें जातांना

त्यांतील त्या मुख्य अुद्दिष्टाची अधिकांत अधिक पूर्तता व्हावी, या हेतूनें अशा सूत्रांत सांगितलें कीं, मनुष्यास तिचा ज्या योगें अधिकांत अधिक अैहिक अुपयोग होअील; अशा रीतीनेंच गायीचें पालन व पूजन केलें जावें, ज्यायोगें त्या गायीपासून मनुष्याच्या हितास अुपयोग तर नाहींच पण उलट हानि होते, माणुसकीसच कमीपणा येतो, अशा गोरक्षणांतील मुख्य हेतूसच विफलविणारा गोरक्षणांतील अतिरेक त्याज्य होय; तर तें सूत्र यच्चावत् गोरक्षण कार्यकर्त्यांस मान्य व्हावयास काय बरें हरकत आहे ? निदान अितकें तरी निर्विवादच आहे कीं, मनुष्यास गायीचा ज्यायोगें अधिकांत अधिक अुपयोग अैहिक दृटष्या देखील होअील, असेंच आपल्या राष्ट्राचें गोविषयक धोरण नी व्यवहार असला पाहिजे, हें सूत्र कोणास आवडलें नाहीं तरी नाकारतां येणें शक्य नाहीं. कारण, गोपालनाचेंच नव्हे, तर गोपूजनाचेंहि समर्थन गोभक्तहि गाय ही मनुष्यास ह्या जगांत सुद्धां अत्यंत अुपयुक्त आहे, ह्याच कोटिक्रमावर मुख्य भर देअून करतात.

आतां, ह्या कसोटीनें गाईंविषयींचे आपले सारे व्यवहार नी भावना परीक्षूं जातांच, पहिल्या धडाक्यासच आपल्या ध्यानांत येतें कीं, मनुष्याला गाअींचा अधिकाधिक प्रत्यक्ष अुपयोग जर करून घ्यावयाचा असेल तर,

## देवता समजून गोपूजनाची भावना सर्वस्वीं त्याज्य आहे

हें आपणांस मानावें लागेल. त्याचीं कांहीं कारणें अशीं— (१) देवकोटि ही मनुष्यकोटीहून अुच्चतर अशा वास्तव वा कल्पित भावजातांची असते; मनुष्यांहून सद्‌गुणांचा, सच्छक्तींचा, सद्‌भावांचा विकास ज्यांत अेकंदरींत प्रकर्षलेला असतो तो देव वा देवता, परंतु पशु ही मनुष्याहून हीनतर कोटि. अतिमानुष ती देवता, देव. अपमानुष तो पशु, कीट. गाय ही धादांत अेक पशु. मनुष्यांतील अगदीं निर्बुद्ध माणसाअितकी बुद्धि देखील ज्यांत नाहीं अशा

कोणच्याहि पशूला देवता मानणें म्हणजे माणुसकीचाच अपमान करणें आहे. मनुष्याहून सद्‌गुणांत वा सद्‌भावांत अुच्चतर अशा प्रतीकास अेक वेळ देव मानतां येअील, पण अणकुचीदार शिंगें नी गोंडेदार शेंपूट ह्यांवांचून ज्या पशूंत मनुष्याहून अधिक निराळें असें सांगण्यासारखें कोणचेंहि आधिक्य नाहीं, मनुष्याला अुपयुक्त म्हणून काय तो ज्याचा थोडाफार गौरव नी ममत्व मनुष्यांस वाटावें अशा गायीस काय नी कोणत्याहि पशूस काय, माणसानें देवता म्हणून मानणें म्हणजे माणुसकीसच नव्हे तर देवत्वासहि पशूहून कमी लेखणें होय !

गोठ्यांत अुभ्या अुभ्या गवतकडबा खात असलेल्या, अेकीकडे खातांखातांच अुभ्या अुभ्या दुसरीकडे मलमूत्रोत्सर्ग निःसंकोचपणें करणाऱ्या, थकवा येतांच रवंथ करीत त्याच मलमूत्रोत्सर्गांत स्वेच्छया बैठक मारून बसणाऱ्या, शेंपटीच्या फटकाऱ्यानें स्वतःच्या शेण-मूत्राचा तो चिखल अंगभर अुडवून घेणाऱ्या, दावें सुटून थोडा फेर-फटका करण्याची संधि मिळतांच अनेक समयीं कोठेंतरी जाऊन घाणींत तोंड घालणाऱ्या नी तसेंच ओंठ चाटीत गोठ्यांत आणून बांधल्या जाणाऱ्या त्या गायीस, शुद्ध नी निर्मल वसनें नेसलेल्या सोज्वल ब्राम्हणानें वा महिलेनें हातीं पूजापात्र घेऊन गोठ्यांत पूजावयास जावें नी तिच्या शेंपटीस स्पर्शून आपलें सोंवळें न विटा-ळतां अुलट अधिक सोज्वळलें आणि तिचें तें शेण नी तें मूत्र चांदीच्या पेल्यांत घोळून पितांना आपलें जीवन अधिक निर्मळलें असें मानावें ! तें सोवळें कीं जें आंबेडकर महाशयासारख्या महनीय स्वधर्मबंधूच्या श्रेष्ठ मनुष्याची सावली पडतांच विटाळावें ! ते ब्राम्ह-क्षात्र जीवन कीं जें तुकारामासारख्या संताच्या नुसत्या पंक्तीस बसून सत्वस्थ दहीभात खाल्ला असतांहि भ्रष्टावें ! तें सोंवळें नी तें ब्राम्हक्षात्र जीवन त्या गोठ्यांतल्या अमंगळखाअू गायीच्या मल-मूत्रांत लडबडलेल्या शेपटीस शिवतां सोज्वळावें, गोमय–गोमूत्र पितां

निर्मळावें, पवित्रावें !! पशु तो देव, देवासारखा माणूस तो पशु ! ह्या दोन्ही रूढि धर्म नी सदाचार म्हणून अेकसमयींच अेकत्र गौरविणाऱ्या वस्तुस्थितीहून, धर्माचा छाप पडतांच केवळ विसंगत मूर्खपणा, सुसंगत शहाणपणा, सच्छील पवित्रपणा वाटूं लागतो, मनुष्याची कशी बुद्धिहत्या होते, याचें आणखी दुसरें समर्पक अुदाहरण तें कोणतें द्यावें ?

(२) परंतु पशूला देवता मानल्यानें माणुसकीसच हा जो असा कमीपणा येतो, तो नुसता तात्विक किंवा लाक्षणिकच असता तरीहि ह्या अतिरेकाचा अितका तिटकारा आला नसता. पण 'गाय ही देवता आहे, गाय ही गोमाता आहे' या वाक्यांस केवळ अलंकारिक भाषा न मानतां अक्षरशः सत्य मानून तोच धर्म समजून मनुष्याच्या हितास प्रत्यक्ष व्यवहारांतहि त्या गोपूजेच्या वेदीवर बळी देण्यास जेव्हां ही गोभक्ति चुकत नाहीं, तेव्हां तर तीस निषेधिणें हें एक राष्ट्रीय कर्तव्य होअून बसतें. गाय देवता म्हटली, गोपूजन हें कर्तव्य म्हटलें कीं मनुष्य हा गायीसाठीं आहे अशी श्रद्धा अुत्पन्न होणारच होणार; पण मनुष्यास गायीचा अुपयोग आहे म्हणून तिचें पालन करणें अुचित अितकाच गोपालनाचा अर्थ स्पष्टपणें मर्यादिलेला असला कीं मनुष्यास अुपयुक्त होण्याच्या ठायीं गाय ही राष्ट्रहानीस कारणीभूत होत आहे असें पाहातांच अशा परिस्थितींत गोरक्षण हेंच त्याज्य, निंद्य, पाप होणारें आहे हें न शिकवितांहि आपोआप समाजास समजतच असतें. गाय ही मनुष्यासाठीं असून मनुष्य हा गायीसाठीं नाहीं या सूत्राप्रमाणें मनुष्याचें, राष्ट्राचें अेकंदर हित साधत असेल तर गोहत्याहि करण्यास कोणीहि कचरणार नाहीं.

समजा, अुद्यां आपल्या हिंदु राष्ट्राचें कोण्या अहिंदु राष्ट्राशीं निकराचें युद्ध जुंपलें. पुण्यासारख्या वा दिल्लीसारख्या हिंदु राष्ट्राच्या राजधानीस वा सैनिककिल्लीच असलेल्या अेखाद्या महत्वाच्या

किल्यास शत्रूचा वेढा पडला, अन्न संपून गेलें, परंतु आणखी कांहीं दिवस जर तें स्थान हिंदु सैन्य लढवूं शकलें तर बाहेरून नव्या हिंदु सैन्याचें सहाय्य येऊन तें बाणीचें ठिकाण शत्रूच्या हातून सोडविणें शक्य आहे; तसा टिकाव न धरतां तें ठिकाण शत्रूच्या हातीं पडूं देणें एकंदर हिंदु राष्ट्राच्या अपजयास कारण होणारें आहे. अशा स्थितींत त्या शत्रूच्या वेढ्यांत गवसलेल्या हिंदु सैन्यास अन्नाचा पुरवठा करण्यासाठीं जे पशु लढाईस गुंतलेले नाहींत ते मारून खाणेंच राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत पवित्र कर्तव्य होय. अशा आणीबाणीच्या वेळा अितिहासांत प्रत्येक राष्ट्रास आलेल्या आहेत. अशा वेळीं गाय हा उपयुक्त पशु आहे, मनुष्यास अधिकांत अधिक अुपयोग करून घेण्यासाठींच गोपालन कर्तव्य असतें, आज त्या वेढ्यांत सांपडलेल्या हिंदूंच्या राजधानीच्या वा दुर्गांच्या संरक्षणासाठीं तेथील बाठ्या नी युद्धार्थ अनवश्यक अशा गायीहि मारून त्यांचें मांस खाणें हाच त्यांस हिंदु राष्ट्रास अुपयुक्त करून घेण्याचा खरा मार्ग आहे असें आढळतांच हिंदु सैन्यानें त्या गायी मारून खाणें नी त्या बळावर हिंदु राष्ट्राच्या शत्रूंशीं झुंजत रहाणें हाच हिंदूंचा खरा धर्म ठरणार ! गोपालन नव्हे, तर गोहत्या हीच पुण्यप्रद होणार !

परंतु जर गाय ही देवता, तिचें पूजन हाच धर्म, अशा भावनेस अक्षरशः सत्य मानणारे गोभक्त हिंदु त्या सैन्यांत असतील तर ते तशा गोहत्येच्या बातमीसरशीं 'धर्म बुडाला' म्हणून खवळून त्या हिंदु सेनापतीच्याच विरुद्ध बंड अुभारतील, नव्हे तें राष्ट्रीय शक्तीचें केंद्र हिंदु शत्रूंच्या हातीं पडूं देतील ! राष्ट्रहत्या करतील पण गोहत्या करणार नाहींत ! कारण गायीला माता नी बैलाला पिता मानणाऱ्या ह्या आजकालच्या भाकड पोथ्या गोहत्या हें महापाप आहे हें शतावधि अनुष्टुप् ओंव्यांतून सांगत असतांना स्वराष्ट्रहत्या हें त्याहूनहि सहस्रपटीनें महत्तर पाप आहे, प्रत्यक्ष या लोकींच त्या पापी मनुष्यास पचवीत राहाणारा महानरक आहे, हें विधान मात्र चुकूनहि फारसें करीत नाहींत !

गायीला देवता मानण्याच्या यःकश्चित् अेका देवलसी प्रवृत्तीचे परिणाम भितके भेसूर नी राष्ट्रहितघातक होतात हें केवळ अतिशयोक्त वर्णन आहे, असें सहजगत्या वाटणाऱ्या वाचकांनो, तुम्हांला हें अैकून आश्चर्य वाटेल कीं, गाय ही मनुष्यासाठीं नसून मनुष्य हा गायीसाठीं आहे ही भाबडी भावना गोपूजनाचा, गायीचें देवीकरण करून सोडण्याचा, अवश्यभावी परिणाम आहे. हें नुसतें तर्कट नसून आपल्या अितिहासांत अनेक समयीं तसे परिणाम प्रत्यक्षपणें घडलेले आहेत. गायीपायीं हिंदु राष्ट्राच्याच पायांत पारतंत्र्याची बेडी ठोकण्यासहि हातभार लावण्यास ही भाबडी भावना नकळत मूर्खपणानें कचरली नाहीं. मुसलमानांच्या अितिहासांतहि हिंदूंच्या ह्या भाबडेपणाचा अुल्लेख आहे. आपल्याहि अितिहासकारांनीं त्या घटना अुल्लेखिलेल्या आहेत. मुसलमानांचीं आक्रमणें प्रबळ वेगानें जेव्हां हिंदुस्थानावर चालू झालीं, तेव्हांच्या त्या हिंदूंच्या अत्यंत भाबड्या काळांत प्राण गेला तरी हिंदु लोक गायीवर हात अुगारणार नाहींत ही गोष्ट ठाअूक होतांच कांहीं प्रसंगीं मुसलमान सैन्यानें स्वतःच्या व्यूहापुढें गायींच्या कळपांचे गोल बांधून त्यांस पुढें रेटीत हिंदूंच्या सैन्यावर चढून यावें. तें पहातांच शस्त्रास्त्रसज्ज हिंदु सैन्यानें अकस्मात् अेकहि बाण सोडण्याचें वा अेकहि हत्यार चालविण्याचें नाकारावें ! कारण मुसलमानांवर तसा बाण सोडतांच वा हत्यार चालवूं जातांच प्रथमतः शत्रूपुढच्या गायीवरच त्याचा मारा होणारा असल्यामुळें गोहत्येचें महापाप घडणारच घडणार ! कोणताहि हिंदु गोहत्येच्या पापाचा अधिकारी होअूं धजेना ! रणांगणावर मुसलमानांशीं झुंजण्यासाठीं दळबळासहित चालून आलेलें तें हिंदु सैन्य सिंहाचा पंजा अकस्मात् लुला होतांच सिंह जसा गाय बनतो तसें गाय बनून रणांगणांतून मागेंमागें हटूं लागावें ! लढाअी न लढतांच मुसलमानांनीं जिंकावी आणि त्या विजयाचा अुत्सव त्याच गायी कापून त्यांच्या मांसांवर ताव मारीत साजरा करावा ! जी गायीची गोष्ट तीच देवळांची.

मुलतानावर प्रबळ हिंदु सैन्य चालून येतांच मुसलमानांनीं धाक घातला कीं, 'तेथील विख्यात नी पवित्र सूर्यमंदिर पाडून टाकूं अेक पाऊल पुढें याल तर !' ह्या पापास भिऊन मुलतान मुसलमानांच्या हातांतून सोडविण्याचें अत्यंत महत्वाचें नी त्या प्रसंगीं त्या प्रबळ हिंदु सैन्यास दुर्घट नसलेलें राष्ट्रकार्य तसेंच टाकून हिंदु माघारे फिरले ! "श्री' सोडवावी' ( काशी स्वतंत्र करावी ) हें वाक्य, ही तळमळ पहिल्या बाजीरावापासून तों नानामहादजीपर्यंत सर्वांना सारखी लागलेली पत्रोपत्रीं अुल्लेखित आहे. पण मल्हारराव होळकरांनीं काशीवर अचानक छापा घालून हिंदुपदपादशाहीचा तो मुकुटमणि हस्तगत करायचा यत्न करतांच मुसलमानांनीं धाक घातला, 'देवळें पाडूं, ब्राह्मण मारून टाकूं, तीर्थें बाटवूं !' त्यासरशीं काशीच्या हिंदु नागरिकांनीं त्या मुसलमानांचेच दांत तिथल्या तिथें पाडण्याचें सोडून अुलट मल्हाररावांपुढें दांत विचकले, धरणें धरलें, शपथा घातल्या, कीं काशी मुसलमानांकडेच राहूं द्यावी नाहीं-तर तीर्थक्षेत्र ते बाटवितील; हिंदु धर्मास कलंक लावणाऱ्या महापापाचें खापर मल्हाररावांच्या माथीं फुटेल ! शेवटीं काशीचेच नागरिक मुसलमानांच्या पक्षास मिळालेले पाहून छाप्याचा बेत दुर्घट म्हणून मराठ्यांस सोडून द्यावा लागला !!

दहा देवळें, मूठभर ब्राह्मण, दहापांच गायी मारण्याचें पाप टाळावें यास्तव राष्ट्र मरूं दिलें ! गोहत्येचें पाप टाळावें म्हणून राष्ट्रहत्या घडूं दिली ! राष्ट्राहून राष्ट्रांतील अेक पशु श्रेष्ठ मानला ! राष्ट्रस्वातंत्र्य पडलें तरी चिंता नाहीं, अेक देअूळ पडण्याची चिंता ! असा अेखादा जरी प्रसंग अितिहासांत घडतां, तरीहि 'धर्माच्या' भाबडेपणास अधर्माहूनहि नरकगामी ठरविता. मग जिथें असे प्रसंग महंमद गजनवीच्या काळापासून तों दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत ह्या वा त्या रूपानें वारंवार घडलेले आढळतात, तिथें या पोथीनिष्ठ, विवेकशून्य, राष्ट्रघातक 'धर्मभोळे'पणाचा आम्हांस अत्यंत

ग्रं. ता.

तिटकारा यावा ह्यांत कोणाचा दोष बरें! आम्हां अुपयुक्ततावाद्यांचा का त्या राष्ट्रबुडाअू धर्मभोळेपणास अजूनहि चिकटून राहूं पहाणाऱ्या आमच्या भाबड्या पोथीवाद्यांचा!

हें पाप! हें पुण्य! बस्स, अितकीच अरेरावी आज्ञा पोथी सोडते! तें पाप कां, पुण्य कां, त्यांचा हेतु काय, कोणत्या परिस्थितींत किती कालावधि; तो प्रश्नदेखील ती विचारूं देत नाहीं, विशदीत नाहीं! गोहत्या पाप, गोपूजन पुण्य; बस्स! गोहत्याच पाप कां, ह्मैसहत्या वा गाढवहत्त्या कां नाहीं. राष्ट्रहत्त्या नी गोहत्त्या असा विकल्प उपजतां त्यांच्या तरतमभावाची कसोटी काय तें पोथी सांगणार नाहीं, विचारूं देतच नाहीं. त्यामुळें ज्या मूळ अुपयोगासाठीं गोहत्त्या पाप ठरली त्या हेतूचीच हत्त्या ती गोहत्त्या टाळण्यासाठीं वारंवार अशी घडावी हें पोथीनिष्ठांच्या प्रकरणीं अपरिहार्य होअून बसतें. परंतु विज्ञान नुसतें हें 'पाप' हें पुण्य अशी अरेरावी आज्ञा न देतां तसें कां, त्याचा हेतु काय, तरतमभाव कोणता, कसोटी कोणती तें प्रत्येक प्रकरणीं स्पष्टपणें अैहिक प्रत्यक्षाचे पुरावे देअून विशदितें. मनुष्यास गाय हा अेक अुपयुक्त पशु आहे, यास्तव तो मनुष्यास तसा अुपयुक्त असेतों मारूं नये, अुपयुक्त न होतां हानिकारकच ज्या परिस्थितींत होअील, त्या प्रसंगीं गोहत्त्याहि अवश्य, असें विज्ञान रोखठोक अुत्तरतें. त्यामुळें कोणत्याहि प्रसंगीं विज्ञाननिष्ठ मनुष्यास आपलें कर्तव्य पोथीनिष्ठ मनुष्यापेक्षां त्यांतल्या त्यांत अधिक अचूकपणें ठरवितां येतें.

वर अुल्लेखिलेल्या अैतिहासिक प्रसंगीं जर ह्या वैज्ञानिक अुपयुक्ततेची कसोटी लावतां आली असती तर त्या त्या हिंदु सैनिकास नी सेनापतीस आपलें कर्तव्य दिवसासारखें ढळढळीतपणें दिसूं लागतें. जे हिंदुधर्मच अुच्छेदूं आले, हिंदूंचें राज्यच बुडवूं निघाले, त्या दैत्यांच्या पुढें असलेल्या त्या गायींच्या कळपास त्या हिंदु सैन्यानें चराचर कापून त्या प्रत्येक गायीच्या हत्येचें प्रायश्चित्त म्हणून

त्यांच्यामागें दडलेल्या त्या शतशत म्लेंच्छांच्या रक्तांत आपले हात धुवून टाकले असते. कारण त्या रणप्रसंगीं त्या मूठभर गायी वांचविण्यासाठीं मुसलमानांच्या मुठींत आपल्या हिंदु स्वातंत्र्याचेंच नरडें करकचूं दिल्यानें; अशी अेक गाय, अेक देअूळ, अेक तीर्थ वांचविण्यासाठीं अेकेक लढाअी मुसलमानास जिकूं दिल्यानें, अेकेक हिंदु राज्य बुडवूं दिल्यानें, अेकेक मुसलमानी बादशाहीच अुरावर चढवून घेतल्यानें, शेवटीं अुभ्या हिंदुस्थानांतील साऱ्याच देवळांच्या मशिदी होतील, सारींच तीर्थें भ्रष्टतील, प्रत्येक दहादहा हजार गायींची कत्तल करणारे कसाअीखाने शतकोंशतकें ह्याच हिंदुस्थानांत कीं ज्यांत अेकहि गाय अन्नासाठीं अशी कांपली जाणें दुर्घट होतें, त्याच हिंदुस्थानांत नित्याचे अुघडले जातील आणि शेवटीं ' देवमात्र अुच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।' अशी सगळी हिंदु पृथ्वी आंदोळून अुठेल हा आपला भीषण परिणाम त्या कालच्या हिंदु सेनानींस नी हिंदु जनतेस ढळढळीतपणें दिसण्यास अेक क्षणाचाहि विलंब लागतां ना ! मुलतानचें अेक सूर्यमंदिर पाडण्याचा धाक मुसलमानांनीं घालतांच पोथीनें आंधळलेला हिंदु नसता तर त्यानें तात्काळ अुलट प्रत्युत्तरिलें असतें कीं ' पाड तें सूर्यमंदिर; पण म्लेंच्छा, समजून अैस कीं, ही हिंदुसेना आतां परतो न जातां तें मुलतान तुझ्या हातून सोडवून काबूलपर्यंत जितकी म्हणून मशीद दिसेल तिच्या तिच्यावर गाढवाचा नांगर फिरवून देण्यास सोडणार नाहीं ! आणि त्या काबूलच्या शाही मशिदींच्या शिळाच्याच पायावर मुलतानचें सूर्यमंदिर पुन्हा उभारलें जाअील !' मल्हारराव होळकर पुढें आले तर काशीचें अेकहि तीर्थ, देवालय, ब्राम्हण अुरूं देणार नाहीं म्हणून अयोध्येच्या नबाबानें काशीच्या ब्राम्हणादिक हिंदूंस धरणी धरून धाकवितांच ते अुत्तरले असते, ' पाड तें देअूळ ! औरंगजेबानें त्या विश्वेश्वराचें देअूळ अर्धें पाडून पूर्वीं मशीद बनविलीच आहे– तूं बाकीचें पाड ! नी कांप हीं आमचीं मूठभर ब्राम्हणांची शिरें ! पण ध्यानांत धर कीं, आज तुझी गांठ दिल्ली गद्‌गद् हालवून सोडणाऱ्या मराठ्यांशीं

आहे नी तिकडे पुण्यास आज आहे 'ब्राम्हणी राज्य जोरावर, घोड्यावर स्वार, लाखों शिपाअी !' ते या अेका काशीच्या देवळाचा सूड घेण्यासाठीं महाराष्ट्रांत तरी मशीद म्हणून अुरूं देणार नाहींत, रस्ते साफ करून मशिदी नी वाद्यें हा प्रश्नच आमच्या पुढच्या पिढ्यांना त्रास देण्यास मागें ठेवणार नाहींत ! राजकीय लढ्यांत धर्मस्थानें न अवमानण्याची आम्हां हिंदूंची वहिवाट; शनिवारवाड्यांतदेखील अेक पीर सुरक्षित ठेवला; पण जर तुम्ही म्लेंच्छ ती वहिवाट पुन्हा तोडाल तर हिंदूहि तिला ठोकरून देतील; कारण आज तरी सिंधूपासून सेतुबंधापर्यंत मराठ्यांचें शस्त्र हेंच शास्त्र आहे. महाराष्ट्रांत तुमच्या मशिदी त्यांच्या पायावर अुभ्या नाहींत तर आमच्या दयेवर !' पोथीनें आंधळलेले नसते तर ते हिंदु त्या नबाबास असें धमकावते नी धमकावणी खरी करून दाखविण्याचें सामर्थ्यहि हिंदु खड्गांत त्या वेळीं होतें. पण त्यांनीं आंधळ्या पोथीनिष्ठतेसाठीं मूठभर गायी मारण्याचें 'पाप' घडूं नये म्हणून राष्ट्र बुडवून लक्षावधि गायी शतकोंशतकें मारणाऱ्या कसाअीखान्यांचीं ताम्रपत्रें म्लेंच्छांस दिलीं. देवाचें अेक देअूळ अुच्छेदूं नये म्हणून देवाचें राज्यच अुच्छेदूं दिलें ! !

## म्हैस, घोडा, कुत्रें; फार काय, गाढवदेखील आपापल्यापरी गायीसारखेंच मनुष्यास उपयुक्त आहे.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होअील कीं, मनुष्याला अधिकाधिक अुपयोग ज्यायोगें होअील अशा प्रकारेंच गायीची जोपासना करावयाची असेल तर तो हेतु साधण्यास गोपालन हें राष्ट्राचें कर्तव्य होय असेंच सूक्त राष्ट्रापुढें ठेवलें पाहिजे. गोरक्षण हा धर्म आहे, तें अैहिक नी पारलौकिक पुण्य आहे, गाय ही देवता आहे, अितकेंच नव्हे, तर तिच्यांत अेक सोडून तीस कोटि देवता राहतात प्रभृति बाष्कळ

कल्पनांवर अनुष्टुपें रचून गोपूजन हाच हिंदु धर्म आहे हें सूत्र राष्ट्रापुढें ठेवल्यानें गायीचें रक्षण तर हवें तसें होत नाहींच, पण भाबडेपणाची प्रवृत्ति राष्ट्रांत वाढून गोभक्तीपायीं राष्ट्रभक्तीचेंच खोबरें होतें, मनुष्याच्या हिताचाच बळी गायीपुढें देण्यांत येऊन गोरक्षणांतील मूळ हेतूलाच धक्का पोंचतो. कितीहि अुपयुक्त असला तरी तो एक पशु. त्या गायीला देवता मानल्यानें सामान्य लोक तिची जोपासना अुत्कटपणें करतील म्हणून तिला देवता मानावी, गोपूजन हा धर्म मानावा, ही समजूत अशी खुळचट ठरते, समाजाच्या बुद्धिहत्येस कारणीभूत होते.

कारण अुपयुक्ततेच्या दृष्टीनेंदेखील गायीचें अितकें स्तोम माजविणें चुकीचें आहे. घोडा आणि कुत्रें हे दोन पशु तरी गायीहून आधीं, निदान गायीबरोबरच मनुष्याचे अत्यंत प्राचीन काळापासून अत्यंत अेकनिष्ठ सेवक झालेले आढळतात. कृषियुगाच्या नी गोपालन युगाच्या आधींच्या मृगयायुगांत मनुष्य भटकत होता तेव्हांदेखील गायीपेक्षां कुत्रें नी घोडा हेच त्याच्या जिवास जीव देणारे सवंगडी असत. मृगयेंत सावज पकडतांना आपल्या धन्याच्या जिवासाठीं हिंस्र पशूंवरहि चाल करून जाणारा, घरादाराचें चोरांचिलटांपासून रात्रंदिवस रक्षण करणारा, धनी निजला तरी आपण जागें राहून मध्यरात्रींहि आलोचन पहारा देत राहाणारा, ज्या गायीस आम्ही देवता म्हणून गौरवतों तिच्या खिल्लारांसहि अनेक प्रसंगीं ज्याच्या तिखटपणामुळेंच निर्भयपणें रानावनांत चरतां येतें, आजवर जो प्राणी पोलिसांचीं सुबुद्ध कर्तव्येंहि युरोपसारख्या देशांत करूं लागून मनुष्यसमाजाची जवळ जवळ माणसासारखी सेवा करीत आहे, त्या कुत्र्याचा अुपयोग मनुष्यजातीस काय थोडाथोडका झालेला आहे? गायीनें दूध दिलें तर कुत्र्यानें अनेक प्रसंगीं मनुष्यास जीवदान दिलेलें आहे. मुलांचा मित्र, मृगयेची बंदूक, घराचें कुलूप, पडतों दाराशीं, खातों भाकरीचे तुकडे, करून घेतों सार्‍याची हड हड, नुसतें

यू म्हटलें कीं चटकन् त्यानें पाय चाटूं लागावें अितका विनम्र, संकटांत जिवास जीव देण्याअितका कृतज्ञ, शिवाय शेतकऱ्यांपासून शाहू सम्राटापर्यंत ज्याचा त्याचा अेकनिष्ठ चाकर ! त्या कुत्र्यास सन्मान कोणता, वेतन काय ? तर त्याचें नांव ही अेक शिवी; जात अस्पृश्य. अुपयुक्ततेंत घोड्याची योग्यताहि तशीच निस्सीम. अुभ्या राष्ट्राचें जीवन वा मरण अनेक समयीं त्याच्या घोडदळाच्या शक्तीवर नी सज्जतेवर अवलंबून होतें. मराठ्यांपाशीं भीमथडीचीं तट्टें होतीं म्हणून हिंदुपदपादशाहीस केवढें सहाय्य झालें, हिंदुधर्माच्या रक्षणाचें तें केवढें अमोघ साधन ठरलें ! गायीच्या खिल्लारांच्या बळें अटकेपर्यंत हिंदु धर्माच्या शत्रूंस मराठ्यांनीं 'दे माय धरणी ठाय' केलें नाहीं तर घोडदळाच्या बळेंच होय. गाय तर अुपयुक्त आहेच आहे, पण प्रसंगीं गायीच्या दुधाचा तुटवडा तितकासा भासण्याचें कारण नाहीं; म्हैस ती अुणीव पुष्कळ प्रमाणांत भरून काढते. पण रणांगणासारख्या प्राणसंकटांतहि राष्ट्राचें रक्षण करणारा, प्रतापसिंहासारख्या राष्ट्रवीराचे प्राण हळदीघाटाच्या संग्रामांतून वांचविणारा, झांशीच्या राणीस अिंग्रजासारख्या अहिंदूंच्या कडोनिकड पाठलागांतील बंदुकांच्या सारख्या भडकणाऱ्या आगींतून काल्पीपर्यंत अेका दमांत पोंचवून स्वातंत्र्यसमराच्या देवतेचें प्राण वांचविण्याचें महत्कार्य सरतांच आपण त्या श्रमें गतप्राण होअून पडणारा तो घोडा, त्याची अुणीव, दुसरा कोणचा पशु भरून काढील ? घोडाच काय, कांहीं देशांत गाढवहि मनुष्याला आपल्या अिकडे गाय आहे तितकेंच अुपयुक्त ठरलेलें आहे. ज्यू लोकांत गाढवाला मनुष्याचा अितका अेकनिष्ठ सेवक समजत कीं, त्याचें नांव अुपयुक्ततेचें अुपमान होअून बसावें. येशू ख्रिस्त जेव्हां अीशप्रेषिताच्या अधिकारानें जेरूसलेममध्यें आपला पहिला विजयप्रवेश करते झाले, तेव्हां त्यांनीं तशा धर्म नी दैवी कार्यास साजेलसें वाहन म्हणून गाढवाची योजना केली. 'अशा विजययात्रेस पवित्र वाहन गाढव ! तर जा नी अेक पांढरें स्वच्छ गाढव घेअून या !' म्हणून त्यानें शिष्यास अज्ञापिलें आणि त्या शुभ्र

गर्दभावर बसून तो देवदूत ख्रिस्त जेरुसलेममध्यें आपला विजयप्रवेश करता झाला ! अनेक देशांत गाढव हें प्रत्यहींचें आबालवृद्धांच्या स्वारीचें वहान आजहि आहे. सिंध देशांत आपले हिंदूहि बसावयास गाढव अितकें निःसंकोचपणें वापरतात कीं, ब्राम्हणांच्या मुली सासरीं-माहेरीं जातां येतां गाढवावर बसून तशाच हौशीनें डूलतांना आढ-ळतात कीं, जशा बैलगाडीछकड्यांतून जातांना आमच्या अिकडे. कित्येक जातींची सारी उपजीविका चालते गाढवांवर; त्यांचें मुख्य धन गोधन नसून गाढवें; घरांतल्या अेकाद्या माणसारखें तें विचारें घरधन्यासाठीं राबतें, ओझीं वहातें आणि असतें किती स्वस्त ! त्याचा पगार म्हणजे गांवचा अुरकिडा फुंकून जें काय पोट भरतां येअील तें. **गायीच्या दुधानेंहि बरें होत नाहींत, पवित्र पंचगव्यानेंहि क्षालन होत नाहींत अशा कांहीं रोगांच्या वेळीं ब्राह्मणांच्या मुलांसहि गाढवीचें दूध उपयोगी पडतें.** पण गाढव अितकें अुपयुक्त नी अितकें प्रामाणिक, अितकें सोसाळू असतें, म्हणून त्यास पशु न मानतां आजवर कोणीं त्याची देवता बनविली;

**किंवा एखादी गाढव-गीता रचून गाढवपूजनाचा संप्रदाय**

काढला आहे काय ? कुंभारदेखील गाढव पाळणें अितकेंच आपलें कर्तव्य समजतों, गाढवपूजन नव्हे ! घोडा हा अत्यंत अुपयुक्त राष्ट्रीय पशु म्हणून त्याचाहि अेक घोडदेव कल्पून त्याच्याविषयींची कृतज्ञता व्यक्तविण्यास्तव वर्षाकाठीं चातुर्मास्यभर तरी मनुष्यानें घोड्यावर स्वारी न करतां घोड्यासच मनुष्यावर समारंभपूर्वक स्वारी करूं द्यावी असें एखादें व्रत कोणीं प्रचलविलें आहे ? कुत्रा अति अुपयुक्त-प्रत्यक्ष दत्तात्रेयाचा आवडता; म्हणून कुत्र्यासच देवता कल्पिली, श्वानहत्त्या हें 'पाप' ठरविलें आणि अुद्यां अेखाद्या म्लेंच्छ शत्रूच्या रणतरी ( Battle-ships ) भारतावर चढाअी करून आल्या असतां त्यावर असणारीं कुत्रीं मरतील, श्वानहत्त्या घडेल, या

पापभीरु शंकेनें हिंदु सैनिकांनीं त्या शत्रूच्या रणतरींवर गोळामार करण्याचें नाकारलें आणि त्यांस हिंदुस्थानांत सुरक्षितपणें अुतरूं देअून लाखों हिंदु स्त्रीपुरुषांची कत्तल अुडवून दिली तर तें कृत्य कृतज्ञतेचें स्तुत्य प्रदर्शन समजलें जाअील का बाष्कळपणाचा वेडेचार ?

मग गाय हा अुपयुक्त पशु आहे, यास्तवच त्याची देवता कल्पून आपण हे सारे वेडेचार •जे गायीच्या प्रकरणीं करतों तेहि निव्वळ बाष्कळपणाच, मूर्खपणाच म्हणावयास नको काय ? घोडा, कुत्रा, गा[illegible], ह्या उपयुक्त पशूंत, गायींत आहेत ते वांच्छनीय गुण नसले तर त्यांच्यांत जे मनुष्यांस अत्यंत आवश्यक गुण आहेत ते गायींत नाहींत. देवता कल्पून त्यांस पूजलें नाहीं म्हणून काय त्यांची जोपासना कमी होते ?

**ते उपयुक्त पशु आहेत, ह्यामुळेंच म्हैस, घोडा, कुत्रा, यांची योग्य ती जोपासना जशी होतेच आहे,**

तशीच गायीचीहि, तिला देवता न मानलें तरीहि, तिच्या अुपयुक्ततेच्या बळावरच होईल हें नक्की. अितकेंच नव्हे, तर तिला देवता केल्यापेक्षां अधिक उपयुक्त प्रकारें आणि पशूस आवडेल अशा पशूच्या प्रमाणांतच होअून गोपूजनामुळें होणाऱ्या राष्ट्राच्या बुद्धिहत्त्येचें पापहि टळेल. परंतु, गोपालन अितकें कर्तव्य नसून गोपूजन हा हिंदूंचा ' धर्म ' आहे, तें अैहिकच नसून पारलौकिक ' पुण्य ' आहे, तें अशा भाबड्या भावनेपायीं आम्हीं गायीस देखोल नकोसें व्हावें असें तिचें कोण स्तोम माजवून ठेविलें आहे पहा !

## गोग्रास

बोलूनचालून गाय बिचारी पशु; तिला हिरवेंचार गवत खाण्यांतच खरा आनंद. आणि मनुष्याच्या पक्वान्नांपैकीं तिला जर कोणतें पक्वान्न त्यांतल्या त्यांत आवडत असेल तर अेका भक्कम

घमेल्यांत पंगतींतलें सारें अुष्टेंखरकटें अेकत्र करून घातलेलें मसाले-दार ओखटवाणी ! तो तिचा आवडता गोग्रास. पण तिला देवता करण्याच्या खुळापायीं तिला नको तेंच तिच्या दैवीं आम्ही बळें बळें बांधणार. शुचिर्भूत ब्राह्मणाच्यापुढें ठेवावें तसेंच अेक केळीचें पान कापून त्यावर वडया कोशिंबिरी अेका बाजूस, भाज्या दुसऱ्या बाजूस, लिंबू-मीठ-खीर, भाताची मूद, वरण, लाडू सुव्यवस्थितपणें वाढून, घरचीं मुलेंमाणसें जेवण्याच्या आधीं तें पान गोमातेच्या पुढें ठेवायचें ! अितकें बरें झालें कीं, नुसतें देवांपुढच्यासारखें वाढलेलें पानच तेवढें तिच्यापुढें ठेवायचें म्हणून पोथी सांगते. कोण्या गोभक्तानें दहापांच संस्कृत अनुष्टुपें तींत घुसडून जर का असें सांगि-तलें असतें कीं, गायीस नैवेद्याच्या वेळीं गोठ्यांत न बांधतां देवघरांत बांधावें, अेक चंदनी पाट मांडून तीवर तीस दहापांच माणसांनीं धरून साडीचोळी चढवून मागच्या पायाची मांडी घालवून बसवावें नी पुढच्या पायांनीं तिला जेवतां नच आलें तर आपल्या हातांनीं रीतसर भरवावें, तर पोथींत आहे म्हणून आम्ही तोहि बाष्कळपणा करावयास सोडतों ना ! गंगेस महापुरांत साड्याचोळ्या आम्ही वहातोंच कीं नाहीं ! पण पोथींत तेवढें गळल्यामुळें देवब्राह्मणांसारखें तें वाढलेलें केळीचें पान आम्ही गोमातेस पण गोठ्यांतच नेअून नैवेद्य अर्पितों ! पण म्हणून तिला कांहीं त्याची जाणीव ? छट्, तिच्या पशुधर्माचा तो अेक अपमानच वाटून कीं काय न जाणो– ती गाय प्रथम खीर, मग हळूच तूप ओतून वरणभात कालवून पान हालूं न देतां देवतेसारखी अनुक्रमें जेवायच्या ठायीं जिकडून लग्गा लागेल तिकडून जी जिभेचा लफ्फा मारते ती मीठ, खीर, भेंड्याची भाजी, वडा, कोशिंबीर, लाडू, वरण सारें लपालप सांपडेल तसें मचमचीत त्या साऱ्या सोज्वळ पदार्थांचें तिला हवें तें ओखटवाणी करून सोडते–केव्हां केव्हां तर भाताची मूद फोडून कालविण्याच्या आधींच तें हिरवेंगार केळीचें पान पाहूनच तिच्या तोंडास अधिक लाळ

सुटल्यामुळें पानच जिभेनें अुलटून ओरबाडून खाअू लागते– पक्वान्न, आमटी, तूप सारें भुअीवर तिच्यापुढच्या शेणसड्यांत सांडतें !

यापेक्षां सुग्रास मनुष्ययोग्य अन्न मनुष्यास तेवढें देअून पशूस प्रिय नी पशुयोग्य तें पंगतींतील अुष्टेंखरकटें, शिळेंपाकें तेवढेंच ओखटवाणी घमेल्यांत गायीपुढें ठेअून तिला जिभेचे लपके यथेच्छ मारूं देण्यांत तिलाहि बरें, नी व्यर्थ जाणारें अुष्टें कारणीं लागल्यानें मनुष्यासहि बरें होअील, नव्हे काय ? पशूअितकीच नी पशूसारखीच जोपासना केल्यानें गोपालन अधिक चांगलें कसें होतें त्याचें हें अेक अुदाहरण पुरे आहे.

पण दुसरें हवेंच असेल तर गायींची स्थिति नी प्रगति अमेरिकेंत किती अुत्कृष्ट रीतीनें होते ती पहा. हिंदुस्थानाअितकीच अमेरिकेंतील कांहीं कृषिप्रधान भागांत गोवनाची आवश्यकता आहे. पण मनुष्यास अुपयुक्त असा अेक पशु अितक्याच दृष्टीनें ते तिकडे पहात असल्यामुळें, गोपालन अितकेंच कर्तव्य मानलें जात असल्यानें, गोपूजनाचा भाबडेपणा हा माणुसकीस हीनता आणणारा आहे ही जाणीव त्यांस असल्यामुळें तो पशु ज्यायोगें मनुष्यास अधिकाधिक अुपयुक्त करतां येअील त्या त्याच अुपायांनीं नी प्रमाणांत तिची जोपासना करण्यांत येते. तिच्या दुधांत जे विशेष गुण ते कसे वाढतात याचे वैज्ञानिक प्रयोग करून, तिची वीण, वाढ, दुधाळपणा ज्या चारावैरणीनें वाढते त्याचें सप्रयोग कोष्टक करून ती ती चारावैरण तिला देण्यांत येते. तिचे गोठे पशूंच्या आरोग्यास अवश्य त्या प्रकाश, स्वच्छता, कीटघ्न औषधप्रभृति साधनांनीं त्या पशूस हितकारक असे बांधण्यांत येतात. तिच्या जाति कोणत्या, अुत्कट पैदाशीसाठीं निवडक वळू कोणते, ऋतु कोणते, ते वैज्ञानिक प्रयोगांनीं ठरवून गायींची निपज प्रत्येक पिढीस अधिक सुरेख, दुधाळु, धष्टपुष्ट अशी करविली जात आहे. भागवतांतील गोकुळांमधल्या गोधनाचें जें

काव्य ती आज अमेरिकेंतील वस्तुस्थिति आहे ! तीं त्यांचीं हिरवीं-चार विस्तृत चराऊ रानें, तीं एकाहून अेक सुंदर, अुंच, सुश्लिष्ट, एकहि गोचीड अंगावर नसलेल्या, विशाल नेत्राच्या, हंड्याअेवढ्या कासेच्या, दुधाळ, सवत्स नी निरोगी गायींचीं शेंकडों खिल्लारें, अुत्तम गायींत्री प्रदर्शनांतून लागलेली चढाओढ आणि त्या मदोत्कट डरकाळया फोडीत चाललेल्या, बळकट वृषभांच्या झुंजी, ते दही-दूध-लोण्याचे विशुद्ध नी स्वस्थ क्षीरसागरोपम हौदचे हौद ! खरो-खर आजवर कुठें भागवतांतील गोकुळ पृथ्वीवर नांदत असेल तर ते गोमांसभक्षक असतांहि गायीस अेक अुपयुक्त पशु मानूनच काय ती तिची जोपासना करणाऱ्या गोपालक अमेरिकेंत होय आणि गायीस देवता म्हणून पोसणाऱ्या, तिचें शेणमूत्रहि पिण्यांत पुण्य मानणाऱ्या भारतांत कोणत्या गोसंस्था नांदत आहेत ? मुख्यतः पांजरपोळ आणि कसाअीखाने !

तेव्हां आमची साऱ्या गोरक्षक संस्थांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं गोपालक बनावें, वैज्ञानिक साधनांनीं मनुष्यास त्या पशूचा अधिकाधिक अुपयोग कसा करतां येअील ह्याच काय त्या दृष्टीनें तिची अमेरिकेसारखी सकस नी सुरेख वीण वाढवून, दूध वाढवून, आरोग्य वाढवून जोपासना करावी, गोरक्षण करावें, राष्ट्राचें गोधन वाढवावें. परंतु त्या नादांत भाबडेपणाची भेसळ होअू देअून पशूलाच देव करून पूजण्याचा मूर्खपणा करूं नये. गायीचें कौतुक करायचें तर तिच्या गळयांत घंटा बांधा—पण कुत्र्याच्या गळयांत आपण पट्टा घालतों त्या भावनेनें. देवाच्या गळयांत आपण हार घालतों त्या भावनेनें नव्हे ! हा प्रश्न अेका फुटकळ धर्मसमजुतीचा नाहीं. अशा धार्मिक छापाच्या ज्या शेंकडों खळया समजुती आपल्या लोकांची बुद्धिहत्या करता आहेत त्या भाकड प्रवृत्तींचा आहे. तिचें अेक अुप-लक्षण म्हणून आम्हीं गायीची गोष्ट तेवढी निवडली !

आमच्या 'गायी' वरील लेखाचा ज्या आमच्या गोभक्त बांधवांस राग आला असेल त्यांनीं असा शांतपणें विचार करावा कीं, आम्हां हिंदूंच्या संस्कृतीचा अुपहास जर कोणचा कागद करीत असेल तर तो आमच्या लेखाचा नसून गायींत तेहत्तीस कोटि देवता कशा नांदतात हें दाखविणारा तो सर्वत्र आढळणाऱ्या चित्राचा कागद होय !

पंढरपूरच्या यात्रेच्या रामरगड्यांच्या दिवसांत तिसऱ्या वर्गांतील आगगाडीच्या डब्यांत वारकरी जसा घर कीं कोंब चालू होतें, तसें ह्या गायीच्या शरिरांत देवांची रगडारगडी, कोंडमार झालेली आहे ! विष्णु, ब्रह्मा, चंद्र, सूर्य, यम, कोणी कंठांत कोणी दांतांवर, कोणी नाकांत ज्याला जिथें साधेल तिथें तो लगटला. पृष्ठवशांत तर अितकी दाटी कीं, कुणी सनातनीहि रागानें जेव्हां अुनाड गायीच्या पाठींत दोहतांना तिनें लाथ झाडतांच हटकून अेक काठी घालतो तेव्हां दहापांच देव तरी लंबे झाल्यावांचून राहूंच नयेत ! नाकांतोंडांतील आस्वाद्य रसांत लडबडलेल्या देवांची तर करुणाजवळ स्थिति आहेच; पणत्यांतल्या त्यांत शत्रूंवरहि येअूं नये असा प्रसंग जर कोणावर आला असेल तर त्या बिचाऱ्या मरुत् नी वरुणावर ! जागा मिळण्याच्या रेटारेटींत सेवटीं ' अपाने तु मरुद्देव योनौ च वरुणः स्थितः ॥ ' —आणि मूत्रे गंगा ! ! हें काय चित्र कीं विचित्र ! ! ! **आपल्या हिंदु संस्कृतीचें विडंबन आजच्या विज्ञानयुगांत जर कोणीं करीत असेल तर तें आमचा लेख नसून** देवांनाच पशूहून पशु करून सोडणारीं हीं असलीं भाकड संस्कृत अनुष्टुपें होत; आणि आमच्या आचारांचें विडंबन तें पंचगव्य ! !

गायीस अेक वेळ गोमाता म्हणा, लाक्षणिक अर्थी तें क्षणभर चालेल; पण तें अक्षरशः खरें मानणें नव्हे. त्याहीपुढें जाअून

आओीचे देखील जे पदार्थ असेव्य मानायचे तेदेखील गायीचे सेव्य मानून, पावन मानून, तिचें शेण नी गोमूत्र समारंभपूर्वक प्यायचें हा का आचार कीं अत्याचार! काय म्हणें गोमूत्रानें हे अमके तमके रोग बरे होतात आणि शेण हें अुत्तम खत आहे! अितकेंच असेल तर त्या रोगांनीं पछाडलेल्या रोग्यांस तें गोमूत्र पिअू द्या. घोड्याचें मूत्र, गाढवीचें दूध, कोंबडीची विष्ठा हींहि अुपयुक्त औषधें आहेत. मनुष्यमूत्रांतहि कांहीं गुण आहेत. त्या त्या रोगावर तीं घेतात तसें गोमूत्र घ्या पण कोंबडीची विष्ठा सर्पदंशावर अुतार मानतात म्हणून श्राद्धाच्या दिवशींहि चटणीसारखी थोडी थोडी सेवावी कीं काय! शेण खत आहे तर शेतांत घाला. पोटांत कशाला? शेण खत आहे तर विष्ठाहि खत आहे. मेलेले अुंदीर गुलाबास अुत्तम खत. पण म्हणून मेलेले अुंदीरच गुलाबासारखे नाकाशीं धरून हुंगायचे कीं काय? तेव्हां गायीचें शेण नी गोमूत्र ह्यांत अमुक गूण आहेत अशी कितीहि लांब टाचणें गोभक्तांनीं प्रसिद्धिलीं तरी त्यायोगें त्या रोगापुरतें वा उपयोगापुरते ते उपसविणें समर्थनीय ठरेल. पण गोमूत्र पिणें नी शेण खाणें हें पुण्य कसें ठरेल, आत्मशुद्धीचा संस्कार म्हणून, पवित्र म्हणून, जें पंचगव्य प्यायलें जातें त्याचें समर्थन कसें होअील! खरी गोष्ट मुळांतच ही आहे कीं, ज्या भाबड्या प्रवृत्तीमुळें गायीसारख्या अेका घादांत पसूची अेक देवता बनविली त्याच धर्मभोळ्या भाबडेपणानें तिचे गोखूर दाराशीं काढणें शुभ मानणें, तिची शेंपटी डोळ्यांवरून फिरविणें कल्याणकारक मानणें, तिला पूजणें, धर्म मानणें आणि शेवटीं वेडेचारांचा कळस होअून तिचें शेण नी गोमूत्रहि पवित्र ठरविणें, तें खाल्यानें नी प्याल्यानें आत्मशुद्धि होते, पापक्षालन होतें, अिहपरलोकीं पुण्य लागतें; इतका भाबडेपणा अतिरेकास गेला!

आपल्या थोर हिंदु संस्कृतीचें विडंबन जर कोणी करीत असेल तर ह्या आपल्या असल्या पुण्य म्हणून सेण खाणाऱ्या नी गोमूत्र

पिणाऱ्या भाबड्या चाली होत. ह्या पोथीनिष्ठ मूर्खपणाचा निषेध आमच्या सनातनी बंधूंनीं तें विडंबन नको असल्यास करावा; तो मूर्खपणा आहे असें आपल्या लोकांस समजून सांगणाऱ्या आमच्या लेखाचा नव्हे !

जातां जातां पंचगव्याची अेक अुपपत्ति सांगावीशी वाटते. ती कुठेंहि आढळत नाहीं. आम्हीहि सिद्धांत म्हणून नव्हे तर सूचना म्हणूनच सांगतों. आम्हांस असें वाटतें कीं, गायीचें शेण खाणें नी मूत्र पिणें ही पूर्वीं केव्हांतरी अेक अुपमर्दकारक निंदा-व्यंजक शिक्षा दिली जात असावी. पाप्याची मिशी काढणें, गाढवावर बसविणें अित्यादि धिंडवड्यांप्रमाणें त्याला दंड म्हणून गायीचें शेणमूत खाणें भाग पाडलें जात असावें. प्रायश्चित्तांतून गोमयगोमूत्राचें ठळकपण हेंच दाखवितें. पुढें त्या शिक्षेचाच संस्कार म्हणजेच धर्मीकरण झालें आणि ज्यायोगें पापनिवृत्ति होते तें पुण्यकारक ह्या सहजभावानुक्रमें गायीचें शेण खाणें नी गोमूत्र पिणें हें स्वयमेवच पुण्यकारक होय, अशा धर्मभोळ्या मताला अगदीं सहज असलेली समजूत होअून बसली. कारण हा पंचगव्याचा, किंवा नुसतें गोमय, गोमूत्र पवित्र म्हणून आचमिण्याचा प्रश्न सोडला तर अजूनहि व्यवहारांत ' शेण खाणें, मूत्र पिणें ' ही शिवी आहे. संस्कार नव्हे !

• • •

# ह्या बौद्धिक भावडेपणाच नव्हे काय ?

जसा धार्मिक भावडेपणा असतो तसाच अेक बौद्धिक भावडेपणा असतो. धर्मभोळा वर्ग जर अेखादी गोष्ट धर्म म्हणून करूं लागला नी त्याला विचारलें कीं, अहो, ह्या गोष्टीचा काय लाभ ? हें कां करतां असें ? तर तो बिचारा सरळपणें सांगतो, 'पोथींत असें आहे, हें देवाला आवडतें, हा आमचा धर्म आहे' अितकेंच काय तें ! कोणचें तरी कारण सांगून माझी तशी श्रद्धा म्हणून मी करतों अेवढेंच काय तें म्हणतो. त्याचें तें म्हणणें आपल्याला पटलें नाहीं तरी समजतें. पण कांहीं लोकांना नुसतें पोथींत आहे म्हणून आपण अेखादी गोष्ट करतों, ती तर्काला टिकते कीं नाहीं, उपयुक्त आहे कीं नाहीं, हें आम्हीं पाहिलेलें नाहीं, असें मान्य करून स्वतःला धर्मभोळे म्हणवून घेण्याची तर लाज वाटते, पण ती धर्मभोळी गोष्ट, आचार वा समजूत तर संवयीमुळें सोडवत नाहीं. पोथींत सांगितलें म्हणून काय तें तें खरें असें म्हणून न थांबतां, तो आचार वा समजूत आजच्या

बद्धिवादाच्या कसोटीसहि पूर्णपणें उतरते आणि विज्ञानाच्या प्रत्यक्ष-सिद्ध प्रयोगांत ती तशी कसास उतरते म्हणूनच आम्ही त्या समजुतीस अुचलून धरून तसें आचरतों; आम्ही भोळे नसून बुद्धिनिष्ठच आहोंत, असें सिद्ध करण्याचा त्यांचा यत्न चालतो, त्यांना धर्मभोळेपणा तर सोडवत नाहीं आणि बुद्धिवादी पण म्हणून घ्यावेंसें वाटतें. त्यामुळें निर्भेळ धर्मभोळेपणापेक्षांहि त्यांचा हा बौद्धिक भाबडेपणा केंविलवाणा वाटूं लागतो. ज्या आचाराचें ते समर्थन करूं जातात तो अधिकच हिणकस ठरूं लागतो. आजच्या सुधारकांतहि अशा अर्धवट वृत्तीचे किती तरी लोक आढळून येतात ! त्यांतहि कांहींजण केवळ दुटप्पी-पणामुळेंच किंवा मिथ्याचारीपणामुळेंच असे वितंडवाद करतात असें नाहीं. त्यांच्यांतील कांहींची अेक निरपेक्ष नी निस्वार्थी अशी पूर्वजा-भिमानाची सद्‌भावनाहि त्यांस आपल्या धर्मभोळ्या नी आज टाकाअू ठरणाऱ्या आचारास असें येनकेनप्रकारेण समर्थिण्यास प्रवृत्त करते. त्यांस असें भय वाटतें कीं, जर आपले पोथीगत आचार आजच्या विज्ञानाच्या वा तर्काच्या कसोटीस अुतरत नाहींत असें सिद्ध होअू दिलें, तर आपले ऋषि त्रिकालदर्शी, आमचीं शास्त्रें त्रिकालाबाधित नी आमचा धर्म सनातन नाहीं असें मानावें लागेल, पूर्वज मूर्ख होते असें ठरेल ! या चुकीच्या समजुतीमुळें ते जों जों त्या धर्मभोळे-पणाचें समर्थन बुद्धिवादानें नी विज्ञानानें करूं जातात, तों तों तो आचार वा रूढि अधिकच धर्मभोळी ठरूं लागते, नी पूर्वजांच्या पदरीं नसता मूर्खपणा अधिकाधिकच पडूं लागतो.

मागच्या परिस्थितींत अेखादी रूढी अुपयुक्त असली किंवा त्या काळच्या भौतिक ज्ञानाच्या मानानें अेखादा सिद्धान्त बरोबर वाटला; पण जर ती रूढी आज समाजास हानिकारक ठरत असेल वा तो सिद्धान्त वाढत्या भौतिक नी प्रयोगसिद्ध ज्ञानानें खोटा पडत असेल तर ती रूढी बदलण्यांत वा तो सिद्धान्त असिद्ध मानण्यांत पूर्वजांचा कांहींहि अपमान होत नसून अुलट त्यांत आमचा नी त्यांचा

गौरवच आहे. कारण त्यांनीं मानवी ज्ञानाची सीमा त्या काळीं तितकी वाढविली, त्या भांडवलाचा योग्य अुपयोग करून, त्यांच्याच भांडवलाच्या बळावर आम्ही आपली मानवी ज्ञानाची संपत्ति अधिकाधिक वाढवीत चाललों अहों, असेंच त्यायोगें सिद्ध होतें. वडिलांचें राज्य वंशजांनीं वाढविलें, 'बापसे बेटे सवाअी' निघावे हेंच पूर्वजांना नी वंशजांना भूषण. पण कांहीं लोकांना वडिलांहून आम्ही अधिक मूर्ख होत अहोत, बापाची मिळकत आम्ही बुडवीत अहों, असें सिद्ध करण्यांतच स्वतःची धन्यता, वडिलांचा गौरव नी त्यांच्या पोटीं आपण जन्म घेतल्याचें सार्थक वाटतें.

स्वतःस धर्मभोळे म्हणून घेण्यांत कमीपणा मानणाऱ्या आणि बुद्धिवादास टिकेल तेंच स्वीकारूं असें म्हणणाऱ्या प्रामाणिक सुधारकांतहि हा बुद्धिभोळेपणा कसा त्यांना नकळत दबून बसलेला असतो तें स्पष्ट व्हावें यासाठीं आणि **आपली प्रत्येक रूढि आणि आचार आजच्या परिस्थितींत आपल्या हिंदु राष्ट्राच्या उद्धारणास अपयुक्त आहे कीं नाहीं, तो बुद्धिवादास टिकतो कीं नाहीं, तें कोणत्या कसोटीवर कसें पारखावें, याची पद्धत ध्यानीं यावी म्हणूनहि** "पंचगव्य" या विषयावर आमचा अेका सुधारक मित्राशीं झालेला संवाद खालीं देत अहों. संवाद शक्य तों स्मरणपूर्वक घडला तसाच दिलेला आहे.

आमचे हे मित्र हिंदुसंघटणाचे पूर्ण अभिमानी, अस्पृश्यताच नव्हे, तर जातिभेदहि न मानणारे आणि प्रकट सहभोजक आहेत. प्रामाणिक चिकित्साप्रवण, बहुश्रुत नी आर्यवैद्यकाचे अभ्यासू असलेल्या ह्या आमच्या वैद्यशास्त्रीय मित्रांनीं गेल्या गणेशोत्सवीं आमची भेट घेअून पंचगव्याचा आचार टाकाअू नी भाबडा होय ह्या आमच्या मताविषयीं त्यांचा निषेध व्यक्तविण्यासाठीं नी तो आचार आजच्या विज्ञानाच्या कसोटीसहि कसा पूर्णपणें अुतरतो तें

बुद्धिवादानेंच आम्हांस पटवून देण्यासाठीं आमच्याशीं बुद्धया चर्चा केली. तिचा वेंचक भाग असा–

**वैद्यमहाशय**– आमच्या त्रिकालदर्शी पूर्वजांनीं आपल्या ज्या अनेक आचारांना धर्म म्हणून पाळावयास सांगितलें आहे, तें त्या आचारांनीं लोकांचें भौतिक कल्याणहि व्हावें अशाच हेतूनें सांगितलें आहे. पंचगव्य पिणें हाहि आचार असाच ऐहिक दृष्टयादेखील हितकर आहे. अशा आचाराविषयीं धर्मभावना नाहींशी करणें हेंच अुपयुक्ततावादाच्या दृष्टीनेंहि घातुक ठरतें.

वैद्यबुवांस यावर आम्ही विचारलें, "प्रथम हें सांगा कीं, तुम्ही आम्हांशीं पोथीवाद घालणार आहांत कीं बुद्धिवाद? म्हणजे अमुक वचन शास्त्रांत आहे म्हणून तें सत्य असें म्हणणार कीं, मानवी तर्काला नी अुपयुक्ततेला तें धरून आहे म्हणून ग्राह्य असें म्हणणार? तें ठरलें म्हणजे तसें आम्हांस बोलतां येअील."

**वैद्यमहाशय**– मी बुद्धिवादानेंच हें सिद्ध करणार कीं, शास्त्रवचनें निदान या पंचगव्यप्रकरणीं तरी अगदीं ग्राह्य आहेत. धर्म म्हणून तो आचार–जो आमच्या त्रिकालदर्शी पूर्वजांनीं सांगितला, तोच तर्काला नी अुपयुक्ततावादालाहि धरून आहे.

**आम्ही**– ठीक. जें मनुष्यहितास ऐहिकदृष्टया अुपयुक्त आहे तें कसें अुपयुक्त आहे हें न सांगतां नुसतें तें कृत्य पुण्य, अुलट कृत्य पाप, त्या कृत्यानें देव पावतो, अुलटपक्षीं रागावतो, अितकेंच काय तें सांगण्याची, धर्माच्या पारलौकिक अवडंबरांत तो आचार गुरफटून टाकण्याची पद्धत पूर्वीं कितीहि आवश्यक असली तरी ती आतां त्याज्य नी अहितकारकच ठरविणें भाग आहे. कारण अमुक एक गोष्ट अुपयुक्त म्हणून न सांगतां तो त्रिकालाबाधित सनातन धर्म आहे अेवढेंच सांगत राहिल्यानें, तो आचार वा ती वस्तु स्वरूपतःच

स्वयमेवंच धर्म्य आहे असा लोकांचा बुद्धिभ्रम होतो आणि त्यामुळें ज्या परिस्थितींत त्या वस्तूपासून वा आचारापासून मनुष्याचें अहित होतें, त्याहि परिस्थितींत ती वस्तु वा आचार धर्म्य मानला जाऊन लोक अनुसरूं लागतात. गायीचेंच पहा. ती अुपयुक्त पशु म्हणून पालनीय ठरली; त्यायोगें हळुहळु तिला देवता, परलोकीं स्वर्गति देणारी देवी असें समजूं लागतांच ती गाय वस्तुतःच पूज्य, पवित्र, मनुष्याहूनहि श्रेष्ठ वाटूं लागली. त्यामुळें ज्या परिस्थितींत गाय ही राष्ट्रास अैहिक दृष्टचा अनुपयुक्त ठरते वा गोवध हेंच मनुष्यहित-साधक कृत्य ठरतें त्याहि परिस्थितींत गाय ही वस्तुतःच पूज्य देवता, माता अशी धर्मभावना दृढ झाल्यानें तिला मारण्याचें 'पातक' कर-ण्यापेक्षां राष्ट्राच्या लढाया हरून राष्ट्रदेखील लोक मरूं देतात! शत्रूच्या गायी, केवळ अुपयुक्ततेच्या दृष्टीनें आपल्या शत्रूच, हें तत्काळ पटतें; शत्रूच्या दाणावैरणीप्रमाणें त्यांच्या गायींचाहि नाश करणें अवश्यमेव सत्कृत्य ठरतें; पण गाय ही वस्तुतःच पूज्य देवता मानली जाऊं लागली म्हणून वस्तुतःच अवध्य ठरली म्हणून, शत्रूच्या गायीदेखील मारावयास हिंदु सैनिक सहसा सिद्ध होत नाहींत. कित्येक परदेशीय वेढयांत शत्रूच्या गायीचें मांस खाण्यास नाकारून हिंदी शिपाई अुपाशी मरत, पण तें गोमांस खाअीनात. कारण गोमांस हें धर्मतः निषिद्ध ही त्यांची भावना केली गेली होती. पण जर केवळ गाय ही अुपयुक्त म्हणूनच रक्षणीय असें स्पष्ट ज्ञान त्यांना जर दिलेलें असते तर ते हिंदु लोक युरोपियनांप्रमाणेंच परशत्रूच्या गायी चापून कापून काढून त्यांवर जगते. अन्नहि परब्रम्हच. पण शत्रूची दाणावैरण आपण जशी अवश्य तर जाळून पोळून टाकतों, तशीच शत्रूंच्या गायींचीहि वाट लागती. परंतु गाय ही वस्तुतःच धर्म्य ठरली, पवित्र ठरली; त्यामुळेंच तिचें दूधच नव्हे, गोमय, गोमूत्रहि पवित्र ठरलें! कारण तिच्या शरिरांतील दुधाच्या स्थानीं जसे देव स्थापिले गेले तसेंच गोमय-गोमूत्रांतहि त्यांची स्थापना पोथींत सांगितली,

व्यवहारांत शपथेवर प्रत्येकास शिकविली ! अगदीं गोसूक्तांत शास्त्रोक्त श्लोक सांगतो, 'मूत्रे गंगा !' गाअीच्या मूत्रांत गंगा निवसते ! मग काय आश्चर्य कीं, लाखों लोक गोमूत्रप्राशनानें पाप जातें, मनुष्य पवित्र होतो म्हणून ते पिअूं लागले !

**वैद्यमहाशय**– नाहीं ! गोमूत्र जे आम्ही पितों तें पाप जातें म्हणून पीत नाहीं. पंचगव्य पिण्याचा आचार वैद्यशास्त्राला अगदीं धरून आहे. ही आमची रूढि मुळींच भाबडेपणाची नाहीं. मी वैद्यशास्त्राच्या आधारें पंचगव्य पिणें कसें अवश्य तें सिद्ध करून देतों.

**आम्ही**– वैद्यकाचे आधार थोडे मागून बघूं. प्रथम आज गोमय-गोमूत्र हे पापक्षालनार्थंच लोक पंचगव्यांत घालून, फार काय, गोमूत्र तर नुसतें देखील पितात; त्यांत आपण अेखाद्या रोगावरचें हें औषध घेत आहोंत, ह्याचें भान देखील त्यांना नसतें ही गोष्ट खरी कीं खोटी ? जे हजारों ब्राह्मण श्रावणीच्या दिवशीं गोमूत्र-गोमय पितात, त्यांतील बहुतेक लोक तो अेक पापक्षालक धर्म्य संस्कार म्हणूनच करतात– हें नाकारणें निवळ खोटें बोलणें होअील. विटाळलेल्या कपड्यावर जेव्हां म्हातारीं माणसें गो-मूत्राचे उगीच चार शितोडे टाकतात, सहभोजनाचे प्रायश्चित्त म्हणून गोमूत्र पळीभर प्या नी मोकळे व्हा म्हणून जेव्हां भट म्हणतात, महारांनीं अेखाद्या महाडच्या तलावांत पाणी भरलें म्हणून तो 'शुद्ध' करण्यासाठीं जेव्हां सारें गांव त्या विहिरींत वा तलावांत गायीचें शेणमूत्र ओतून त्यांस अधिक घाणेरडे करीत असतांना समजतात कीं, तें पाणी पुन्हां 'शुद्ध' करुन घेतलें– अशा प्रत्यहीं हजारों प्रसंगीं गोमूत्र जें आम्हीं वापरतों, तें गोमय– गोमूत्रानें 'पाप' जातें, पवित्रता येते, ह्याच भावनेनें होय– रोग जावा ह्या भावनेनें नव्हे, हें कसें नाकारतां येअील ? प्रत्येक प्रायश्चित्तांतच पंचगव्य असतें प्रत्येक रसायनांत नव्हे; या अेकाच गोष्टीवरून

हें सिद्ध होतें. 'मूत्रे गंगा' असें गोमाहात्म्यांत शास्त्रवचन आहे, 'मूत्रे ओषधयः' असें नाहीं. फार काय, पंचगव्य पितांना जो श्लोक मंत्र म्हणून आपण म्हणतों तोच हें निर्विवाद सिद्ध करतो. तो मंत्र हाच ना कीं 'यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके। प्राशनं पंचगव्यस्य दहत्यग्निरिवेन्धनम् ॥" आतां बोला! यांत पंचगव्यानें हाडींमांसीं खिळलेलें 'पाप' जाळलें जातें असें सांगितलें आहे, रोग बरें होतात असें नव्हे, हा धार्मिक श्लोक आहे का वैद्यशास्त्रीय ?

**वैद्यमहाशय**–धर्मशास्त्रांत जरी तो श्लोक असला तरी वैद्य-शास्त्रास अगदीं धरून आहे. आमच्या धर्मशास्त्रांतील प्रत्येक श्लोकांत गूढ अर्थ भरलेला असतो.

**आम्ही**– ही नुसती धमकी नको ! कोणचा गूढ अर्थ तो ह्या श्लोकापुरता काढून वैद्यशास्त्रीय कसा तें सांगा

**वैद्यमहाशय**–ह्या श्लोकांत 'पाप' असा जो शद्ब आहे त्याचा अर्थ 'रोग' असा घ्यावा. म्हणजे 'हाडींमासीं खिळलेलें रोग बरे होतील' असा अर्थ होईल, हा श्लोक वैद्यशास्त्राच्या कसोटीस अुतरेल.

**आम्ही**–आतां गंमत पहा अं. हा श्लोक धर्मशास्त्रीय होता, तोंवर फार तर अुपेक्षणीय ठरता. पंचगव्यानें पाप जाते ही श्रद्धा होती, श्रद्धेला कशाला तर्काची करवत लावा, असें अेक वेळ म्हणतां येतें. पण जुन्या भोळ्याभाबड्या श्लोकांना तर्कशुद्ध ठरविण्याच्या हौसेनें तुम्ही त्यांच्यांत नसता गूढ अर्थ दडपून जेव्हां तर्काच्या कसो-टीला लावतां, तेव्हां धांवण्याच्या स्पर्धेस हांवभरी होअून भाग घेऊं लागणाऱ्या पंगूसारखे ते निव्वळ हास्यास्पद होतात !'पाप' याचा अर्थ 'रोग' असा घेणें हेंच विपरीत नाहीं काय ? रामकृष्ण परम-हंस रोगानें मेले ही खरी गोष्ट सांगतांना रामकृष्ण परमहंस पापानें

मेले म्हणून जर कोणी म्हणाला तर त्यास तुम्ही दीडशहाणाच म्हणणार नाहीं का? आमच्या औषधांनीं रोगी तात्काळ रोगमुक्त होतात, अशी पाटी न लावतां जर अेखाद्या वैद्यानें अशी पाटी लावली कीं, आमच्या औषधानें पापी पापमुक्त होतात!' तर तुम्ही त्याची हुर्यो अुडविणार नाहीं कां? डॉक्टरच्या घरीं जाअून जर आपण म्हणालांत, 'आमच्या घरीं अेक पापी आहे, त्यास आपण पापमुक्त कराल काय?' तर डॉक्तर तुम्हांस सांगणारच कीं, 'गृहस्था, तूं पत्ता चुकलास. शंकराचार्य अिथें रहात नाहींत!' अितका गैर-समज वाढविणारा शद्ब वैद्यकशास्त्रासारख्या कांटेकोर विज्ञानांत वापरणारा ह्या श्लोकाचा कर्ता किती गबाळ्या मनुष्य असला पाहिजे बरें! वैद्यकांत पांडुरोग, क्षयरोग, वैद्यानें रोग-चिकित्सा करावी, असे प्रयोगशद्ब आम्हीं शतावधि पाहिले आहेत; पण पांडु-पाप क्षयपाप, वैद्यानें पापचिकित्सा करावी, असे प्रयोग कांहीं पाहिलेले नाहींत!

**वैद्यमहाशय**–पण 'पाप' ह्या शद्बाचा 'रोग' असाहि अर्थ असलेला मीं तुम्हांला दाखवून दिला तर!

**आम्ही**–तरी काय? रोग हा सुनिश्चित शद्ब वैद्यकविज्ञानाच्या पारिभाषेंतलाच योजण्याचें सोडून अनेक घोंटाळे उत्पन्न करणारा 'पाप' हा शद्ब त्याअर्थी योजणाऱ्या ह्या ग्रंथकाराची चूकच ठरेल, नाहीं काय? रोग शद्ब काय त्या वृत्तांत बसला नसता? तें वैद्यकविज्ञानातलें मोजकें वचन लिहावयाचें होतें– 'प्रत्यक्षश्लेषमयप्रबंधा' चें अेखादें काव्य नव्हे!

**वैद्यमहाशय**–(हंसून) त्यांना काय माहीत कीं, तुमच्यासारखे अश्रद्ध लोक पुढें त्यांच्या शद्बाचे असे धिंडवडे काढतील म्हणून!

**आम्ही**–(हंसून) आतां पुन्हा श्रद्धेचें नांव कां मध्यें आणतां? श्रद्धेच्या दृष्टीनें तो श्लोक निरुपद्रवी, फार तर भोळसर

म्हणून आम्ही कधींच बाजूला सारला होता. तुम्हींच त्याला अगदीं काटेकोर पारिभाषिक वैद्यकशास्त्रीय कसोटीस लावूं निघालेत! दुसरें असें कीं, त्या पंचगव्यमहात्म्याच्या कर्त्यांस आमच्यासारखें 'पाप' शद्बाचा 'रोग' हा अर्थ न समजण्याअितकें अज्ञानी लोक पुढें निघणार आहेत हें काय माहीत असणार म्हणून जें म्हणालांत तें तर त्याहूनहि आश्चर्य होय! अहो, मघांपासून तुम्ही ह्या शास्त्रकार अशा ज्या आमच्या पूर्वजांना 'त्रिकालदर्शी' म्हणून ठांसून दहादां म्हणालांत, यांना पुढें सन विसाव्या शतकांत अश्रद्धलोक निघतील हें कळलें नाहीं, असें होओील तरी कसें? का त्यांच्या त्या त्रिकालदर्शी ज्ञान-पंचांगांत या शतकाचें पान तेवढें फाटलेलें होतें?

**वैद्यमहाशय**– बरें, आम्हीं तुमचा हा आक्षेप मान्य करतों कीं, पंचगव्य हें वैद्यकीय औषध म्हणून ग्राह्य असें न सांगतां आमच्या धर्मशास्त्रांत तें पापक्षालक म्हणून सांगितलें आणि त्यामुळें आज लक्षावधि लोक श्रावण्यांतून, प्रायश्चित्तांतून नी व्यवहारांतून जे पितात ते मूळचा वैद्यकीय हेतु साफ विसरून जाअून निव्वळ धार्मिक भावनेनेंच काय ते पितात. पण आम्ही म्हणतों कीं, त्यामुळें त्यांचा वैद्यकीय अुपयोग अधिकच व्हावा, औषध घ्या म्हणून सांगितलें म्हणजे लोक अितकें नियमानें तें पिणार नाहींत, पण धर्म म्हणून सांगितल्यानें पाप जाण्याच्या अमिषामुळें तें पंच-गव्य लाखों लोक अधिकच साक्षेपानें पितील, असाच शास्त्रकारांचा त्या पंचगव्याच्या धर्मीकरणांत सद्धेतु नव्हता का? आणि त्याचा परिणामहि अेकंदरींत चांगलाच झाला नाहीं काय?

**आम्ही**– चांगला परिणाम तर झाला नाहींच, पण अुलट अेकंदरींत पाहातां अगदीं वाओीट परिणाम झाला. त्या भाबड्या काळीं जो कांहीं अुपयोग अशा धर्मीकरणाचा असेल नसेल तर तो आतां अगदींच दुर्घट. कसें तें पहा. अमुक औषध अमुक

रोगांवर रामबाण आहे अितकीच यथार्थ प्रशंसा वैद्यकग्रंथांत शेंकडों औषधांची केली असतांहि आणि त्या औषधानें पाप जातें, पुण्य लागतें प्रभृति भाकड वशिले लावले नसतांहि ती औषधें हजारों रोगी वैद्यांना पैसे देअून देअून घेतातच ना? धडधडीत बाटलेला महार डॉक्टर असलेल्या औषधालयांत त्याच्या हातानें बाटल्या पितात, त्याला बुटासुद्धां घरांत आणतात! रोग रोख ठोक बरा करणारें औषध घेणें 'पाप' आहे म्हणून निषिद्ध केलें तरी रोगी घेतातच! तेव्हां गोमूत्र-गोमयानें अमुक रोग बरे होतात असें नुसतें सांगितलें असतें नी तसा रोखठोक अनुभव येता तर वैद्यकांतील ओंवा, शोपा धर्माचा वशिला नसतांना सुद्धां जशा घरोघर वापरल्या जातात, तसें तें पंचगव्यहि त्या त्या रोगांवर वापरलें जातेंच! पण त्या गोमूत्रानें पाप जातें, गाय म्हणून तिची शेपटी शिवली तरी विटाळ जातो, तिचें गोमूत्र म्हणजे गंगा, अशी वाह्यात् स्तुति केल्यानें त्या गोमूत्र-गोमयांचा जो खरा औषधी गुण तो अुलट लुप्त होअून कुचकामाचा झाला. रोग घालविण्याअैवजीं बुद्धिभ्रंशाचा नी भाबडटपणाचा अेक नवा रोग फैलावण्यास मात्र हें गोमूत्र-गोमय कारण होअूं लागलें.

**वैद्यमहाशय**—ही मात्रा तुम्ही अतिशयोक्ति करतां!

**आम्ही**—मुळींच नाहीं! अुलट त्या पंचगव्याच्या मंत्रांत 'हाडीमांसीं खिळलेलें पाप—तुम्ही म्हणतां त्या अर्थी रोग— पंचगव्य पितांच अग्नींत सर्पण जळावें तसे जळून भस्म होतात—'दहत्यग्निरिवेंधनं'— ही मात्र अतिशयोक्ति आहे खरीच! येतां जातां भाबडे गोरक्षक बोलून जातात, गोमूत्र-गोमय खाल्यानें, पंचगव्यानें सर्व रोगांचा मुळांतच अुच्छेद होतो! अहो, जर पंचगव्यानें सर्व रोगप्रतिबंध होतो किंवा सर्पण अग्नि जाळतो तसा यच्चावत् रोग तितका पंचगव्य पितांच देहाग्नींत राख होअून जातो, तर मग वाग्भट-चरकांना वैद्यक ग्रंथाचें पुढें अेक पानदेखील लिहिण्याची आवश्यकता नव्हती!

सारीं औषधें, शल्यें, रसायनें, मात्रा, डॉक्टर, वैद्य, क्षकिरणें, जंतुघ्न-टोंचणीं– निरर्थक ठरतीं. सारीं रुग्णालयें बंद करून गोमूत्रालयें तेवढीं अुघडीं ठेवलीं कीं आरोग्यखात्याचे काम आटोपतें ! जिकडे तिकडे पी हळद नी हो गोरी, पी पंचगव्य नी हो बरी–!! हा धडाका सुरू झाला असता ! असली मूर्खपणाची अतिशयोक्ति तुम्हांस खपते तरी कशी ? नी अशा भाबडट मंत्रांत तुम्ही वैज्ञानिक बद्यावत् औषधीय पाठ म्हणून आजच्या वैद्यकांत लिहूं धजणार तरी कोणच्या तोंडानें ! जर गोमूत्र अशी सवाअी संजीवनी असती, तर त्याच्या हौदांत शतकोशतकें डुंबत रहाणारे आम्ही आज प्लेग-महामारीचें राखीव रान कसें झालों आणि सात पिढयांत त्या पशूच्या शेणामुताचा थेंबहि तोंडांत न घालणारे ते युरोपियन असे लालबुंद, गलेलठ्ठ निकोप नी निरोगी कसे ? अगदीं आमच्याच वायुमानांत आमच्या शेजारीं रहाणारे मुसलमान गोमूत्र पीत नाहींत म्हणून पटापट मरत नाहींत कसे ? गोमूत्राच्या वैद्यकीय अुपयोगांची ही अवाच्य नी भरमसाट स्तुतीच त्यांची विटंबना करते–आणि त्यास कारण त्या पदार्थाचें धर्मीकरणच नव्हे काय ? पशूचें मूत्र प्याल्यानें म्हणें मनुष्य 'पवित्र' होतो ! अशा भाकड गोष्टीवर विश्वसणाऱ्या बुद्धिभ्रंशाचा रोग मात्र ह्या पंचगव्यानें फैलावला खरा !

**वैद्यमहाशय–** आपण ह्या भाबडया धार्मिक अतिशयोक्ती-विरुद्ध हत्यार अुपसलेंत हें अगदीं ठीक केलेंत. पण शास्त्रशुद्ध पद्ध-तीनें लिहिलेल्या आपल्या वैद्यक–ग्रंथांत अशी अतिशयोक्ति नाहीं अं ! गोमूत्राचें औषध कोणकोणच्या रोगावर लागू पडतें तें जसें त्यांत दिलें आहे, तसेंच गोमूत्र कोणच्या प्रकृतिपरत्वें अपायकारक होतें तेहि दिलें आहे. अुदाहरणार्थ, गोमूत्र हें पित्तप्रकृतींच्या माण-सानें प्यालें असतां अपाय करतें असें स्पष्ट सांगितलें आहे. पित्त-प्रवण साऱ्या रोग्यांना तें वावडें आहे.

आम्ही-कशी लाखाची गोष्ट बोललांत! पित्तविकारांना गोमूत्र औषध नाहीं, अपायकारक; या अेकाच अुदाहरणावरून तें सर्व रोगपरिहारक वा प्रतिबंधक असें म्हणणें मूर्खपणाचें ठरत नाही का? पण गोमूत्राचें धर्मीकरण केल्यामुळें आज बायाबापड्या तें वाटेल त्यास पाजतात, पितात. प्रायश्चितांत भट तें पंचगव्य सरसहा सर्वांना देतात; श्रावणींत जमणारे वष्टपुष्टादि सारे लोक कांहीं रुग्णालयापुढें दाटी करणारे रोगी नसतात!! गोमूत्रानें जे रोग बरे होतात त्यांनींच पीडलेल्यांना तेवढें पंचगव्य द्यावें. पित्त-प्रकृतीचे ब्राम्हण निवडून त्यांना तें देअू नये अशी कांहींअेक पद्धत त्या संस्कारांत नाहीं अर्थात् हे संस्कार नी पंचगव्याची ही रूढि निव्वळ धार्मिक म्हणजेच निव्वळ भावडट आहे. वैद्यकशास्त्रानें तिचें समर्थन होअूच शकत नाही. अुलट सर्वांस सरसहा गोमूत्र-गोमय देणें वैद्यकाच्या दृष्टीनें अपायकारकच होतें. तसें म्हटलें तर गायीचेंच कां, गाढविणीचें मूत्रहि औषधीयच आहे!

वैद्यमहाशय-होय, आठ प्रकारचीं मूत्रें औषधीकर्मांत सांगितलीं आहेत शेळीचें, अुंटिणीचें, गाढविणीचें, घोडीचें--

आम्ही- फार काय 'नास्ति मूलमनौषधम्' असें म्हटलें तरी चालेल! नृमूत्रहि औषधीय आहे! मग गोमूत्राचेंच येवढें प्रस्थ कां? गाय ही देवता म्हणून! पुनः असें पहा, वैद्यकांत वाटेल त्या गायीचें शेणमूत कांहीं औषधीय मानलेलें नाहीं.

वैद्यमहाशय-मुळींच नाहीं. अुलट अन्नें, पक्वानें खाणाऱ्या गायीच्या शेणामुतास निषिद्ध मानलें आहे. कालवड, रानांत हिरवें-गार गवत खाणारी, अशा गायीचें गोमूत्रच औषधीय.

आम्ही- असे नियम आहेत. पण तेहि अेकरूप नाहींत! आणि व्यवहारांत तर त्यांचा मागमूससुद्धा उरलेला नाहीं! ठाणबंद, जरखड, ओखटवाणीखाअू, ज्यांच्या शेणास दुर्गंध, रोगीट, क्षयी, गाय म्हटली कीं देवता, गोमूत्र म्हटलें कीं गंगाजल! अशा

ह्या ओंगळ रूढीचें समर्थन वैद्यकाच्या आधारें कधींतरी करता येईल का? धर्मीकरणानें आमचें वैद्यकदेखील गोमूत्राच्या प्रकरणीं थोडें आंधळेंच झालें आहे. म्हणून त्यांत जे रोग गोमूत्रानें बरे होतात म्हणून लिहिलें आहे, त्यांची अद्यावत् चिकित्सा नी रसायन यांच्या कसोटीनें प्रयोगशाळेंत पुन्हा अेकदां परीक्षा व्हावी. औषध म्हटलें म्हणजे त्याचें पाठ-प्रमाण-पात्र-परिस्थितिपरत्वें नियमबद्ध कोष्टक हवें. नुसतें आपलें 'दहत्यग्निर्रिवेन्धनं' काय कामाचें? **तशा अद्यावत् प्रयोगशाळेंतील वैद्यकीय आणि रासायनिक कसोटींत गोमूत्र-गोमयाचें जें औषधीय किंवा कृषिकर्मीय उपयोग ठरतील त्या मानानें तें सेव्य समजण्यास यत्किंचितहि हरकत नाहीं.** हा प्रश्न अेक गोमूत्राचा, गायीचा, वा पंचगव्याचाच नाहीं. प्रत्येक पदार्थ मनुष्याला ज्या प्रमाणांत अुपयुक्त त्याच प्रमाणांत सेव्य. त्याचें धर्मीकरण केलें कीं, तो वस्तुतःच देवता होअून पडतो. आणि ह्या भाबड्या वृत्तीनें राष्ट्राची बुद्धीच मारली जाते. ह्या भाबड्या प्रवृत्तीस अुच्छेदिण्यासाठीं गाय, वड, तुळस गोमूत्र हीं कांहीं अुपलक्षणें म्हणून निवडून त्यांच्या चर्चेत अितका वेळ आम्ही दवडतों.

• • •

# हें केडगांव कीं वेडगांव ?

"अहो, पण कांहीं झालें तरी हा सत्यनारायणोत्सवाचा येवढा प्रकांड महोत्सव पार पाडण्यास आणि ह्या केडगांवासारख्या ओसाड ठिकाणास धर्मक्षेत्राचें स्वरूप आणण्यास अवश्य तें लाखों रुपयांचें द्रव्यबळ, मनुष्यबळ नी यत्नबळ कांहींअेक जवळ नसलेल्या अेका अकिंचन मनुष्यानें मिळवावें ही अेकच गोष्ट या नारायणमहाराजांच्या अंगीं कोणची तरी अद्‌भुत दैवी संपत्ति, योगविद्या, करामत असलीच पाहिजे हेंच दाखवीत नाहीं काय ? तपस्येवांचून, अीश्वराच्या अधिष्ठानावांचून, जपतपसाधनादिक धार्मिक अनुष्ठानावांचून अशी सिद्धि येणें नाहीं !" केडगांवच्या धर्मशाळेंतील मंडळींत जो तो म्हणत होता.

"तर ! तर ! सिद्धाअीच्या अद्‌भुत शक्तीच ह्या ! नारायणमहाराजांचा शद्ब निघाला कीं खरा झालाच. रावराजे, सारा

दळभार त्यांच्या अिच्छामात्रें आज हालत आहे कीं नाहीं पहा !" अेक उग्रट दिसणारी समाजधीट बाई कर्कश स्वरांत म्हणाली. "अहो, हातीं घेतलेल्या खडीसाखरेच्या खड्यांचीं त्यांनीं मनांत आणतांच जिथें रत्नें होतात तिथें हे लाखों रुपये आज पाण्यासारखे खर्चिणें म्हणजे नारायणमहाराजांना अेक खेळ आहे खेळ ! अशा अवतारी पुरुषांचें उष्टें हेंदेखील अमृत आहे बरं, विचक्षणानंदजी ! हे इतके लोक जे अिथें त्यांच्या पायाचें तीर्थ पिता आहेत ते काय अुगीच ? तुम्हीदेखील नसत्या शंका काढून सत्पुरुषनिंदा करणें सोडून द्यावें हेंच बरें."

स्वामी विचक्षणानंदांना तिनें 'सत्पुरुषाची नसती निंदा सोडून द्या' असें बजावल्याबरोबर स्वामीजीच्या सांगातीं असलेले हणमंतराव हुबळीकर रागावून म्हणाले, "ह्या बाअीना लहान तोंडीं मोठा घांस घेण्याची ही खोडच आहे ! त्यांना आज दोन वर्षं तरी पोटापाण्याचा धंदा असा अेवढाच अुरलेला आहे हें मी अुघड अुघड सांगतों. कारण त्या अिथें नारायणमहाराजांच्या धर्मशाळेंत पुल्खा झोडतात. आणि काम हें अेवढें केलें कीं, दुसरा अुद्योग त्यांना करावा लागतच नाहीं. या महोत्सवांत तर नारायणमहाराजांच्या चमत्कारांच्या बातम्या पिकविण्याचें नी विकण्याचें अेक कार्यालयच कुठेंतरी काढलेलें आहे आणि ही अशी अैदी बायाबुवांची अेक टोळी बुवांच्या सिद्धाअींची गपकेबाज प्रसिद्धि यात्रेंतील शेकडों लोकांमध्यें करण्याच्या कामावर नेमलेलीच आहे असें मला पक्कें माहीत आहे."

स्वामी– त्याचें असें आहे. येवढा अुत्सव जुळवून पार पाडण्याअितकी शक्ति नी युक्ति नारायणबुवांत आहे, ते बरेच चाणाक्ष आहेत, असें कांहींतरी म्हणतां येअील. अमुक बुवा किंवा भक्त लबाड आहे किंवा कर्तृत्ववान् आहे कीं नाहीं असा अेक अगदीं तुच्छ प्रश्न माझ्यासमोर नाहीं. पण अशीं व्यावहारिक कार्यें पार पाडलीं म्हणजे त्या बुवांत अेकदम कांहींतरी अलौकिक दैवी शक्ति असली

पाहिजे असें मानणाऱ्या आपल्या मूढ नी भाबडट प्रवृत्तीचा प्रश्न माझ्यासमोर आहे. अहो, दोन आणे दिवसावारीं राबणारा मुलगा स्वतःच्या कर्तृत्वानें, निढळाच्या घामानें, सचोटीनें, कोणासहि ढोंगधत्तुऱ्यांनीं वा थापाथूपांनीं न फसवितां पुढें कोटयाधीश झाल्याचीं उदाहरणें मुंबअीपुण्यास शेंकडयावारीं आढळत नाहींत काय? या केडगांवाला विकत घेणारे पैसेवाले काय थोडे आहेत? नारायणमहाराजांनीं कमावलेली सारी संपत्ति ज्यांच्या अेकेका चाकराच्या घरीं राबते आहे असें राज्यचें राज्य मल्हारी नांवाच्या अेका धनगराच्या मुलानें नाहीं का स्थापलें? अमेरिकेंतील मोटारवाल्या फोर्डनें कमावलेली संपत्ति नी आज त्याच्या दारीं राबत आलेले हजारों लोक पहा! त्यांच्यापुढें ह्या बुवाबावांची ही अैदी करामत किती तुच्छ! आणि अेखादा तो लेलिन वा तो चांभाराचा मुलगा स्टॅलिन, वा तो नेपोलियन वा तो लोहाराचा मुलगा मुसोलिनी? **कुठें ते विभूतिमत्त्वाचे दिग्जयी दिग्गज नी कुठें हें विभूतिमत्त्वाचें केडगांवी कोंबडें!**

अितक्यांत त्या धर्मशाळेबाहेर कांहीं बाया नी बोवा यांचा थवा मोठ्यानें जयजयकारता झाला. 'अनंतकोटिब्रह्मांडनायक नारायणमहाराज की जय!'

त्या जयजयकाराची त्या धर्मशाळेंत बसलेल्या मंडळींत जे बुवांचे भक्त होते आणि नेहमींच ती बिरुदावली अैकत त्यांनादेखील त्या वेळीं लाज वाटली. टीका अैकत राहिलें कीं समाजाचा भाबडेपणाहि जाअू शकतो! सामाजिक मन सांथीच्या रोगास झटकन् बळी पडतें. मग ती सांथ भाबडेपणाची असो वा बुद्धिवादाची!

तो जयजयकार अैकतांच हणमंतराव तर चवताळून म्हणाले; "अरे, काय हें थोतांड! अेका बेचकळीअेवढ्या या केडगांव बेटाचें नायकपण आणि राज्यदेखील ज्याच्या हातीं नाहीं तो अेक लक्षावधि

माणसासारखा माणूस, तो म्हणे ' अनंतकोटिब्रह्मांडनायक नारायण!' जे लोक असे म्हणतात ते मतिमंद, आणि जे म्हणवून घेतात ते तर केवळ मैंद! अिंग्रजी राज्यांतील अेका शिपुडर्यालादेखील पहातांच थरथर कांपून त्याच्या लखोटयांत लिहिलेली वाटेल ती साहेबी आज्ञा 'शिरसा वंद्य' करणारे, राजकारणी चळवळींत कांतडीला ओरखडा बसतो म्हणून तिकडे जन्मांत ढुंकूनहि न पहाणारे, हे भुक्कड बैरागी जर अनंतकोटिब्रह्मांडनायक तर ज्यांच्या राज्यांत हे असले भिकार ब्रह्मांडनायक दर दहा मैलांवर मठया बांधून पडलेले नी चुपचाप त्याची सुटेल ती आज्ञा पाळीत दडलेले आहेत तो अिंग्रज किती अनंतकोटिब्रह्मांडनायक म्हणावा, बुवा!"

"पण त्या अिंग्रज राष्ट्रानें तर पिढोनपिढया कधीं सत्यनारायण पूजिला नाहीं, नी त्या लेनिननें कधीं संध्या केली नाहीं; स्टॅलिनप्रभृति तर देवच मानीनात, मग नवग्रहास कोण पुसतो? ते सगळे गोघ्न, तरीहि ऋद्धिसिद्धि त्यांच्या दाराशीं राबताहेत आणि हे तुमचे अुंबराच्या फळांतील अनंतकोटिब्रह्मांडनायक यांचे दासानुदास होअून पडले आहेत!" स्वामीजी म्हणाले, "या साठीं हा दोनतीन लाखांचा अुत्सव केला किंवा हजारबाराशें धर्मभोळया लोकांवर छाप पाडली म्हणजे हें अैहिक नी अगदीं सामान्य कर्तृत्वसुद्धां 'अेक अलौकिक सिद्धि, तपस्येचें, सत्यनारायणपूजेचें फळ आहे!' असें समजणें मूर्खपणा नाहीं काय?

अैहिक सामर्थ्य, अैहिक कर्तृत्व नी अैहिक वैभव हें जपतपांदिकांहीं, संध्यानिमाजादिकांहीं, गंडदोर्‍यांनीं मिळतें, ही धर्मभोळी, अैदी नी भाकड समजूत उराशीं धरून बसला आहे म्हणूनच आमचा समाज आज युरोपचा बंदा दास झालेला आहे!"

**रामशास्त्री**– तुमचें हें म्हणणें खरें आहे. पण आमचे जे सिद्धपुरुष अशी बिरुदावली मिरवितात ती राजकीय अर्थी नसून अध्यात्मिक अर्थी असते, नव्हे का ? ब्रह्म हें विश्वव्यापी, अखंड, सर्वसत्ताक. नारायणबुवांतहि तेंच घनदाट, अभिन्न : ह्या अर्थी नारायणबुवा ब्रह्मस्वरूपी 'अनंतकोटिब्रह्मांडनायक' म्हणवीत असतील !"

**स्वामी**– तर मग शास्त्रीबुवा, त्या अर्थी कोणताहि बुवा तर काय पण आपल्या टीचभर बिळांत बसलेला प्रत्येक बागुरडाहि अनंतकोटिब्रह्मांडनायक म्हटला पाहिजे. कारण बागुरड्यांतहि नारायणबुवासारखेंच ब्रह्म घनदाट अभिन्नभावें भरलेलें आहे ! मग त्या बागुरड्यांत नी ह्या बुवांत कांहींअेक फरक नाहीं हीच गोष्ट हे भाबडे भक्त वा त्यांचे फसवे गुरु चोपदाराकडून का ललकारवीत नाहींत ? अनंतकोटिब्रह्मांडाच्या गणनीं हे बुवा म्हणजे खरोखरीच अेक बागुरडा होय !"

स्वामीजी अितकें बोलतात तोंच मंडळी पूर्वीच्या बेताप्रमाणें नारायणमहाराजांच्या दर्शनास जाण्यास अुठली. रामशास्त्री म्हणाले, "स्वामीजी, चला दर्शनास जाण्यास तर हरकत नाहीं ना ?"

स्वामीजी अुत्तरले, "मुळींच नाहीं. नारायणमहाराजांशीं आमचा कांहीं व्यक्तिगत द्वेष थोडाच आहे ? त्यांच्या कल्पनेप्रमाणें तेहि एक धर्मकार्य म्हणूनच हा उत्सव करीत असतील. दर्शनास काय हरकत ? मतभेद कार्याच्या पद्धतीविषयीं आहे. लोकांच्या भाबडेपणाच्या सिंहासनावर स्वतःचें प्रस्थ अुभारणें आणि आज ज्या आचारांहीं हिंदु राष्ट्राचा दमडीचाहि लाभ न होतां अुलट अधःपात होत आहे त्याचें स्तोम सार्वजनिकपणें माजविणें हें काय तें आम्हांस निंद्य वाटतें !"

**रामशास्त्री**– पण शेकडों लोकांना तसें वाटत नाहीं; आतांच महाराजांच्या दर्शनासाठीं अितकी तुंबळ दाटी अुडालेली पहाल कीं,

त्यायोगें तुम्हांसदेखील त्या व्यक्तींत तपस्येचें कांहीं अलौकिक नी दैवी सामर्थ्य असलेंच पाहिजे असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

स्वामीजी अुहसले; "कोणास पहाण्यास हजारों लोक लोटले म्हणजे 'दैवी' तपस्येचें सामर्थ्य त्यांत असतें हा किती खुळचट पुरावा आहे बरें! अहो, चार्ली चापलीन हा अेक नट; तुमच्या जपतपांस, सत्यनारायणास पाखंड मानणारा अेक अहिंदु, गोमांस, मद्य, सूकर हीं प्रत्यहींचीं त्याचीं खाद्यपेयें; पण तो चार्ली चापलीन लंडनमध्यें आला तेव्हां त्याला पाहण्यास अर्धें लंडन बाहेर पडलें! मैल मैल माणसें मुग्यांसारखी खेचून भरलेलीं! लाखों स्त्रीपुरुष बालबालिका त्याच्या ओझरत्या दर्शनासाठीं रेटारेटी करतांना चेंगरून मेल्या! मग तो चार्ली चापलीन नारायणमहाराजांपेक्षांहि अधिक मोठा तपस्वी, जपीतपी, अवतारी मानला पाहिजे तुम्हीं! अहो, घोड्यांच्या डर्बीसारख्या स्पर्धेंत (रेसेसमध्यें) ती स्पर्धा नी जिंकणारा घोडा पहाण्यास पन्नास पन्नास रुपयांचीं तिकिटें काढून हजारों श्रीमंत सरदार, कामगार यांची ह्या केडगांवच्या भिकार दाटीहून दसपट अधिक दाटी अुडते! मग काय तो घोडा नारायणमहाराजांहून दसपट अधिक तपस्वी नी दैवी सामर्थ्याची विभूति म्हणायचा? लेनिन गाअीचें नी डुकराचें मांस खाअी. अल्ला वा देव मुळीच मानीत नसे. धर्माला अेक भंगड भ्रम म्हणे! पण त्या लेनिनच्या स्मारकमंदिरांत त्याचें राखीव प्रेत पहाण्यासाठीं प्रतिवर्षीं आठाअठ लाख रशियन लोटत असतो! अियें तर दोन्ही सांजा शिरापुरीवर फुकटंफाकट हात मारतां येतो म्हणून जमलेल्या शेंकडों लोकांचाच भरणा फार! असले भोजनबाबू जमविलेच तर कोणाच्याहि दर्शनास दाटी करून दाखवितां येईल! तेव्हां त्यांच्या दर्शनास दाटी होते म्हणून नारायणमहाराजांत 'दैवी' सामर्थ्य वा तपस्येची सिद्धाअी प्रभृति अदृश्य नी अद्भुत शक्ति असल्याच पाहिजेत हें म्हणणें भोळसरपणाची परिसीमा होय. तसेंच ह्या अुत्सवांत

लॉर्‍याच्या लॉर्‍या भरून प्रसाद सारखा नेला जातो आहे हाच अेक अद्‌भुत चमत्कार कित्येक बायाबापड्यांना वाटतो ! अहो राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत यापेक्षां मोठ्या प्रमाणावर ही अन्नपाणी आदि पदार्थांची सुरळीत अुलाढाल चालत नाहीं काय ? अमेरिकेंत अेकेक प्रदर्शन अेकेका पुणें नगरायेवढें विस्तीर्ण भरतें, लाखों लोकांची येजा होते; चित्रासारखी टापटीप असते ! अेंजिनानें प्रसाद नेविवला जातो. हा तुम्हांला 'चमत्कार' वाटतो, पण खरा चमत्कार जर असेल तर ज्यानें तें अेंजिन, ती आगगाडीची युक्ति शोधून काढली त्याचाच नव्हे काय ? नारायणमहाराजांनीं आगगाडी तर काय पण आगपेटीची युक्तीदेखील शोधून काढलेली नाहीं. खडी-साखरेचीं म्हणे रत्नें केलीं. मग त्या रत्नांचा ढीगच ढीग आज कुठें सर्वांना वाटला नाहीं तो ? हा सत्यनारायणाचा खर्चदेखील लोकांपासून लाखों रुपयांचीं दानें उकळूनच चालला आहे ! जर खडीसाखरेचीं रत्नें होतात तर ह्या भारतांत जे लाखों निरपराध दरिद्री अुपाशी मरता आहेत त्यांच्या सार्‍यांच्या मरणाचें पाप नारायणबुवांच्याच शिरावर आहे ! युरोपमध्यें पहा ! अेकाला अेक शोध लागला कीं तो सार्‍या जगाच्या अुपयोगी पडलाच ! क्लोरो-फॉर्म, क्ष किरणांना त्यांनीं काढलें; जगांत आज लाखों जीव यातनां-पासून सुटत आहेत. त्यांची बिनतारी पहा, तार पहा, तीं विमानें पहा. म्हणायचेंच तर ह्यांना म्हणावें चमत्कार ! आकाशांत चंद्र-मंगळापर्यंत अुडं पहाणारीं तीं विमानें, ते मानवी गरुड पहा ! आणि त्यांच्या टांचेखालीं त्यांचे दास होअून धुळींत रांगत सरपटत पडलेले हे आम्ही केडगांवचे दैवी किडे पहा !"

अशी चर्चा करीत मंडळी दर्शनास निघाली. तों वाटेच्या बाजूनेंच शंभरसवाशें मंडळींत मोठी दंगल माजून राहिलेली दिसली. कानडी नी मराठी शिव्याशापहि मोठमोठ्यानें अैकूं येऊं लागले. अित-क्यांत लगदालगदी होअून मोठीच ओरडाओरड झाली. 'दक्षिणा

देत नाहींत,' 'तूप मिळत नाहीं', 'जेवायच्या पंगती आज बसतात का आज आम्ही अुपाशीच मरणार,' अशा नाना प्रकारच्या ज्याच्या त्याच्या कागाळयाहि चालल्याच होत्या. थोडें जवळ जातांच आढळून आलें कीं ती वेदोनारायण अशा ब्राम्हण मंडळींची छावणी असून-मारामारी झालेली होती, ती वाढपी कोण, कोठारी कोण, महाराष्ट्रीय ब्राम्हण लुच्चे कीं कानडी, अशा अत्यंत व्यापक, धार्मिक पवित्र मत-भेदांवरून ! "हे प्रकार मधून मधून असेच चालतात आणि कानडी ब्राम्हण लोक एकंदरींत पुष्कळ आलेले असून दक्षिणा फार थोडी मिळणार हें कळल्यापासून त्यांच्यांत त्याविषयीं असंतोष माजत आहे. किरकोळ गोष्टी–भाज्या चिरणें, तूप वाढणें, सैंपाक ह्या प्रश्नांवरहि भांडणें चालू असतात" असें रामशास्त्र्यांनींच स्वत: अितर पाहुणे मंडळीस सांगितलें.

**स्वामी–** अेखाद्या मोठ्या समारंभांत कांहीं अव्यवस्था, असंतोष मधेंच घडतो. त्यांत विशेष नाहीं. परंतु प्रसाद वेळेवर सारखा पुरविण्याची अित्यादि व्यवस्था काय हो चोख ही ! हा नारायणमहाराजांचा 'दैवी' प्रभाव ! नाहींतर साध्या मनुष्याला हें सगळें निर्विघ्न पार कसें पाडतां येणार म्हणून जीं बावळट माणसें अेकदम दैवी शक्ति जिथें तिथें तोंडी लावतात त्यांना हें नको का विचारावयास ? कीं ही जी ह्या प्रत्यक्ष ब्राह्मणांतच कलालांसारखी लगदालगदी, वाढप्यांचीं भांडणीं, अव्यवस्था नी असंतोष माजलेला आहे त्या अव्यवस्थेवरून तुमच्या नारायणमहाराजांत, अेखाद्या साध्या ठेकेदारांत ( Contractor ) आढळते तितकी देखील कशी आंवरशक्ति नाहीं ? पुन्हा असें पहा कीं ह्या अेवढया महानुष्ठानाचा कांहींतरी 'पवित्र' असा परिणाम ह्या हजारों शेंकडों ब्राह्मणांवर झालेला दिसतो का ? ह्या हजारों वाढप्यांपासून तों दर्शकांपर्यंत शेंकडा नव्वद तरी अेक मीज पहावी किंवा

अेक धंदा करावा म्हणूनच अिथें गुंतलेले आहेत. कोणी दक्षिणे-करितां भांडतो, कोणी नवस करतो, कोणी तुपासाठीं ओरडतो, वाढप्यांचे संप, मराठी का कानडी हे वाद ! सारे संसारी, सामान्य, क्षुद्र मनोव्यापार ! कांहींतरी अुदात्त असा परिणाम, कांहींतरी परोपकाराची स्फूर्ति, कांहींतरी राष्ट्र अुद्धारून नेणारी प्रचंड नवी नैतिक शक्ति अिथें कुठें संचारलेली दिसते आहे का ? नाहीं ! सारें आश्चर्य, सारी चर्चा, सत्यनारायणाच्या खंडोगणती प्रसादाची, तुपा-दूधांच्या पुरवठ्याची, आमठी-भात लक्षपात्र भोजनाची आणि 'गोविंदा' ची ! नवस, तूप, दक्षिणा नी जेवणें हें सोडलें तर ह्या अनुष्ठानांत ह्या हजारों लोकांत दुसरा विषयतरी तुम्ही अैकतां आहां काय ?

ते महानुष्ठानाच्या मंडपाशीं बोलत बोलत पोंचले. रामशास्त्री म्हणाले "स्वामीजी, हा धर्मप्रचार तर तुम्हांस अभिनंदनीय वाटतो ना ? तें पहा चारी वेदांचे पारायण चार दिशेस चाललें असून अठरा पुराणिक अठरा पुराणांचे पारायण करीत आहेत. नाना प्रकारचीं होमहवनें, नवग्रहांचीं अरिष्टशांतिप्रीत्यर्थ स्तोत्र, भजनें, कीर्तनकारांचीं कीर्तनें, असा अखंड ज्ञानघोष आणि अखंड महानुष्ठान तिकडे चाललें आहे !"

**स्वामी–** येवढेंच अेक कृत्य मला थोडेंतरी लोभनीय वाटतें. मी ह्या महानुष्ठानांत होणाऱ्या कार्यक्रमाचें जें वर्णन आगाअू वाचलें त्यांत ह्या ज्ञानसत्राचीच काय ती कल्पना मला अिथें येण्याचा त्रास घेण्याअितकी बरी वाटली. चला पुढें ...आं ? हें काय ? अिथें ह्या ज्ञानपोअीवरच जनसमूहाचा शुकशुकाट ? तान्हेले ज्ञानपिपासू कोणीच नाहींत इथें. चला आंत !

"छे, छे, आंत नाहीं कोणाला सोडीत." रामशास्त्री म्हणाले, "सर्वसाधारण समाज हांकेच्या आंतसुद्धां अिथें कसा येअील ? हा

वेदघोष, हे सारे सोंवळे ब्राम्हण ! त्या वेदाचा शब्द शूद्रातिशूद्रांच्या कानांवर नाहीं का पडणार ? जो जो पोथी वाचतो त्यालाच तेवढी ञियें ती अेकूं जाते. कीर्तनकाराचें कीर्तन अैकावयास त्याच्या मागचा मृदंग नी टाळवाला तेवढाच असणार ! अितकेंच काय पण सगळयांच्या सगळया पोथ्या वाचण्याचा, होमांचा, भजनांचा, कीर्तनांचा अेवढा संमिश्र कोलाहल तिथें दाटतो कीं जरी ओंवळया प्रेक्षकांना तिथें जाअूं दिलें तरी बाजारच्या गलब्यापेक्षां सुस्पष्ट ध्वनि असा सुसंगतपणें कसल्याच विषयाचा अैकूं येणार नाहीं !"

"आतां मात्र अविवेकाची सीमा झाली ! हें का तें ज्ञानसत्र ! कोणीं अेकूं नये म्हणून होणारीं हीं पारायणें ! कुणीं पिअूं नये म्हणून घातलेल्या ह्या पाणपोओी ! हा आजचा धर्म नव्हे—आजचा अधर्म तो हाच !" स्वामी निराशपणें फणफणले.

तोंच, 'अहो रामशास्त्री !' 'अहो स्वामीजी' अशी किंचाळत ती अुग्रट बाअी धांवत तिथें आली आणि ओक्साबोक्शीं रडत म्हणाली, "अहो, माझी पांच हजार रुपये दागिन्यांची पेटी चोरीला गेली ! आत्तां बि-हाडीं पाहिलें तों पत्ता नाहीं ! स्वामीजी, तुमची मोठमोठ्या गुप्त पोलीस अधिकाऱ्यांशीं ओळख आहे ! माझ्या चोरीचा पत्ता द्या !... चौकशी !... चोर !"

स्वामीजी हंसले ! "बाअी, गुप्त पोलीस कशाला ? तुम्ही अनंतकोटिब्रम्हांडनायक नारायणाच्या शिष्या ! मघां त्यांच्या अंतर्ज्ञानाच्या नी चमत्कारांच्या काय काय कथा सांगितल्या ? मग ते नारायणबुवा चोर कुठें तो सांगतील ! नाहींतर खडीसाखरेचे चार खडे त्यांना द्या; कीं ते मुठींत भरून त्यांचीं रत्नें करतील आणि तुमच्या पांच हजारांच्या चोरीच्या ठायीं पांच लाखांची भरपायी करून देतील !"

"पांच कपर्ड्यादेखील देणार नाहींत ते कोणाला ! घेतील मात्र लाख लाख ! काय सांगूं स्वामी, मी भिकेला लागलें ! आतां मला नारायणमहाराज कशाला विचारतील ? मीं दागिने त्यांना द्यावें म्हणून मला त्यांची भक्तावळ नी ते गेलीं तीन वर्षं सारखें हटकीत लकडा लावीत होते. मला तर संशय आहे तो त्यांच्या भोंवतींच्याच दोनतीन बायांचा, हो. मी नांवें देअीन बरं, पोलिसाला. अहो, कसलं अंतर्ज्ञान घेअून बसले आहांत ! मला आतांच त्या नारायणबुवानं धक्के मारून काढून दिलं ! आम्हीच मूर्खं, गाढव, आम्हीच मनास येअील तो चमत्कार सांगत हिंडूं नी त्यांच्या अंतर्ज्ञानाची द्वाही फिरवूं !" ती अुग्रट बाअी असें किंचाळत आहे अितक्यांत—

"अहो रामशास्त्री, आश्चर्य ! आश्चर्य !!" अशा धांपा टाकीत बेळवी डॉक्टर तोंच तिथें आले. "अहो काय विचारतां ! भिकूबाअी नांवाच्या अेका भक्तिणीच्या पदरांत प्रसाद म्हणून नारायणमहाराजांनीं आतांच अेक फूल टाकलें तोंच त्या फुलाच्या हजार रुपयांच्या नोटा झाल्या, पदरांतल्या पदरांत हा चमत्कार !"

तें अैकतांच पिसाळल्यासारखी धांवून ती अुग्रट बाअी पुढें आली नी किंचाळली " कोण भिकी ? अहो, पक्की थापेबाज आहे बरं ती ! अहो ती नी मी मिळून आजवर अशा पांचशें चमत्कारांच्या हुली अुठविल्या असतील ! पोटाचा धंदा होता तो आमचा आणि पुण्यहि वाटे तें आम्हांला ! पण मी आतां तुम्हांला खरं खरं सांगतें ! अहो, त्या भिकीनेंच होय न होय माझं डबोलं लांबविलं असलं पाहिजे ! ! अहो बेळवी, तुम्हीं पाहिलांत का फुलाचा हा चमत्कार ? नाहीं ना ? कुणींतरी तुम्हांला सांगितलं, अितकंच ना ? अहो, नुसत्या अैकीव थापांवर फट्कन विश्वसून तीच गोष्ट पराचा कावळा करीत पुढें सांगत जाण्याची जी खोड तुम्हां भाबड्या

लोकांना आहे ना, त्या भांडवलावरच ह्या असल्या शेंकडों बुवांचा चमत्कारांचा धंदा चालतो बरं ! मीहि त्यांतलीच होतें बरं अेक !'

"बाओ, तुम्हीं मघां धर्मशाळेंत केलेलीं बुवामंडळींची स्तुति जितकी आततायी होती तितकीच पुरावा मिळेतों तुमची ही निंदाहि आम्ही आततायी समजतों." स्वामी म्हणाले आणि त्या थव्यास सोडून जाअू लागले. तोंच रामशास्त्र्यांनीं हटकलें कीं "स्वामीजी, अहो, दर्शनाला चलतां ना ? तें तसेंच राहिलें !"

"नको तें दर्शन आम्हांला ! ह्या धर्मोत्सवाचा आपल्या हिंदु धर्माच्या नी राष्ट्राच्या अुद्धारास कांहीं लाभ आहे का तें आम्हांस पहाणें होतें. यास्तव **निघतांना मी केडगांवास म्हणून निघालों पण पत्ता चुकून कोणत्या वेडगांवास येऊन पडलों** हें आतां ध्यानांत आलें ! आतां आम्ही तडक परत फिरणार !"

असें बोलून स्वामी विचक्षणानंद पुण्याला जाणाऱ्या मोटारच्या अड्ड्यावर आले. मोटार सुटण्यास अवकाश होता. तेवढ्यांत स्वामीजींची थोरवी माहीत असलेल्या दोनचार वृत्तपत्रांच्या बातमीदारांनीं त्यांना घेरून विनविलें कीं ह्या महानुष्ठानाच्या कार्यक्रमाविषयीं कांहींतरी मत थोडक्यांत का होईना पण व्यक्तवावें. तेव्हां स्वामी म्हणाले "थोडक्यांत ? अेक दोन तीन असें टिपून घ्या तर !"

(१) व्यक्तिशः कोणा बुवाच्या पायाचें पाणी कुणी भक्त पिओ, त्यांचे वैयक्तिक संबंध व्यक्तिगत जीवनांत त्यांस परवडतील तसे ते ते ठेवोत–त्या विषयांत कोणीं तोंड खुपसण्याचें कारण नव्हे. परंतु जेव्हां त्या प्रश्नास ते बुवा नी भक्त स्वतःच अेका सार्वजनिक प्रस्थाचें स्वरूप देतात, त्यांच्या चमत्कार–नवस–सिद्धिप्रभृति गोष्टींचा लोकांमध्यें प्रकट प्रचार करून हजारों लोकांनीं त्या प्रस्थांत समाविष्ट व्हावें म्हणून नवीं नवीं स्तोमें माजविलीं जातात तेव्हां त्या

त्या प्रस्थांच्या, पंथांच्या नी पाखंडांच्या अपद्रवापासून समाजास बचावण्यासाठीं, ज्या कोणास तें प्रस्थ अेक लोकघातक पाखंड वाटत असेल त्यांस त्यांचा सार्वजनिक विरोध करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

( २ ) आजच हिंदु राष्ट्रास अुद्धरील असा अेकहि कार्यक्रम महानुष्ठानांत नव्हता, **सारा तुपट, तेलकट, घामट दुसऱ्या बाजीरावाचा खाऊ नी बुढावू खाक्या !** प्रसाद, शिरा, तूप, नवस, भांडणें, भुरके, ढेंकरा नी दक्षिणा ह्यावांचून तिथें दुसरा विषय नव्हता ! पहिल्या बाजीरावाच्या पराक्रमी विचारांचा अेक किरणहि तिथें कुठ कधीं चमकला नाहीं !

( ३ ) प्राचीन विद्येच्या उत्तेजनाचें अंग तेवढें बरें वाटलें सक्रृद्दर्शनीं. पण प्रत्यक्ष प्रयोग पहातां, तो तर अगदीं टाकाअू कार्यक्रम दिसला. खांबापुढें वेदपठण ! भिंतीपुढें महाभारत कथा ! अैकायला मनुष्य सोडायचा नाहीं ! हा काय धर्मप्रचार ? लोकशिक्षण ? श्रुतिस्मृतिपुराणादिक आपली अत्यंत पवित्र संस्कृत ग्रंथसंपत्ति अैतिहासिक नी तात्त्विक दृष्टीनेंसुद्धां साऱ्या जगाचें अमूल्य धन; अत्यंत रक्षणीय. जेव्हां मुद्रण नव्हतें तेव्हां ते ग्रंथ पाठ करणारा अेक वर्ग अवश्य होता, त्याचा योगक्षेम वहाणें समाजाचेंहि कर्तव्यच होतें. पण आतां मुद्रण आल्यानें त्या वर्गास पोसण्याचें बंद केलें पाहिजे. त्या आमच्या बंधूंना स्वकष्टार्जनाचे अितर उद्योग मोकळे आहेत. प्राचीन विद्येच्या रक्षणार्थ आतां त्या त्या ग्रंथांच्या सुंदर नी संशोधित आवृत्त्या छापणें, त्या प्रत्येकाची अैतिहासिक वा धार्मिक संशोधक-मंडळें स्थापणें आणि अुपनिषदें, दर्शनें महाभारत आदि ग्रंथांना सार्थ छापून त्याच्या प्रती विनामूल्य नी अल्पमूल्य धर्मार्थ वांटणें हा अुत्तम मार्ग. ह्या कार्यीं अशा धर्मोत्सवानिमित्त जितकीं दानें द्याल, मंडळें स्थापाल, संशोधक-विद्वत्परिषदा कराल तितक्या करा. तें खरें धर्मग्रंथरक्षण होअील. निदान लखों लोकांना शेंकडों ठिकाणीं शेंकडों प्रचारकांना

धाडून ते ते धर्मग्रंथ सार्थ वाचून दाखवा ! पण चारीं कवाडें लावून भिंतीपुढें महाभारतकथा भाडोत्री ब्राह्मण वाचतो आहे ह्याला का विद्यारक्षण वा धर्मप्रसार म्हणतात ?

(४) नवग्रहादिकांचीं अरिष्टशांतिप्रीत्यर्थ हवनें–पूजा असले खुळे धार्मिक विधि तर आतां अगदीं पंचमहापातकासारखे त्याज्य समजले पाहिजेत ! हे नवग्रह, तारे, सूर्यचंद्र ह्या पृथ्वीसारखे अगदीं निर्जीव, जड पदार्थ, भडकलेल्या विजेच्या दिव्याच्या डोंबासारखे ! मनुष्याशीं समरस अशी न बुद्धि न मन न जीव त्यांना. त्यांची पूजा कसली करतां ? दगडी खांबाला हात जोडून प्रार्थिलें कीं 'मी डोकें आपटतों तुझ्यावर, लागूं देऊं नको हं मला !' तरी दगडी खांबावर आपटलें कीं डोकें फुटणारच ! तशीच गोष्ट ह्या ग्रहांची ! आतां ज्योतिषविषयक जड नी निर्जीव अशा ह्या ग्रह, तारा, सूर्यचंद्रांच्या स्वरूपांविषयीं ही माहिती मनुष्यास पक्की झाली असतां त्यांना पुन्हा पूजिणें, प्रार्थिणें म्हणजे अगदीं जाणून बुजून खोटयांची पूजा बांधणें, असत्यनारायण करणें आहे ? **पांच हजार वर्षांपूर्वीच्या अज्ञानयुगाकडे पाठ फिरवा. आजच्या विज्ञानयुगास स्वागता !** हा खरा धर्म आहे !

(५) सगळयांत घातक गोष्ट म्हणजे ह्या महानुष्ठानांत कांहीं भोंदू लोकांचें प्रस्थ माजवावें म्हणून साऱ्या समाजांत चमत्कार, नवस, तंत्रमंत्र, छाछूंची अत्यंत भावडी बुद्धिघातक, राष्ट्रघातक प्रवृत्ति जाणूनबुजून उत्पन्न करण्यांत येत होती !

(६) आश्रमांविषयींच बोलायचें तर तो मसुराश्रम पहा ! तिथें खरें धर्ममहानुष्ठान चालू आहे ! अजूनहि केडगांवच्या उरावर मिशन आहे ! पण मसुराश्रमानें गोमांतकांत जाऊन दहा हजार हिंदूंना शुद्ध केलें. मिशनचें नाकच छाटलें. तो खरा सत्यनारायण !

त्यांच्या व्यायामशाखा हजारों हिंदु तरुणांत बलोपासना, प्रयत्नशीलता प्रसरवीत आहेत. आजच्या विज्ञानाच्या शोधांना जनपदविद्यापीठांतून त्यांचे शेंकडों ब्रह्मचारी गांवोगांव अुपदेशीत आहेत ! कुठूनहि अहिंदूंनीं छळलेल्या हिंदु अनाथ बालबालिकेची हांक येताच हातांत प्रतिकारी वैधदंड घेऊन त्यांचा ब्रम्हचारी तिकडे धांवलाच म्हणून समजा ! तें खरें धर्मकार्य ! दानच म्हणायचें तर ते प्रतापशेट पहा, ते भागोजी शेठ पहा, तें बिरला कुटुंब पहा ! अेका अेकाची संपत्ति चार चार नारायणबुवांसारख्या बापड्यांना खरेदी करील अशी ! पुन्हा तीहि बायांबापड्या भोळसटांच्या भाबडेपणावरचा आयदी मलिदा नव्हे तर स्वकष्टार्जित. आणि त्या संपत्तींतून लक्षावधि रुपयांचीं दानें हिंदुधर्मरक्षणार्थ नी हिंदुराष्ट्रधारणार्थ जीं ते ते देताहेत तीं पहा ! मुंजांच्या सैनिक विद्यालयास अेकमुठी लक्ष लक्ष रुपयांचीं दानें ते देतात; अखिल हिंदुमंदिरें, प्रसूतिगृहें, विद्या नाहीं त्या त्या गांवकऱ्यांना विद्यालयें, पाणी नाहीं त्यांना विहिरी, शुद्धिकार्याला लाख लाख रुपये, हिंदूंच्या अनाथालयांना लाख लाख रुपये अशीं दानें देणारे हे दानवीर ह्या नारायणबुवांहून शतपटीनें अधिक 'दैवी', 'पुण्यवान्' 'प्रभावी' होत ! त्यांचीं धर्मकृत्यें ह्या 'शिरापुरी देअू नी देणग्या घेअू' व्यापारांहून खरीं खरीं धर्मकृत्यें होत !

नारायणमहाराज भोंदू नसतील तर त्यांनीं शांतपणें हा विचार करावा. आणि पुढील वर्षाच्या आंत निदान अेक हिंदू अर्भकालय तरी स्थापावें आणि निदान शंभर अनाथ अर्भकांचे, विशेषतः परधर्मीयांच्या गोटांत फसणाऱ्या अनाथ लेंकरांना सोडवून त्यांचें पालनपोषण त्यांस होईल अितकें तरी करावें ! अशा दहा लाख सत्यनारायणांपेक्षां तें अेक कृत्यसुद्धां खरें धर्मकृत्य ठरेल !

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५८२

● ● ●

REFBK-0005582

REFBK-0005582